सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, दि. २४ मार्च २०२६ | वर्ष - ३२ | अंक ३४४ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# युद्धामुळे परिस्थिती चिंताजनक; भारताकडे पेट्रोलियम साठा किती?



## पंतप्रधान मोदींच्या लोकसभेतील भाषणातील प्रमुख मुद्दे

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पश्चिम आशियात सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी लोकसभेत महत्त्वाचे भाषण करत भारताची भूमिका स्पष्ट केली. मागील २४ दिवसांपासून सुरू असलेल्या संघर्षामुळे जागतिक ऊर्जा पुरवठा, व्यापार आणि भारतीय नागरिकांच्या सुरक्षेबाबत चिंता वाढली आहे. अशा परिस्थितीत भारताने संतुलित भूमिका घेत कूटनीती आणि संवादाच्या माध्यमातून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला आहे.

पंतप्रधानांनी सांगितलं की, होर्मुज सामुद्रधुनीत कोणताही अडथळा तयार करणे भारताला मान्य नाही. कारण देशातील मोठ्या प्रमाणावर कच्चं तेल, गॅस आणि खतांची आयात या मार्गावर अवलंबून आहे. या मार्गावर परिणाम झाल्यास देशाच्या अर्थव्यवस्थेवर थेट परिणाम होऊ शकतो. त्यामुळे भारत सरकार विविध देशांशी सतत संपर्कात असून, पर्यायी पुरवठा साखळी मजबूत करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. यासाठी आधी २७ देशांकडून होणारी आयात आता ४१ देशांपर्यंत वाढवण्यात आली आहे.

या संकटाच्या काळात भारताकडे ५.३ दशलक्ष मेट्रिक टनांहून अधिक स्ट्रॅटेजिक पेट्रोलियम साठा असल्याची माहितीही पंतप्रधानांनी दिली. यामुळे तात्पुरत्या अडचणींचा सामना करण्यास देश सक्षम असल्याचं त्यांनी सांगितलं. याशिवाय सरकारने एक विशेष गट स्थापन केला असून तो दररोज बैठक घेऊन आयात-निर्यात, पुरवठा आणि लॉजिस्टिकमधील अडचणींचा आढावा घेत आहे.

पश्चिम आशियातील देशांमध्ये सुमारे १ कोटी भारतीय काम करत असल्याने त्यांची सुरक्षा ही भारतासाठी सर्वात मोठी प्राथमिकता असल्याचं पंतप्रधानांनी अधोरेखित केलं. युद्ध सुरू झाल्यापासून आतापर्यंत सुमारे ३ लाख ७५ हजार भारतीयांना सुरक्षितपणे देशात परत आणण्यात यश मिळालं आहे. तसेच युद्धग्रस्त भागात अडकलेल्या भारतीयांना मदत करण्यासाठी २४७ हेल्पलाइन आणि विशेष मिशनद्वारे काम सुरु आहे.

या संकटाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांनी देशांतर्गत परिस्थितीवरही लक्ष केंद्रित केलं. त्यांनी स्पष्ट इशारा दिला की, साठेबाजी आणि काळाबाजार करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. राज्य सरकारांनाही याबाबत सूचना देण्यात आल्या असून आवश्यक वस्तूंचा पुरवठा सुरळीत ठेवण्यावर भर देण्यात आला आहे.

दरम्यान, विरोधकांकडून या मुद्द्यावर सतत चर्चा करण्याची मागणी होत असताना पंतप्रधानांनी सरकारची तयारी आणि उपाययोजना सांगितल्या आहेत. त्यांनी सांगितलं की, या संकटाचा परिणाम कमी करण्यासाठी पेट्रोलियम, वीज, खत आणि इतर महत्त्वाच्या क्षेत्रांवर सतत लक्ष ठेवण्यात येत आहे. जागतिक तणावाच्या या पार्श्वभूमीवर भारताने संयम, कूटनीती आणि व्यावहारिक मार्ग स्वीकारला असून देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर समतोल राखण्याचा प्रयत्न सुरू आहे.

## थोडक्यात...

### मुंबईकर उकाड्याने हैराण होणार, मराठवाड्यावर अवकाळी सावट

**मुंबई :** राज्यात काही दिवसांपासून अवकाळी पावसाचे ढग होते. मराठवाडा, विदर्भासह मध्य महाराष्ट्रात बऱ्याच भागात गारांचा पाऊस झाला. अनेक भागात मुसळधार पावसाचे अंदाज होते. आता मात्र प्रचंड उन्हाच्या झळा बसू लागल्या आहेत. कमाल तापमानाचा पारा पुन्हा एकदा ४० च्या घरात जाताना दिसत आहे. भारतीय हवामान विभागाच्या अंदाजानुसार पुढील पाच दिवस राज्यभरात प्रचंड उकाडा आणि उन्हाचा कडाका जाणवणार आहे. तर मराठवाड्यात व मध्य महाराष्ट्रात काही भागात मुसळधार पावसाचे अलर्ट देण्यात आले आहेत. भारतीय हवामान विभागाने दोन दिवस मुंबई आणि आसपासच्या परिसरासाठी उष्ण आणि दमट हवामानाचा इशारा दिला आहे. मुंबई, ठाणे, पालघर, रायगड आणि रत्नागिरीला आज यलो अलर्ट जारी केला आहे. तर मराठवाडा विदर्भात काही जिल्ह्यांना मुसळधार पावसाचा अलर्ट देण्यात आला आहे. त्यामुळे किनारपट्टीच्या भागात उष्णतेच्या लाटा आणि मराठवाडा विदर्भात अवकाळी पावसाचा इशारा आहे.

### मास्टर प्लॅन : वृक्षतोडीसाठी केंद्राच्या पूर्वपरवानगीची गरज नाही

**नवी दिल्ली :** एखाद्या अधिसूचित मास्टर प्लॅन अंतर्गत विकासासाठी निश्र्चित केलेल्या जमिनीवर केवळ नंतर झाडे-झुडपे उगवल्यामुळे तिला 'डीम्ड फॉरेस्ट' (मानिव जंगल) मानले जाऊ शकत नाही. अशा प्रकारे नंतर उगवलेली झाडे तोडण्यासाठी वन (संरक्षण) अधिनियम, १९८० अंतर्गत केंद्र सरकारची पूर्वपरवानगी घेण्याची आवश्यकता भासणार नाही, अशी महत्त्वपूर्ण टिप्पणी सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती दीपांकर दत्ता आणि न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या खंडपीठाने केली. खंडपीठाने दिल्लीच्या बिजवासन रेल्वे स्टेशन पुनर्विकास प्रकल्पाला मंजुरी देणारा राष्ट्रीय हरित लवादाचा आदेश कायम ठेवला.

### रिंकू सिंह होणार केकेआरचा कर्णधार

**नवी दिल्ली :** आयपीएल २०२६ च्या रणधुमाळीपूर्वी कोलकाता नाईट रायडर्सच्या (घघठ) गोटातून एक मोठी बातमी समोर येत आहे. भारतीय संघाचा माजी फलंदाज मोहम्मद कैफ याने केकेआर व्यवस्थापनाला एक धाडसी सल्ला दिला आहे. ''रिंकू सिंहला या हंगामाच्या मध्यावरच कर्णधार करावे किंवा किमान उपकर्णधारपदाची जबाबदारी देऊन भविष्यातील कर्णधार म्हणून तयार करावे,'' असे मत कैफने व्यक्त केले आहे. रिंकूमध्ये नेतृत्व करण्याची पूर्ण क्षमता असून तो या जबाबदारीसाठी सज्ज असल्याचेही त्याने नमूद केले.

### सभापती राम शिंदे नीलम गोऱ्हेंचा निर्णय फिरवणार?

**मुंबइ :** सातारा जिल्हा परिषद अध्यक्ष (ड्रींरीर नळश्रश्र झरीळीहरव झीशीळवशपीं) आणि उपाध्यक्षपदाच्या निवडणुकीत भाजप (इगझ) आणि शिवसेना-राष्ट्रवादी यांच्यात झालेल्या चुरशीच्या लढतीचे पडसाद आज विधिमंडळात उमटल्याचं पाहायला मिळालं. सातारा झेडपी अध्यक्षपदाच्या निवडणुकीवरुन विधान परिषदेत भाजप आणि शिवसेनेत जुंपली. सातारा पोलीस अधीक्षकांना आणि सर्व पोलीस अधिकाऱ्यांना निलंबित करा, जिल्हा परिषद आवारातील सीसीटीव्ही फुटेज सादर करावं. या प्रकरणात विभागीय आयुक्तांनी स्वतः लक्ष घालावं, असे निर्देश उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी दिले आहेत. पण, आता निलम गोऱ्हे यांनी दिलेले आदेश कायम राहणार का? असा प्रश्र्न उपस्थित होत आहे. सभापती राम शिंदे निलम गोऱ्हे यांच्या आदेशाला स्थगिती देणार असल्याच्या चर्चा सुरू आहेत.

# अशोक खरात प्रकरणी कोणालाही सोडले जाणार नाही : मुख्यमंत्री



**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. २२ मार्च :** विधानसभेत विरोधकांनी अशोक खरात प्रकरणावरून चांगलाच हल्लाबोल केला. काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी आपल्या आक्रमक शैलीत या संदर्भातील घटनेवर गांभीर्याने कारवाई करण्याची मागणी सरकारकडे केली. तर दुसरीकडे नाना पटोले यांनी अशोक खरातसोबत ज्यांचे फोटो आहेत, त्या सर्वांचेच राजीनामे घेतले जावे, अशी मागणी केली. विरोक्षकांच्या या आक्रमक भूमिकेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर सविस्तर भाष्य केले आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, तथाकथित काय तांत्रिक, मांत्रिक, बाबा जे काय असतील, भोंदू बाबा अशोक खरात या व्यक्तीच्या संदर्भात टेक काढणं चाललंय आता... जो विषय घडलेला आहे तो अत्यंत गंभीर आहे. या व्यक्तीने आपल्या तथाकथित शक्तींचा दुरुपयोग करून आणि दिशाभूल करून अनेक महिला ज्या आहेत यांच्यासोबत गैरव्यवहार, दुष्कृत्य केल्याचं समोर येतंय.

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, या संदर्भात मी सभागृहाला अवगत करू इच्छितो की, या संदर्भातली कारवाई ही आपल्या पोलिसांनी प्रोक्टिव्हली केलेली आहे. याचा ट्रॅप तयार करून ती केलेली आहे. यामध्ये महिला इन्व्हॉल्व्हड असल्यामुळे त्या... त्यांची फसवणूकच झाली होती पण त्या समोर यायला तयार नव्हत्या. त्यावेळेस त्यांचं योग्य पद्धतीनं त्यांना धीर देऊन आणि अशा पद्धतीनं आता काही महिलांनी तक्रार केलेली आहे. उर्वरित अजून काही महिला या संदर्भात तक्रार करतील.

मी केवळ आपल्याला एवढंच सांगतो की, या संदर्भात कारवाई जरी आता झाली, तरी देखील याची तयारी आधीपासून सुरू होती. त्यांच्या अटकेच्या अगोदरच म्हणजे साधारणपणे १० तारखेला, १०/३ ला दुसऱ्या जिल्ह्यातून आपण एका कंप्लेंटचा उपयोग करून त्यांचा एलओसी देखील काढून ठेवला होता की त्यांना बाहेर पळता येऊ नये, अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

देवेंद्र फडणवीस म्हणाले, या संदर्भात पूर्णपणे कारवाई आपण करतो आहोत. मी या सभागृहामध्ये उद्या याचं सविस्तर निवेदन करीन कारण आजही चौकशी चाललेली आहे संपूर्ण प्रकरणाची. आणि दोन्ही बाजूला माझी विनंती आहे की, हा आपल्या कोणाकरता राजकारणाचा प्रश्न नाहीये, हा महिलांच्या डिग्निटीचा प्रश्न आहे. अशा प्रकारे महिलांचा दुरुपयोग करणं आणि त्यांना काहीतरी वेगळ्या पद्धतीचं भासवून, वेगळ्या शक्ती आहेत असं सांगून आणि जणू काही त्या जे काही समर्पण करतायत, ते करणं हेच त्यांचं इतिकर्तव्य आहे अशा पद्धतीचा त्यांचा ब्रेन वॉशिंग करणं, अशा अनेक गोष्टी याच्यामध्ये करण्यात आलेल्या आहेत.

त्यामुळे निश्चितपणे याचं गांभीर्य लक्षात घेऊन उद्या या संदर्भात मी जे काही तुम्ही ठरवाल पण याचं सविस्तर, अगदी सखोल निवेदन मी करेन. मी नेहमी क्लीन चिट देत नाही, जो क्लीन असतो त्यालाच क्लीन चिट मिळते. अशी कुठलीच चिट माझ्याकडे नाहीये आणि याच्यात तर ज्याचा दुरान्वयानेही संबंध असेल, त्यालाही सोडलं जाणार नाही, असे आश्वासन देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहे.


## अशोक खरात प्रकरण

### पीडित महिलांचे फोटो, व्हिडिओ शेअर करणाऱ्यांवर थेट गुन्हा

#### सायबर पोलिसांचा मोठा निर्णय

**तभा वृत्तसेवा**

**नाशिक, दि. २२ मार्च :** नाशिकमधील गाजत असलेल्या अशोक खरात प्रकरणात आता पोलिस प्रशासनाने सोशल मीडियावरील 'डिजिटल' गुन्हेगारीविरुद्ध मोठे पाऊल उचलले आहे. या प्रकरणातील पीडित महिलांचे फोटो, व्हिडिओ आणि आक्षेपार्ह मजकूर व्हायरल करणाऱ्यांविरोधात नाशिक सायबर पोलिसांनी कडक पवित्रा घेतला आहे. पीडितांची बदनामी करणाऱ्या आणि त्यांची ओळख उघड करणाऱ्या समाजकंटकांवर थेट गुन्हे दाखल करणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.



भोंदू अशोक खरातच्या कारनाम्यांमुळे अवघ्या महाराष्ट्रात खळबळ माजली आहे. पोलिसांनी खरातला अटक केली आहे. तसेच त्याच्या ट्रस्टवरील सदस्या रुपाली चाकणकर यांनाही राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला आहे. तपासादरम्यान असे निदर्शनास आले आहे की, काही विकृत मानसिकतेचे लोक कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मॉर्फिंग तंत्रज्ञानाचा वापर करून महिलांचे तसेच आक्षेपार्ह फोटो तयार करत आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, या प्रकरणाशी कोणताही संबंध नसलेल्या निरपराध महिलांचे फोटोही चुकीच्या पद्धतीने वापरले जात असून, त्यांची सामाजिक प्रतिष्ठा धुळीस मिळवण्याचा प्रयत्न होत आहे. सायबर पोलिसांनी अशा सर्व संशयास्पद पोस्ट्सवर बारकाईने लक्ष ठेवण्यास सुरुवात केली आहे.

**पीडितेची ओळख उघड करणे कायदेशीर गुन्हा**

कायद्यानुसार कोणत्याही लैंगिक अत्याचारातील पीडित महिलेची किंवा तक्रारदाराची ओळख सार्वजनिक करणे हा गंभीर स्वरूपाचा गुन्हा आहे. तरीही व्हॉट्सप, फेसबुक आणि इंस्टाग्राम यांसारख्या प्लॅटफॉर्मवर अफवा आणि दिशाभूल करणारी माहिती वेगाने पसरवली जात आहे. पीडितांच्या सन्मानाचे रक्षण करणे ही आमची प्राथमिकता आहे. सोशल मीडियावर चुकीची माहिती शेअर करणाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा पोलिस यंत्रणेने दिला आहे.

**सायबर पोलिसांचे 'स्पेशल मॉनिटरिंग'**

प्रकरणाची संवेदनशीलता लक्षात घेता, सायबर पोलिसांनी विशेष पथकाद्वारे सोशल मीडिया मॉनिटरिंगला प्राधान्य दिले आहे. केवळ पोस्ट तयार करणारेच नव्हे, तर त्या फॉरवर्ड करणारे आणि अशा ग्रुप्सचे डमिनही पोलिसांच्या रडारवर आहेत. तपासात अडथळा निर्माण होईल किंवा प्रकरणाला वेगळे वळण लागेल, अशा कोणत्याही कृत्यावर पोलिस कठोर कायदेशीर कारवाई करण्याच्या तयारीत आहेत.

**नागरिकांसाठी पोलिसांचे आवाहन**

कोणतीही खात्री नसलेली माहिती किंवा फोटो फॉरवर्ड करण्यापूर्वी विचार करा. पीडित महिलांची ओळख पटेल असा कोणताही मजकूर शेअर करणे टाळा. सोशल मीडियावरील दिशाभूल करणाऱ्या पोस्ट्सवर विश्र्वास ठेवण्याऐवजी अधिकृत माहितीचा आधार घ्या. सोशल मीडियावर आपली बदनामी होत असल्यास तात्काळ सायबर पोलिसांकडे तक्रार नोंदवा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेत तयार झालेल्या तरुणांनी देशभर सेवा प्रकल्प उभे केले: संजयजी पाचपोर

## श्री.पावन मारुती भव्य हिंदू संमेलनाला नागरिक व महिलांचा उस्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २२ मार्च :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला येत्या विजयादशमीला शंभर वर्षे पूर्ण होत आहेत यानिमित्ताने देशभर वस्तीनिहाय हिंदू संमेलनाचे आयोजन होत आहे. याप्रमाणे देशभरात ८५००० हिंदू संमेलने संपन्न होणार आहेत.

संघाचे संस्थापक डॉक्टर हेडगेवार यांनी १९२५ साली नागपूर येथे संघाची स्थापना केली. शाखा हे व्यक्तीनिर्माणाचे केंद्र असून संघाच्या शाखेत घेतलेल्या संस्काराची शिदोरी घेऊन स्वयंसेवकांनी देशभर संघ कामाचे जाळे विणले आणि विविध सेवा कार्य उभी केली असे प्रतिपादन सहकार भारती राष्ट्रीय संघटन मंत्री संजयजी पाचपोर यांनी केले ते पावन मारुती समिती टिळकनगर छत्रपती संभाजीनगर तर्फे दिनांक २२ मार्च मारुती मंदिरात आयोजित केलेल्या भव्य हिंदू संमेलनात बोलत होते यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी ह.भ.प. जनार्दन महाराज मेटे पूज्य मुनीश्री सुदर्शन महाराज कपाटे पू. भगीरथ शास्त्री महाराज सौ. मोनिका समीर जोशी आणि श्री.प्रल्हाद पन्हाळे उपस्थित होते.

यानंतर विश्व हिंदू परिषद प्रांत धर्माचार्य संपर्कप्रमुख ह.भ.प. जनार्दन महाराज मेटे, महानुभाव पंथाचे पूज्य सुदर्शन महाराज कपाटे यांनी मार्गदर्शन केले तसेच मोनिका समीर जोशी यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

दीप प्रज्वलानंतर श्री पावन मारुती संमेलन समितीचे अध्यक्ष प्रसिद्ध उद्योजक श्री प्रल्हाद पन्हाळे यांनी प्रास्ताविक केले.कुमारी अंतरा दीपक पवार हिने हनुमान चालीसावर उत्तम पद्धतीने कथक नृत्य सादर केले.

आभार प्रदर्शन समितीचे सचिव डव्होकेट बाळासाहेब वाघमारे आणि सूत्रसंचालन डॉक्टर यशश्री कुलकर्णी यांनी केले

भव्य हिंदू संमेलनापूर्वी

राम मंदिर -चेतक घोडा- सायली हॉटेल-महादेव मंदिर-तानाजी चौक-शिवशंकर कॉलनी- रवींद्र नगर-नाजुका कॉर्नर - रोपळेकर चौक-विवेकानंद चौक -हजारी कॉर्नर ते संमेलन स्थान अशी भव्य शोभायात्रा काढण्यात आली.

शोभायात्रेत झाशीची राणी छत्रपती शिवाजी महाराज विविध संत या भूमिका केलेले अनेक तरुण-तरुणी घोडे भजनी मंडळे सहभागी झाले होते. रस्त्यावर ठीक ठिकाणी रांगोळ्या सडा टाकून स्वागत करण्यात आले. शोभा यात्रेचे पूर्ण नियोजन कोराळे मामा आणि दिलीप राऊत रमेश सद्गुरे यांनी केले.

संमेलनाच्या यशस्वीतेसाठी सफल रायसोनी, भीमराव कुलकर्णी, दीपक पवार,अभय प्रभुणे, विजय मुळे,राजीव जहागीरदार,शशांक काळीकर,सूर्यकांत दिवेकर,महादेव कराडकर चंद्रकांत डोणगावकर मांडवकर गजानन वैद्य मनोज वैद्य विनायक तुळजापूरकर विजय माई पदमवार व एडवोकेट बाळासाहेब वाघमारे यांनी मेहनत घेतली.

भव्य हिंदू संमेलनानंतर महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली

# ट्रम्पची दंडेलशाही इराणने हाणून पाडत गुडघ्यावर आणलं

## इराणी विद्युत प्रकल्पावर हल्ला करण्याचा निर्णय पुढे ढकलला

**तेहराण/वृत्तसंस्था :** अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणच्या वीज प्रकल्पांवर आणि ऊर्जा पायाभूत सुविधांवर होणारे हल्ले तात्पुरते स्थगित केले आहेत. अमेरिका आणि इराण यांच्यात दोन दिवस झालेल्या चर्चेनंतर हा निर्णय घेण्यात आल्याचे ट्रम्प यांनी सांगितले. त्यांनी सांगितले की, संरक्षण विभागाला पाच दिवसांसाठी सर्व लष्करी हल्ले थांबवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ट्रम्प यांच्या मते, इराणसोबत सुरू असलेल्या वाटाघाटींमधील सकारात्मक कल लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला असून, या काळात चर्चा सुरूच राहील. ट्रम्प यांनी सांगितले की, जर वाटाघाटी यशस्वी झाल्या, तर मध्य-पूर्वेतील सध्याचा तणाव संपवण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल उचलले जाऊ शकते. खरे तर, दोन दिवसांपूर्वी ट्रम्प यांनी इराणला धमकी दिली होती की, जर ४८ तासांच्या आत होर्मुझची सामुद्रधुनी उघडली नाही, तर ते इराणच्या वीज प्रकल्पांवर मोठा हल्ला करतील.

दुसरीकडे, ट्रम्प यांच्या धमक्यांना डगमगून न जाता जर विद्युत प्रकल्पावर हल्ला झाला तर संपूर्ण आखातातील विद्युत प्रकल्प आणि जल शुद्धीकरण शिल्लक ठेवणार नाही, असा इशारा दिला होता. तुम्ही आमची शाळा, रुग्णालये टार्गेट केली, पण आम्ही केली नाहीत. मात्र, विदयुरत प्रकल्पाला हात घातला, तर आम्ही तेच करू असा इशारा दिला होता. इस्त्रायलने गॅस प्रकल्पावर आणि अणुस्थळांवर हल्ला केल्यानंतर इराणने काल इस्त्रायलच्या अणुस्थळ असलेल्या शहरात बॅलेस्टिक मिसाईली डागल्या होत्या. हा इस्त्रायलच्या आयर्न डोमचा पोलखोल करणारा हल्ला होता.

दरम्यान, ट्रम्प यांनी रविवारी रात्री ब्रिटिश पंतप्रधान कीर स्टारमर यांच्याशी फोनवर मध्य-पूर्वेतील वाढत्या संघर्षावर चर्चा केली. ही माहिती ब्रिटिश पंतप्रधानांच्या कार्यालयाने दिली. निवेदनात म्हटले आहे की, दोन्ही नेत्यांनी सद्यस्थितीवर, विशेषतः जागतिक जहाजवाहतूक पुन्हा सुरू करण्यासाठी होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा उघडण्याच्या गरजेवर चर्चा केली. जागतिक ऊर्जा बाजारात स्थिरता



राखण्यासाठी होर्मुझची सामुद्रधुनी उघडणे आवश्यक आहे, यावर त्यांचे एकमत झाले. निवेदनात असेही म्हटले आहे की, दोन्ही नेते लवकरच पुन्हा चर्चा करतील.

इराणने इशारा दिला आहे की, जर त्यांच्या किनारपट्टीच्या भागांवर किंवा बेटांवर हल्ला झाला, तर ते पर्शियन आखातातील सागरी मार्गांवर सुरुंग पेरतील. इराणच्या राष्ट्रीय संरक्षण परिषदेने म्हटले आहे की, अशा परिस्थितीत आखाती प्रदेशातील सर्व सागरी मार्गांवर सुरुंग पेरले जातील. तसेच, या मार्गावर प्रवेश मिळवण्यासाठी देशांना इराणसोबत वाटाघाटी कराव्या लागतील, असेही त्यात म्हटले आहे. वृत्तानुसार, ट्रम्प प्रशासन इराणचे खारग बेट ताब्यात घेण्याच्या पर्यायाचाही विचार करत आहे. हे बेट पर्शियन आखातात इराणच्या किनाऱ्यापासून सुमारे २४ किलोमीटर अंतरावर वसलेले आहे आणि येथे मोठ्या तेल साठवणूक व उपसा सुविधा आहेत, ज्यातून इराणच्या तेल निर्यातीपैकी सुमारे ९० टक्के तेल येते.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# संत ज्ञानेश्वर महाविद्यालयातील संशोधकाला कर्करोगावरील संशोधनासाठी पेटंट मंजूर

**तभा वृत्तसेवा**

**सोयगाव, दि. २२ मार्च :** येथील संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाशी संबंधित संशोधकांनी स्तनाच्या कर्करोगावरील उपचारासाठी महत्त्वपूर्ण संशोधन करून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. महाविद्यालयातील संशोधक डॉ.मनोजकुमार चोपडे यांच्या डॉक्सोरुबिसिनचे टॉपिकल जेल संयोजन व त्याच्या तयारीची पद्धत या संशोधनाला भारत सरकारच्या पेटंट कार्यालयाकडून पेटंट (क्रमांक : ५८३९९८) मंजूर झाले आहे.सदर पेटंट १६ फेब्रुवारी २०२५ रोजी दाखल करण्यात आले होते, तर १९ मार्च २०२६ रोजी ते मंजूर करण्यात आले.पेटंट कायदा, १९७० नुसार हे पेटंट



पुढील २० वर्षांसाठी वैध राहणार असून कर्करोग उपचार क्षेत्रातील संशोधनात यामुळे मोलाची भर पडणार आहे. या संशोधनामध्ये डॉक्सोरुबिसिनवर आधारित टॉपिकल जेल विकसित करण्यात आले आहे. या जेलमध्ये वापरण्यात आलेल्या ग्लोचिडोनॉल या जेलिंग एजंटमुळे औषधाची कार्यक्षमता वाढविण्यात यश आले आहे. विकसित केलेले हे थर्मोसेंसिटिव्ह टॉपिकल जेल उच्च स्थिरता दर्शवते.तसेच औषधाची विद्राव्यता,विलयन, त्वचेमधील प्रवेश आणि शोषण या घटकांमध्ये लक्षणीय सुधारणा घडवून आणते.

यामुळे औषधाचा दीर्घकालीन प्रभाव राखला जातो, डोस कमी करण्यास मदत होते आणि रुग्णांच्या उपचार प्रक्रियेत सहकार्य वाढते.हे संयुग विविध प्रकारच्या कर्करोगाच्या व्यवस्थापनासाठी उपयुक्त ठरण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.या संशोधन कार्यात संशोधन विद्यार्थी सुरज आडे यांचेही महत्त्वपूर्ण योगदान आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष रंगनाथ काळे (नाना) तसेच सचिव प्रकाश काळे यांनी संशोधकांचे अभिनंदन केले आहे.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार, उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे,रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ.रामेश्वर मगर तसेच डॉ. सुनील चौधरे, डॉ.पंकज गावित, डॉ. संतोष पडघन,डॉ.श्याम टकले आणि महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी या यशाबद्दल समाधान व्यक्त करत संशोधकांचे अभिनंदन केले आहे.

## शहीद दिनानिमित्त बिडकीन येथे भव्य पदयात्रेचे आयोजन; मेरा युवा भारत व टुगेदर फॉर विकास फाउंडेशनचा पुढाकार

**तभा वृत्तसेवा**

**बिडकीन, दि. २२ मार्च :** मार्च भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील महान क्रांतिकारक शहीद भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी 'मेरा युवा भारत' छत्रपती संभाजीनगर आणि 'टुगेदर फॉर विकास फाऊंडेशन' यांच्या संयुक्त विद्यमानाने बिडकीन येथे शहीद दिनानिमित्त भव्य पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या पदयात्रेचा मुख्य उद्देश आजच्या तरुण पिढीमध्ये राष्ट्रभक्तीची भावना प्रबळ करणे आणि हुतात्म्यांच्या बलिदानाचा इतिहास तळागाळातील तरुणांपर्यंत पोहोचवणे हा होता. युवकांना व्यसनांपासून दूर ठेवून त्यांना राष्ट्रउभारणीच्या कार्याशी जोडणे आणि सामाजिक ऐक्य टिकवून ठेवणे या उद्देशाने ही पदयात्रा काढण्यात आली.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून फौजी आकाश जाधव, विश्र्ववयुथ फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रकाश त्रिभुवन, टुगेदर फॉर विकास फाऊंडेशनचे संचालक पंकज धुळे व रवी जाधव यांची विशेष उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते क्रांतिकारकांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पदयात्रेचा प्रारंभ करण्यात आला. बिडकीनच्या मुख्य मार्गावरून निघालेली ही




पदयात्रा 'भारत माता की जय' आणि 'इन्किलाब जिंदाबाद'च्या घोषणांनी दणाणून गेली होती.

याप्रसंगी बोलताना फौजी आकाश जाधव म्हणाले की, क्रांतिकारकांच्या बलिदानामुळेच आपल्याला स्वातंत्र्य मिळाले असून, तरुणांनी देशसेवेसाठी सदैव तत्पर राहिले पाहिजे. विश्र्ववयुथ फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रकाश त्रिभुवन यांनी तरुणांना क्रांतिकारकांच्या विचारांचे अनुसरण करण्याचे आवाहन केले. टुगेदर फॉर विकास फाऊंडेशनचे संचालक पंकज धुळे यांनी नमूद केले की, तरुणांमध्ये शिस्त आणि संघटन कौशल्य विकसित करण्यासाठी अशा उपक्रमांचे आयोजन करणे काळाची गरज आहे. रवी जाधव यांनी युवकांना जिद्दीने देशाच्या प्रगतीत योगदान देण्याचे आवाहन केले. या भव्य पदयात्रेच्या यशस्वीतेसाठी टुगेदर फॉर विकास फाऊंडेशनच्या स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले. स्वयंसेवकांच्या नियोजनबद्ध नियोजनामुळे या उपक्रमाला शिस्तबद्ध स्वरूप प्राप्त झाले. या पदयात्रेला बिडकीन परिसरातील नागरिक आणि युवकांचा मोठा प्रतिसाद लाभला.

## सोयगाव शहरात नेकी फाउंडेशन तर्फे ईद मिलन सोहळा उत्साहात संपन्न



**तभा वृत्तसेवा**

**सोयगाव, दि. २२ मार्च :** पवित्र रमजान महिन्याच्या समाप्तीनंतर आपापसातील प्रेम, एकोपा आणि बंधुभाव वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने नेकी फाउंडेशन सोयगाव यांच्या वतीने 'ईद मिलन सोहळा' मोठ्या उत्साहात संपन्न झाला.हा कार्यक्रम सोमवार रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत सिद्दिकी मस्जिद परिसरात आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यास सोयगाव शहरातील विविध पक्षातील पदाधिकारी,नगरसेवक,पत्रकार,समाजसेवक,व्यापारी, विविध समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून एकमेकांना ईदच्या शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमादरम्यान सामाजिक एकतेचा संदेश देण्यात आला असून,सर्वांनी प्रेम आणि बंधुभाव कायम ठेवण्याचे आवाहन करण्यात आले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी नेकी फाउंडेशनचे अध्यक्ष रसूल शेख,उपाध्यक्ष शेख वसीम,सचिव सईद देशमुख,सहसचिव इम्रान देशमुख यांनी विशेष परिश्रम घेतले.त्यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम अत्यंत सुरळीत आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.या ईद मिलन सोहळ्यामुळे सोयगावात सामाजिक सलोखा अधिक दृढ झाला असून,नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## मुलींच्या आरोग्यासाठी पुढाकार; साने गुरुजी विद्यालयात सॅनिटरी पॅड वाटप व जनजागृती

**तभा वृत्तसेवा**

**कन्नड, दि. २२ मार्च :** शहरातील साने गुरुजी माध्यमिक विद्यालयात विद्यार्थिनींसाठी मासिक पाळी स्वच्छता जनजागृती कार्यक्रम व ऑगनिक सॅनिटरी पॅड वितरण उपक्रम उत्साहात पार पडला. विद्यार्थिनींमध्ये मासिक पाळीबाबत जागरूकता निर्माण करणे व स्वच्छतेचे महत्त्व पटवून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.



हा सामाजिक उपक्रम विश्र्व उद्यम सहाय्यता फाउंडेशनच्या प्रगती तायडे यांच्या पुढाकारातून तसेच धरती संजीवनी फाउंडेशनचे सत्तार खान यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला होता. एक लाख सॅनिटरी पॅड वितरण मोहिमेअंतर्गत विद्यार्थिनींना ऑगनिक सॅनिटरी पॅडचे वाटप करण्यात येत असून, मासिक पाळीदरम्यान स्वच्छता कशी राखावी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रात्यक्षिक व समन्वय माधुरी नारखेड यांनी केले. यावेळी शाळेतील महिला शिक्षिका हर्षदा कदम, अलका जाधव यांच्यासह व्यवस्थापन मंडळातील मान्यवर उपस्थित होते. तसेच मुख्याध्यापक धैर्यशील केरे व क्रीडा शिक्षक राकेश निकम यांनी उपक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

या उपक्रमामुळे विद्यार्थिनींमध्ये मासिक पाळी स्वच्छतेबाबत सकारात्मक जागरूकता निर्माण झाली असून मुलींच्या आरोग्य व सक्षमीकरणासाठी अशा सामाजिक उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित झाले आहे. या मोहिमेत सहभागी होण्यासाठी इच्छुकांनी प्रगती तायडे यांच्याशी ९८९२९३८४५६ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे

## थोडक्यात...

### एण्ड टीव्ही अभिनेत्रींचे समर स्किनकेअर टिप्स

छत्रपती संभाजीनगर - वाढत्या तापमानामुळे त्वचेची विशेष काळजी आवश्यक असल्याचे एण्ड टीव्हीवरील अभिनेत्री सीरत कपूर आणि विदिशा श्रीवास्तव यांनी सांगितले. सीरत कपूर साधे पण प्रभावी स्किनकेअर फॉलो करत जेल-बेस्ड क्लीन्सर, नॉन-स्टिकी सनस्क्रीन आणि हायड्रेटिंग मिस्ट वापरते. ती कोरफडीचे मॉइश्र्चरायझर व नारळ पाण्यावर भर देते. केसांसाठी ती तेलमालिश व नैसर्गिक मास्क वापरते. विदिशा श्रीवास्तव हलके मॉइश्र्चरायझर, काकडी-ग्रीन टी उत्पादने आणि गुलाब पाणी टोनरचा वापर करते. ती चंदन फेसपॅक व घरगुती उपायांना प्राधान्य देते. दोघीही हायड्रेशन, कमी मेकअप आणि नैसर्गिक केअरला महत्त्व देतात.

### भरत अहलावतचा थरारक शूटिंग अनुभव

छत्रपती संभाजीनगर - 'जाने अनजाने हम मिले' मालिकेत भरत अहलावतने साकारलेला जेल सीन प्रेक्षकांसाठी थरारक ठरणार आहे. कथानकानुसार राघववर खुनाचा आरोप होत असून त्याच्यावर मानसिक व शारीरिक छळ दाखवण्यात येणार आहे. या दृश्यासाठी भरतला खऱ्या बर्फाच्या लादीवर झोपून शूटिंग करावे लागले, जे अत्यंत आव्हानात्मक ठरले. हा अनुभव कठीण होता, शरीर सुन्न झाले होते, असे त्याने सांगितले. या सीनमुळे कथानकात नवे ट्विस्ट येणार असून कृतिच्या मृत्यूमागील गूढ अधिक गहिरे होणार आहे.

### रणवीर सिंग यांची ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती

छत्रपती संभाजीनगर, २३ मार्च २०२६ : अजमल दुबईने रणवीर सिंग यांची ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती जाहीर करत युअर अनसीन पॉवर या मोहिमेद्वारे नव्या टप्प्याची सुरुवात केली आहे. या मोहिमेत अरिस्टोक्रेट, ऑरम समर आणि विसाल लायल या सुगंधांद्वारे आधुनिक व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू अधोरेखित केले जात आहेत. अजमल ग्रुपचे सीईओ अब्दुल्ला अजमल म्हणाले की, रणवीर सिंग हे केवळ ब्रँडचे चेहरा नसून ते सर्जनशीलता आणि स्व-अभिव्यक्तीच्या आमच्या मूलभूत तत्त्वज्ञानाशी सुसंगत आहेत. युअर अनसीन पॉवर ही मोहीम आमच्या ७५ वर्षांच्या परफ्यूमरी वारशाला आधुनिक कथनशैलीशी जोडते. प्रत्येक व्यक्तीमध्ये एक अदृश्य ताकद असते, जी नेहमी दिसत नाही; त्या शक्तीचा उत्सव साजरा करणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. ही मोहीम देशभरातील ५७५+ स्क्रीनवर प्रदर्शित होत असून, अजमलचे सुगंध विविध रिटेल प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहेत.

### मुंबई इंडियन्ससोबत अधिकृत बँकिंग पार्टनर म्हणून भागीदारी

मुंबई : उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड (उत्कर्ष एसएफबीएल) ची टी-२० २०२६ च्या लीगसाठी 'मुंबई इंडियन्स' चे अधिकृत बँकिंग भागीदार म्हणून निवड झाली असून बँकेने या महत्वपुर्ण भागीदारीची घोषणा आज केली. बँकेसाठी हा धोरणात्मक भागीदारीचा अतिशय महत्त्वपूर्ण टप्पा आहे. या भागीदारीच्या माध्यमातून बँक आपली राष्ट्रीय स्तरावरील ओळख वाढवण्याबरोबरच देशभरातील कोट्यवधी क्रिकेट चाहत्यांशी आपले नाते अधिक दृढ करत आहे. सदर घोषणेसाठी आयोजित विशेष कार्यक्रमाला उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँक लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. गोविंद सिंग, मुख्य वित्त अधिकारी श्री. सरजुकुमार प्रवीण सिमारिया आणि कन्झ्युमर बँकिंग प्रमुख श्री. सौरभ घोष तसेच मुंबई इंडियन्स फ्रँचायझीचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### जनरल मॅनेजमेंट प्रोग्रामच्या (जीएमपी) २४ व्या बॅचसाठी अर्ज मागविण्यात आले आहेत

दिल्ली: भारतातील अग्रगण्य व्यवस्थापन संस्था, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अहमदाबाद (आयआयएमए), ने आपल्या प्रमुख जनरल मॅनेजमेंट प्रोग्रामच्या (जीएमपी) २४ व्या बॅचसाठी अर्ज प्रक्रिया सुरू केली आहे. हा प्रोग्राम मध्य पूर्व, दक्षिण आशिया आणि युरोपमधील जागतिक व्यावसायिकांसाठी तयार करण्यात आला आहे.हा प्रतिष्ठित एक्झिक्युटिव्ह प्रोग्राम शैक्षणिक उत्कृष्टता आणि प्रादेशिक प्रासंगिकता यांचा मेळ घालतो, ज्यामुळे सहभागींची व्यवस्थापन कौशल्ये, नेतृत्व क्षमता आणि निर्णयक्षमता मजबूत होते, आणि त्यांना विविध उद्योग व भौगोलिक क्षेत्रांमधील वरिष्ठ व्यवस्थापन पदांसाठी तयार केले जाते.

### बचपना शुडन्ट रिटायर

मुंबई : मेरिलच्या वापी येथील जागतिक मुख्यालयाला दिलेल्या पहिल्या भेटीदरम्यान, भारताचा माजी क्रिकेट कर्णधार एमएस धोनी याने बचपना शुडन्ट रिटायर या विषयावर मनमोकळा आणि प्रेरणादायी संवाद साधला. बचपना शुडन्ट रिटायर हा मेरिलच्या राष्ट्रव्यापी सार्वजनिक आरोग्य चळवळ असलेल्या ट्रीटमेंट जरुरी है चाच एक पुढचा टप्पा आहे. ही मोहीम वेळेवर निदान आणि प्रगत वैद्यकीय उपचारांच्या उपलब्धतेविषयी जागरूकता वाढवण्यासाठी सुरू करण्यात आली आहे.

### उद्योगातील पहिले कॉफी टेबल पुस्तक प्रकाशित केले

मुंबई - भारतीय आरोग्य विमा क्षेत्रातील अशा प्रकारच्या पहिल्याच उपक्रमात, निवा बुपा हेल्थ इन्शुरन्सने आपल्या सल्लागारांच्या प्रेरणादायी प्रवासाला समर्पित एक कॉफी टेबल पुस्तक प्रकाशित केले आहे. हे तेच अज्ञात वीर आहेत जे कुटुंबांच्या आरोग्य आणि आर्थिक सुरक्षेत महत्त्वाची भूमिका बजावतात. हे पुस्तक ४० सल्लागारांच्या प्रभावी आणि भावनिक कथा उजेडात आणते, ज्यात अशा क्षणांचा समावेश आहे जेव्हा त्यांनी केवळ पॉलिसी विकण्यापलीकडे जाऊन, वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितीत कुटुंबांना आधार दिला, गुंतागुंतीच्या कागदपत्रांमध्ये मदत केली आणि आयुष्यातील सर्वात आव्हानात्मक काळात दाव्यांची प्रक्रिया सुलभ केली. या कथांच्या माध्यमातून, हा उपक्रम केवळ त्यांच्या योगदानाचा सन्मानच करत नाही, तर अधिक लोकांना विमा सल्लागार म्हणून एक अर्थपूर्ण करिअर निवडण्यासाठी प्रेरित करतो.

## नगरपरिषद खुलताबाद स्वच्छता विभागाच्या आढावा बैठकीत शहरात पंधरवड्याने स्वच्छता मोहीम राबविण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**

**खुलताबाद, दि. २३ मार्च :** नगरपरिषद खुलताबाद येथे मा. नगराध्यक्ष सय्यद आमेर सय्यद बशीर पटेल यांच्या अध्यक्षतेखाली स्वच्छता विभागाची आढावा बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत शहरातील स्वच्छतेची सद्यस्थिती, मनुष्यबळ, यंत्रसामग्री तसेच विविध प्रलंबित कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

बैठकीदरम्यान मा. नगराध्यक्ष सय्यद आमेर सय्यद बशीर पटेल यांनी खुलताबाद शहर अधिक स्वच्छ, सुंदर व निरोगी ठेवण्यासाठी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचना दिल्या. तसेच शहरातील सार्वजनिक ठिकाणी दर पंधरा दिवसांनी स्वच्छता पंधरवडा राबविण्याचे आवाहन करण्यात आले.

या मोहिमेत नागरिकांचा सक्रिय सहभाग अत्यंत महत्त्वाचा असून, प्रत्येक नागरिकाने आपल्या परिसराची स्वच्छता राखण्यास सहकार्य करावे, असेही आवाहन करण्यात आले. कचरा वर्गीकरण, वेळेवर कचरा संकलन व प्लास्टिक वापर टाळणे याबाबत जनजागृती करण्यावरही भर देण्यात येणार आहे.

नगरपरिषद प्रशासनामार्फत या स्वच्छता मोहिमेचे नियोजनबद्ध पद्धतीने आयोजन करण्यात येणार असून, शहर स्वच्छतेच्या दृष्टीने ही मोहीम प्रभावी ठरेल, असा विश्र्वास व्यक्त करण्यात आला.

या बैठकीस संबंधित अधिकारी, स्वच्छता निरीक्षक व कर्मचारी उपस्थित होते.


## दि.पुसद अर्बन को-ऑप बँक लि.पुसद
मुख्य कार्यालय तलाव ले-आउट पुसद-४४५२०४

**परिशिष्ट – IV (नियम ८(१)पहा) स्थावर मालमत्तेचा सांकेतिक ताबा घेतलेली नोटीस**

खालील स्वाक्षरी करणार हे दि.पुसद अर्बन को-ऑप बँक लि.पुसद मुख्य कार्यालय तलाव ले-आउट पुसद जिल्हा यवतमाळ सेक्युरीटायझेशन अॅन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांन्शियल अॅसेटस् अॅन्ड इन्फोर्समेन्ट ऑफ सेक्युरिटी इंट्रेस्ट अॅक्ट २००२ केंद्रीय कायदा २००२ नं.५४ चे अंतर्गत प्राधिकृत अधिकारी आहेत व त्यांनी सदर कायद्याचे कलम १३(१२) व नियम ९ सेक्युरिटी इंट्रेस्ट इन्फोर्समेन्ट २००२ नुसार दि.१२/१२/२०२५ रोजी नोटीस मध्ये नमुद केलेली रक्कम ६० दिवसांचे आत भरणा करण्यासाठी डिमांड नोटीस दिली होती. परंतु सदर कर्जदारांनी नोटीसमध्ये नमुद केलेल्या रकमेचा भरणा न केल्यामुळे या नोटीसव्दारे संबधित कर्जदार व सर्व जनतेस या व्दारे सूचित करण्यात येते की त्यांनी सदर स्थावर मालमत्ते संदर्भात कोणतेही खरेदी व्यवहार किवा करार इत्यादी करू नये.

सदर मालमत्तेवर दि.पुसद अर्बन को-ऑप बँक लि. पुसद, शाखा छ.संभाजीनगर यांचा बोझा आहे व दि.१८/०३/२०२६ रोजी सांकेतिक ताबा घेतलेला आहे.

| अ. क्र | कर्जदाराचे नाव व पत्ता | दि.३०/११/२०२५ अखेर येणे बाकी | सांकेतिक ताबा दिनांक | मालमत्तेचा तपशिल |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.संतोष भगवानराव अहिरे व सौ.किरण संतोष अहिरे रा. फ्लॅट नं.२०४, साईनाथ टॉवर, सातारा परिसर. जि. छ. संभाजीनगर<br>जामीनदार :-<br>१) श्री.केदार हेमंतकुमार सोनी<br>२) श्री.सोनु प्रकाश जाधव | रु.११,९०,६५९/- + दि.०१/१२/२०२५ पासुनचे व्याज + वसुली खर्च | १८/०३/२०२६ | मौजे सातारा परिसर स्थित जि.छ.संभाजीनगर येथील साई टॉवरच्या दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट क्र. 204 (2 बीएचके) असून त्याचे कार्पेट क्षेत्रफळ 678 चौ. फूट, विक्रीयोग्य क्षेत्रफळ 968 चौ. फूट (89.96 चौ. मीटर) आहे. यामध्ये बाल्कनी, बॉक्सेस, जिना, कॉमन पॅसेज, पार्किंग इत्यादींचा प्रमाणानुसार समावेश आहे. सदर इमारत गट क्रमांक 103 मधील प्लॉट क्र. 20 व 21 वर बांधलेली असून त्यांचे क्षेत्रफळ अनुक्रमे 2510.00 चौ. फूट व 2367.00 चौ. फूट |

स्थळ :- छ.संभाजीनगर
दिनांक :- २४/०३/२०२६

प्राधिकृत अधिकारी
दि.पुसद अर्बन को-ऑप बँक लि.पुसद
शाखा :- छ.संभाजीनगर



### जाहीर प्रगटण/सायटेशन नोटीस

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

सिव्हिल एम.ए. क्र.१७५/२०२६
अर्जदार :-
१) अशोक मधुकर वाघ, वय ५२ वर्षे धंदा व्यापार, रा. वाळुज ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) रमेश मधुकर वाघ, वय ५० वर्षे धंदा व्यापार, रा. वाळुज ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) विमलबाई भ्र.विश्र्वनाथ लाड वय ६८ वर्षे धंदा गृहिणी, रा. पालखेड ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर ४) लक्ष्मी भ्र. राजेंद्र आगळे वय ४३ वर्षे धंदा घरकाम रा. सोनई ता. नेवासा जि. अहिल्यानगर
विरुध्द
गैरअर्जदार :-निरंक
प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन क्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.
उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ अॅड. श्री. एस.ए. साबळे यांच्या मार्फत अर्ज सादर केला की, अर्जदार क्र.१ ते ४ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ व बहिणी असुन अर्जदार क्र.१ ते ४ यांची आई नामे इंदुबाई मधुकर वाघ या मौजे वाळुज ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथील रहिवाशी होत्या त्या दिनांक १६/०२/२०२६ रोजी मौजे वाळुज ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे तसेच अर्जदार क्र.१ ते ४ यांचे वडील नामे मधुकर दादा वाघ हे यापुर्वीच दिनांक १२/०३/१९९१ रोजी मयत झालेले आहे. मयत इंदुबाई मधुकर वाघ यांना अर्जदार क्र.१ ते ४ हे कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वासरदार नसल्याचे नमुद करुन अर्जदारांनी या न्यायालयात वारसप्रमाणपत्राची मागणी केली आहे.
त्याअर्थी तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदाराच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप, उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप, उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक २३/०३/२०२६ दिले. प्रकरणात पुढील तारीख दिनांक २१/०४/२०२६ रोजीची ठेवण्यात आलेली आहे.

**वरीष्ठ / कनिष्ठ लिपीक** **सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर, गंगापूर**



### जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. छत्रपती संभाजीनगर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं.६०/२०२६. नि. क्रं.
१) जिजाबाई युवराज पाटील, वय ६० वर्षे, धंदा शेती, रा. घोसला, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर, २)संदीप युवराज पाटील, वय ३७ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.
विरुद्ध- निल
प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत,
सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ड. सचिन सुनिल गिरी, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत युवराज पुना पाटील यांचा दिनांक १३/१०/२०२४ रोजी मौजे घोसला, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर, येथे मृत्यू झालेला असुन त्याच्या पश्यात वरील अर्जदार क्र. १ ते २ हे वारस आहे, असा अर्ज मा, न्यायालयात दाखात फेतेला आहे. अर्जदार क्र.१ ते २ हे मयत युवराज पुना पाटील यांचे वारस असुन त्यांना शासकिय निमशासकिय वाररामाणपत्रासाठी आवश्यकता आहे.
तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल
आजरोजी दिनांक १८/३/२०२६ रोजी सही न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.
पु.ता.३०/४/२०२६
**क.लिपीक**
**(दिवाणी व फौजदारी न्याचालय सोयगांव)**
**सहाय्यक अधीक्षक**
**(दिवाणी व फौजदारी न्याचालय सोयगांव)**
**प्रतिलीपी :-**
**१) नोटीसबोर्ड, दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव,**
**२)ग्रामपंचायत कार्यालय घोसला, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर,**



### जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. छत्रपती संभाजीनगर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं.५४/२०२६, नि. क्रं.
१)मीराबाई हरी मगर, वय ८४ वर्षे, धंदा शेती, रा. वाकडी, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर.
२) सुभाष हरी मगर, वय ८४ वर्षे, धंदा शेती, रा. वाकडी, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर.
३) कल्पना राहुल निकम, वय ३५ वर्षे, धंदा, घरकाम, रा. पोहरी, खु ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर.
विरुद्ध- निल
प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत,
सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ड. सचिन सुनिल गिरी, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत हरी सखाराम सगर यांचा दिनांक ११.१२.२०२५ रोजी मौजे वरखेडी, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर. येथे मृत्यू झालेला असुन त्याच्या पश्यात वरील अर्जदार क्र. १ ते ३ हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्र.१ ते ३ हे मयत हरी सखाराम मगर यांचे वारस असून त्यांना शासकिय निमशासकिय पारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस मयाकरीता उगर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यया अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल
आजरोजी दिनांक १८/३/२०२६ रोजो सही न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.
पु.ता.३०/४/२०२६
**क.लिपीक**
**(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव)**
**सहाय्यक अधीक्षक**
**(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव)**
**प्रतिलीपी**
**१) नोटीसबोर्ड, दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव**
**२)ग्रामपंचायत कार्यालय वरखेडी, ता. सोयगाव, जिल्हा छत्रपती संभाजीनगर**



### जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधीश (क, स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ३५/२०२६. नि. क्रं.
१) कलाबाई सुकराम साबळे,
वय.७५ वर्षे, धंदा शेती, रा. रवळा, ता. सोयगांव, जि. छ. संभाजीनगर
२)शिवराम सुकराम साबळे, वय ४८ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.
३)दयाराम सुकराम साबळे, वय ४३ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.
विरुद्ध- कोणीही नाही
प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत
सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी अॅड. शुभम अ. आगे सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत सुकराम रामसिंग साबळे यांचा दिनांक २६/०७/२०२१ रोजी रवळा, ता. सोयगांव येथे मृत्यु झालेला असून त्यांच्या पश्यात वरील अर्जदार हेच वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार हे मयत सुकराम रामसिंग साबळे यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.
तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार व गैरअर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल
आजरोजी दिनांक १८/०३/२०२६ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.
पु.ता. ३०/०३/२०२६
**विभीगीय लिपीक**
**सहाय्यक अधीक्षक**
**( दिवाणी व फौजदारी न्यायालय,सोयगाव)**
**प्रतिलीपी :-**
**१)नोटीसबोर्ड, दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.**
**२)ग्रामपंचायत कार्यालय रवळा, ता. सोयगांव, जि. छ संभाजीनगर**

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## तेरणा महाविद्यालयाच्या ४५ विद्यार्थ्यांची नामांकित कंपनीत निवड

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ मार्च -**

तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालय येथील फार्मसी विभागातील तब्बल ४५ विद्यार्थ्यांची पुणे येथील एजिओ या नामांकित औषधनिर्माण कंपनीत निवड झाली आहे.



महाविद्यालयाकडून उद्योगाभिमुख कौशल्यांवर दिला जाणारा भर आणि सातत्यपूर्ण प्रशिक्षण यामुळे विद्यार्थ्यांना रोजगाराच्या उत्तम संधी उपलब्ध होत असल्याचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने यांनी सांगितले.

या भरती प्रक्रियेत तांत्रिक ज्ञान, संवादकौशल्य व आत्मविश्वासावर विशेष भर देण्यात आला होता. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून त्यांच्या कुटुंबीयांनीही समाधान व्यक्त केले आहे.

हा प्लेसमेंट उपक्रम यशस्वी करण्यासाठी संभव फाउंडेशन, बंगलोर यांचे सहकार्य लाभले. तसेच ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी अशोक जगताप व संबंधित प्राध्यापकांनी विशेष परिश्रम घेतले.



## संक्षिप्त वृत्त...



### नांदगाव येथील जिल्हा परिषद शाळेची कार्यकारणी जाहीर

**वाशी, दि.२३ मार्च -**

वाशी तालुक्यातील नांदगाव येथील जिल्हा परिषद शाळेची कार्यकारणी (दि.२३) रोजी जाहीर करण्यात आली. या कार्यकारणीच्या अध्यक्षपदी शिवाजी सारूक यांची निवड करण्यात आली असून उपाध्यक्षपदी सोनाजी शिंदे यांची निवड झाली आहे. ही निवड प्रक्रिया शाळेत गावातील पालक व नागरिकांच्या उपस्थितीत पार पडली. यावेळी ग्रामपंचायत सदस्य संदिप घुले यांच्यासह अमोल घुले, राजेंद्र फासे, अहमद शेख, गोरख घुले, महेश घुले आदी उपस्थित होते. तसेच मुख्याध्यापक रणजित पाटील शिक्षक सुहास बारकुल, सुरज उमरदंड, मनीषा फड व शोभा होगले यांनी कार्यक्रमास उपस्थिती दर्शवली.

### वृत्तपत्रांना दरवाढ व धोरणात्मक सवलतींची मागणी

**लोहारा, दि.२३ मार्च -**

राज्यातील वृत्तपत्रांना दरवाढ देण्यात यावी तसेच जाहिरात व प्रशासकीय धोरणांबाबत विविध मागण्यांना मान्यता द्यावी, अशी मागणी व्हॉईस ऑफ मीडिया संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. सोमवारी (दि.२३) लोहारा तालुक्याच्या वतीने ब्रिजेश सिंह (प्रधान सचिव व महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय) यांना तहसीलदारामार्फत निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात वृत्तपत्र उद्योगावर वाढत्या आर्थिक ताणाचा उल्लेख करत, शासनाच्या योजना व धोरणे जनतेपर्यंत पोहोचवण्यात माध्यमांची महत्त्वाची भूमिका अधोरेखित करण्यात आली आहे. यापूर्वीही अनेकवेळा निवेदने व आंदोलने करूनही मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्याचे सांगत, यावेळी सकारात्मक निर्णयाची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. या निवेदनावर तालुकाध्यक्ष गिरीश भगत, सुमित झिंगाडे यांच्यासह पदाधिकाऱ्यांच्या सह्या आहेत.



### संस्कार गुरुकुलात बालकलाकारांची बासरी संगीत सभा संपन्न

**धाराशिव, दि.२३ मार्च -**

शहरातील गुरू-शिष्य परंपरेनुसार बासरीवादन प्रशिक्षणासाठी प्रसिद्ध असलेल्या महर्षि दधिची फाऊंडेशन, धाराशिव संचलित गुरुकुल संगीत संस्कार विद्यालय बासरी संगीत सभा उत्साहात संपन्न झाली. या संगीत सभेत बालकलाकारांनी वैयक्तिक व समूह स्वरूपात शास्त्रीय तसेच सुगम संगीताचे सादरीकरण केले. बासरीच्या मधुर सुरांनी उपस्थित श्रोत्यांची मने जिंकली. जगदीश सुतार यांनी संगीताचे महत्त्व अधोरेखित करत, लेकरांच्या हातात मोबाईल न देता बासरी द्या, असे आवाहन केले व उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमास प्रशांत कुडाळ, प्रा. प्रसाद माशाळकर, शुभम बनकर तसेच दानवे, टेकाळे, सुरवसे, राऊत, होळकर, शहा परिवार आणि इतर श्रोते उपस्थित होते.



### तेरखेडा येथे संत बाळूमामा पालखी सोहळ्याचा ११ वा दिवस उत्साहात


**वाशी, दि.२३ मार्च -**

वाशी तालुक्यातील तेरखेडा येथे संत बाळूमामा यांच्या पालखी सोहळ्याचा आज ११ वा दिवस उत्साहात पार पडत आहे. पालखी मागील अकरा दिवसांपासून तेरखेडा येथे मुक्कामी असून या काळात हजारो भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला आहे. तेरखेडा गावातून पालखीची भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून संपूर्ण गाव भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाले आहे. संत बाळूमामा चांगभलं या जयघोषाने परिसर दुमदुमत आहे. धाराशिव जिल्ह्यासह सोलापूर जिल्हा व बीड जिल्हा येथून मोठ्या संख्येने भाविक उपस्थित आहेत. मिरवणुकीनंतर पालखी पुढील प्रवासासाठी येरमाळा (ता. कळंब) गावाकडे प्रस्थान करणार आहे.

### पत्रकार शिवशंकर तिरगुळे यांचे निधन

**अणदूर, दि.२३ मार्च -**

जयमल्हार पत्रकार संघाचे सदस्य, पत्रकार शिवशंकर तिरगुळे (वय ४६) यांचे रविवारी अल्पशा आजाराने सोलापूर येथे निधन झाले. शोषित, पीडित व वंचित घटकांच्या प्रश्नांसाठी त्यांनी आपल्या लेखणीतून आवाज उठवला. प्रामाणिक व सामाजिक भान असलेला पत्रकार म्हणून त्यांची ओळख होती. तसेच वृक्षमित्र म्हणूनही ते परिचित होते. त्यांचा अंत्यसंस्कार सोमवारी दुपारी १ वा. हळावरील स्मशानभूमीत करण्यात आले.



## गॅस आहे पण, मिळत नाही!; धाराशिव शहरात एजन्सींचा अनागोंदी कारभार

**जिल्हा प्रशासनाचा दावा ठरतोय फोल...**

**एजन्सी बाहेर ग्राहकांच्या रांगा...**



**विपीन वीर**
**धाराशिव, दि.२३ मार्च -**

धाराशिव शहरात घरगुती गॅस सिलिंडर मिळवण्यासाठी नागरिकांना अक्षरशः त्रास सहन करावा लागत असून, गॅस एजन्सी चालकांच्या अनागोंदी कारभारामुळे नागरिक हैराण झाले आहेत. भर उन्हातही गॅससाठी लांबच लांब रांगा लागत असून, केंद्रावरील गर्दी काही केल्या कमी होत नाही.

शहरातील विविध गॅस वितरण केंद्रांवर सकाळपासूनच नागरिकांची मोठी गर्दी होत आहे. अनेकांना तासन्तास उन्हात उभे राहूनही गॅस मिळत नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे. महिलांसह ज्येष्ठ नागरिकांनाही या त्रासाचा मोठा फटका बसत आहे.





दरम्यान, प्रशासनाकडून जिल्ह्यात कुठेही गॅसची टंचाई नसल्याचा दावा करण्यात येत आहे. पुरेसा गॅस साठा उपलब्ध असल्याचे सांगितले जात असले तरी प्रत्यक्षात मात्र नागरिकांना वेळेवर सिलिंडर मिळत नाही. त्यामुळे एजन्सी स्तरावरच कृत्रिम टंचाई निर्माण केली जात असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

काही ठिकाणी होम डिलिव्हरी वेळेत होत नसल्याच्या तक्रारीही समोर येत आहेत. ऑनलाईन बुकिंग करूनही सिलिंडर वेळेवर मिळत नसल्याने ग्राहकांना स्वतः केंद्रावर जाऊन गॅस घ्यावा लागत आहे. यामुळे गर्दीत आणखी भर पडत आहे.

### कारवाईची मागणी जोर धरतेय...

या सर्व पार्श्वभूमीवर गॅस पुरवठा करणाऱ्या एजन्सींवर तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून दोषी एजन्सींवर कठोर कारवाई करावी, तसेच वितरण व्यवस्थेत सुधारणा करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. सध्या तरी गॅस आहे पण मिळत नाही अशी स्थिती निर्माण झाल्याने धाराशिवकरांच्या संतापाचा भडका उडाला आहे. प्रशासनाने तातडीने याकडे लक्ष देणे गरजेचे ठरत आहे.

## देवीच्या दर्शनासाठी निघालेल्या भाविकांच्या कारला आग





**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२३ मार्च -**

उमरगाहून तुळजाभवानी मंदिर येथे दर्शनासाठी निघालेल्या भाविकांच्या इर्टीका कारला सोलापूर-हैदराबाद राष्ट्रीय महामार्गावर दि. २३ मार्च रोजी दुपारी पावणे पाच वाजण्याच्या सुमारास नळदुर्गजवळ मुर्टापाटीच्या पुढे अचानक आग लागली. या आगीत कार पूर्णपणे जळून खाक झाली असून सुदैवाने गाडीत असलेले सर्व सातही भाविक सुखरूप बचावले.

मिळालेल्या माहितीनुसार, उमरगा येथील आकाश दिनकर अंधारे हे इर्टीका (क्र. एमएच २५ बीएफ १६०४) कारने आपल्या कुटुंबासह तुळजापूर येथे दर्शनासाठी निघाले होते. नळदुर्ग बायपास रोडवरील मुर्टापाटीजवळ पोहोचताच गाडीतून धूर येऊ लागल्याचे चालक पुरुषोत्तम रघुनाथ सूर्यवंशी यांच्या लक्षात आले. त्यांनी प्रसंगावधान राखत तात्काळ गाडी रस्त्याच्या कडेला उभी करून सर्वांना खाली उतरवले.

क्षणातच गाडीने पेट घेतल्याने इर्टीका कार पूर्णपणे जळून खाक झाली. मात्र चालकाच्या सतर्कतेमुळे मोठी दुर्घटना टळली. गाडीत तीन महिला, दोन पुरुष आणि दोन लहान मुले असे एकूण सात जण प्रवास करत होते. घटनेची माहिती मिळताच नळदुर्ग नगरपालिकेचे अग्निशमन दल, महामार्ग पोलीस तसेच नळदुर्ग पोलीस ठाण्याचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आग विझविण्याचा प्रयत्न केला, मात्र तोपर्यंत कार पूर्णतः जळून खाक झाली होती.

या घटनेमुळे काही काळ राष्ट्रीय महामार्गावर खळबळ उडाली होती.

## खेडच्या स्मिता शिंदेचे एमपीएससीत यश

### मंडल कृषी अधिकारी पदाला गवसणी...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ मार्च -**

महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) वतीने घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेत धाराशिव तालुक्यातील खेड येथील स्मिता जयंत शिंदे हिने उल्लेखनीय यश संपादन करत मंडल कृषी अधिकारी (वर्ग-२) पदाला गवसणी घातली आहे. तिने ४५० पैकी २९३ गुण मिळवत ओबीसी महिला प्रवर्गातून राज्यात १७ वा क्रमांक मिळवला आहे.

स्मिता शिंदे हिने यापूर्वीही एमपीएससी परीक्षेत मुलाखतीपर्यंत मजल मारली होती. सातत्यपूर्ण प्रयत्न, नियमित अभ्यास आणि जिद्दीच्या जोरावर अखेर तिने यश मिळवत आपल्या कुटुंबाचे व गावाचे नाव उज्ज्वल केले आहे.



प्राथमिक व माध्यमिक शिक्षण धाराशिव येथे झाले. पुढे तिने कोल्हापूर येथून बीएससी (अ‍ॅग्री) आणि पुणे येथून एमएस्सी (अ‍ॅग्री) पदवी पूर्ण केली. सध्या ती राहुरी येथील कृषी विद्यापीठात पीएचडीसाठी संशोधन करत आहे.

स्मिता हिचे वडील जयंत शिंदे हे प्रगतिशील शेतकरी असून आई गृहिणी आहे. तिच्या या यशाबद्दल परिसरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## ऊस बिलासाठी शेतकऱ्यांचा आत्मदहनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२३ मार्च -**

गोकुळ शुगर इंडस्ट्रिज या कारखान्याकडून ऊसाचे थकीत बिल तात्काळ द्यावे, अन्यथा २५ मार्च २०२६ रोजी सोलापूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा इशारा नळदुर्ग येथील चार शेतकऱ्यांनी दिला आहे. याबाबतचे निवेदन त्यांनी जिल्हाधिकारी सोलापूर यांना सादर केले आहे.

निवेदनानुसार, तुळजापूर तालुक्यातील शेकडो शेतकऱ्यांनी धोत्री येथील गोकुळ शुगर इंडस्ट्रिजला ऊस गाळपासाठी दिला आहे. नळदुर्ग येथील सोमनाथ कसेकर, सुनिल चौधरी, स्वप्नील तानाजी काळे व आबेदतुल्ला इनामदार यांनीही २०२४, २०२५ व २०२६ या वर्षांत ऊस दिला, मात्र अद्याप बिल मिळाले नाही. २० फेब्रुवारी रोजी थकीत बिल देण्याचे आश्वासन कारखान्याकडून देण्यात आले होते. तरीही वारंवार पाठपुरावा करूनही बिल न मिळाल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. वैद्यकीय खर्च, लग्नकार्ये आदी कारणांमुळे त्यांची परिस्थिती गंभीर झाली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने हस्तक्षेप करून कारखान्यावर कारवाई करावी व थकीत बिल मिळवून द्यावे, अन्यथा २५ मार्च रोजी आत्मदहन करण्यात येईल, असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे.

या निवेदनाच्या प्रती साखर आयुक्त कार्यालय सोलापूर, जिल्हा पोलिस अधीक्षक तसेच राणाजगजितसिंह पाटील यांनाही देण्यात आल्या आहेत.

## मारुती बनसोडे यांचा समाज कल्याण कार्यालयाकडून सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२३ मार्च -**

नळदुर्ग येथील परिवर्तन सामाजिक संस्थेचे संस्थापक सचिव मारुती बनसोडे यांना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र शासन यांच्या वतीने दिला जाणारा 'राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार (२०२३-२४)' जाहीर झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.



नशा बंदी मंडळ महाराष्ट्र चे धाराशिव जिल्हा संघटक तसेच परिवर्तन सामाजिक संस्थेचे संस्थापक सचिव असलेल्या मारुती बनसोडे यांचा सत्कार जिल्हा परिषद धाराशिवचे जिल्हा समाज कल्याण अधिकारी सचिन कवले यांच्या हस्ते दि. २३ मार्च रोजी करण्यात आला.

यावेळी समाज कल्याण निरीक्षक अमोल कातंगळे उपस्थित होते.

## सावळसूर येथे शेत पाणंद रस्त्याचे भूमिपूजन संपन्न

### शरण पाटील यांच्या आश्वासनाची पूर्तता...

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२३ मार्च -**

निवडणुकीच्या काळात दिलेले आश्वासन पूर्ण करत विधानसभा समितीचे सह-अध्यक्ष शरण बसवराज पाटील यांच्या हस्ते उमरगा तालुक्यातील सावळसूर येथे शरण पाटील फाउंडेशनच्या माध्यमातून शेत पाणंद रस्त्याचे भव्य भूमिपूजन संपन्न झाले.

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या प्रचारादरम्यान सावळसूर येथील पाणंद रस्त्याचा प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन शरण पाटील यांनी ग्रामस्थांना दिले होते.

आज या कामाचा प्रत्यक्ष शुभारंभ झाल्याने सावळसूर परिसरातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. यावेळी बोलताना शरण पाटील म्हणाले की, शरण पाटील फाउंडेशनच्या माध्यमातून उमरगा आणि लोहारा तालुक्यात आम्ही पाणंद रस्त्यांचे जाळे विणले असून हे काम भविष्यातही अविरत सुरू राहील.



देवेंद्र फडणवीस आणि चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली या रस्त्यांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देऊन हा रस्ता अधिक सक्षम करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

उमरगा-लोहारा तालुक्यात राबविलेल्या बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेचा आदर्श 'पॅटर्न' संपूर्ण महाराष्ट्रासाठी उभा करू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सावळसूर ते चिरेवाडी आणि आकाश इंगळे यांच्या शेतापासून ते दगडू येमगर यांच्या शेतापर्यंतचा सुमारे २ किलोमीटर लांबीचा हा रस्ता केवळ शेतकऱ्यांसाठीच नव्हे, तर सावळसूर, चिरेवाडी आणि परिसरातील गावांसाठी दळणवळणाची महत्त्वाची वाहिनी ठरणार आहे. या रस्त्यामुळे वाहतुकीचा दीर्घकालीन प्रश्न सुटणार असून शेतीमालाच्या वाहतुकीला गती मिळणार आहे.

या कार्यक्रमास भाजपाचे दिलीप भालेराव, रफिक तांबोळी, श्याम चिंचोळे, योगेश राठोड, सचिन पाटील, आकाश इंगळे, प्रेमनाथ सूर्यवंशी, कमलाकर पाटील, ज्ञानेश्वर पाटील, बाबुराव सूर्यवंशी, भास्कर बोधे, शाहूराज सूर्यवंशी यांच्यासह सावळसूर व परिसरातील नागरिक व शेतकरी उपस्थित होते.


## आरळी-काळेगाव मार्ग २५ वर्षांपासून खड्डेमय; नागरिकांचा संताप वाढला

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२३ मार्च -**

तालुक्यातील आरळी (खुर्द) - आरळी (बु.) - काळेगाव हा अत्यंत महत्त्वाचा प्रमुख जिल्हा मार्ग गेल्या तब्बल २५ वर्षांपासून दुरवस्थेत असून नागरिकांचे हाल दिवसेंदिवस वाढत आहेत. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून अनेक ठिकाणी रस्ता पूर्णतः उखडून गेला आहे. त्यामुळे वाहनचालकांना अक्षरशः तारेवरची कसरत करत प्रवास करावा लागत आहे.

खराब रस्त्यामुळे वारंवार अपघात होत असून परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रशासनाकडून दीर्घकाळ कोणतीही ठोस दखल घेतली गेली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. काही वर्षांपूर्वी हा रस्ता जिल्हा नकाशावरूनही गायब असल्याने निधी मिळण्यात अडथळे आले होते. परिस्थिती असह्य झाल्यानंतर ग्रामस्थांनी वर्गणी गोळा करून स्वखर्चातून रस्त्याची डागडुजी केली. मात्र ही उपाययोजना तात्पुरती ठरली आणि काही काळातच रस्ता पुन्हा खराब झाला. सध्या रस्ता नकाशावर समाविष्ट असूनही संबंधित विभागाकडून दुरुस्तीबाबत कोणतीही हालचाल होत नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी आहे.

लोकसभा, विधानसभा आणि जिल्हा परिषद निवडणुकांदरम्यान हा प्रश्न वारंवार मांडण्यात आला. प्रत्येकवेळी लोकप्रतिनिधींनी दुरुस्तीची आश्वासने दिली; मात्र निवडणुका संपल्यानंतर दुर्लक्ष झाल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. सतत पाठपुरावा करूनही प्रश्न मार्गी लागत नसल्याने स्थानिक लोकप्रतिनिधीही हतबल झाल्याचे चित्र आहे. आरळी (खुर्द) - आरळी (बु.) - काळेगाव हा मार्ग शिक्षण, आरोग्य, व्यापार आणि सामाजिक जीवनाचा कणा मानला जातो. त्यामुळे या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करणे अत्यावश्यक असल्याची मागणी जोर धरत आहे.





### बस सेवा बंद; विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान

रस्त्याची अत्यंत खराब अवस्था लक्षात घेऊन एसटी महामंडळाने या मार्गावरील बस सेवा काही काळ बंद केली होती. त्यामुळे विद्यार्थ्यांना तुळजापूरला शिक्षणासाठी जाणे कठीण झाले. अनेकांना शिक्षण सोडण्याची वेळ आली, तर काहींना खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागल्याने खर्च वाढला.

### आमदारांकडे ठोस कारवाईची मागणी

स्थानिक नागरिकांनी राणाजगजितसिंह पाटील यांच्याकडे तातडीने लक्ष घालण्याची मागणी केली आहे. रस्ता तात्काळ दुरुस्त करून नागरिकांची गैरसोय दूर करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

## अग्रलेख...

# विनाशाच्या दिशेने...

लष्करी उद्दिष्टे साध्य झाली की युद्ध अथवा संघर्ष थांबविणे हे शहाणपणाचे लक्षण असते. 'ऑपरेशन सिंदूर' दरम्यान दहशतवादी तळ नष्ट केल्यानंतर भारताने लगेच कारवाई थांबविली. पाकिस्तानात घुसून हवाई हल्ले करण्यात आले होते. भारतीय लष्कराने जे लक्ष्य निश्चित केले होते, ते साध्य केल्यानंतर संघर्ष वाढणार नाही याची काळजी घेतली गेली होती. मात्र, पाकिस्तानने मागचा पुढचा विचार न करता भारताच्या दिशेने शेकडो क्षेपणास्त्रे आणि ड्रोन्स पाठविली. काही तासांच्या या छोटेखानी संघर्षात पाकिस्तानला ११ हवाई तळांचे नुकसान सहन करावे लागले. सुदैवाने दोन दिवसांतच हा संघर्ष शमला. खरे तर युद्धबंदीची याचना केली नसती तर त्याचे परिणाम काय होतील, याची जाणीव पाकिस्तानला झाली होती. त्यामुळे युद्ध थांबविण्याची विनंती करीत पाकिस्तानने होणारे नुकसान टाळले. असे आखातात घडताना दिसत नाही; संघर्ष लांबत आणि वाढत चालला आहे. इराण आणि इस्रायल-अमेरिकेला अद्याप परिपक्वता दाखविता आली नाही, असेच सध्याच्या संघर्षाबाबत म्हणावे लागेल. मध्यपूर्वेतील संघर्ष दिवसेंदिवस भीषण रूप धारण करीत आहे. ना इराण मागे हटायला तयार आहे, ना इस्रायल-अमेरिका. इराण जास्तीत जास्त एक आठवडा युद्ध करू शकेल, असा अंदाज डोनाल्ड ट्रम्प यांनी बांधला असावा. तथापि, रविवारी युद्धाने २३ व्या दिवसांत प्रवेश केला आहे. इराणच्या लष्करी शक्तीबाबत इस्रायल-अमेरिकेने बांधलेले अंदाज पूर्णपणे चुकले आहेत.

अमेरिकेसारख्या शक्तिशाली आणि तंत्रज्ञानाने युक्त इस्रायलच्या तोंडाला इराणने फेस आणला आहे. तेहरानपासून इस्रायल जवळपास दोन हजार किलोमीटर दूर आहे; पण हा देशही क्षेपणास्त्रांच्या माऱ्याने घायाळ झाला. इराण ज्या प्रकारे लढतो आहे, ते पाहून जग स्तिमित झाले आहे. इस्रायल-अमेरिकेच्या हवाई हल्ल्यांपुढे इराण झुकलेला नाही. सर्वोच्च नेत्यांपासून तर अगदी गुप्तचर संस्थेच्या प्रमुखापर्यंत धार्मिक, राजकीय आणि लष्करी नेते युद्धात मारले गेले असले तरी इराणी सेना लढतेच आहे. तिन्ही देशांसाठी हे युद्ध आता आत्मसन्मानापर्यंत पोहोचले आहे. इराण बेचिराख होण्याच्या अवस्थेपर्यंत पोहचला तरी रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत लढण्याची भाषा करतो आहे. दुसरीकडे अमेरिका आपले नाक कापले जाणार नाही यासाठी लढतो आहे. इराणची अण्वस्त्रनिर्मिती क्षमता नष्ट करणे आणि त्यासाठी आण्विक प्रकल्प आणि लष्करी क्षमता नष्ट करणे ही अमेरिका-इस्रायलची उद्दिष्टे असावीत असा अंदाज दिसून येतो. असे असले तरी वास्तविकता वेगळी आहे. आजच्या जगात कुणालाही कमजोर समजण्याची चूक करता येणार नाही. बलाढ्य रशियासोबत युक्रेन अजूनही झुंजतो आहे. इराणचा प्रश्न हा युद्धाने सुटणारा नसल्याचे सांगत आंतरराष्ट्रीय अणुसंस्थेचे महासंचालक रफायल ग्रोसी यांनी अमेरिका आणि इस्रायलला आरसा दाखविला. साधने नष्ट करता येतात; पायाभूत सुविधा जमीनदोस्त केल्या जाऊ शकतात, पण एखाद्या देशाची महत्त्वाकांक्षा नष्ट केली जाऊ शकत नाही. आण्विक अस्त्रे तयार करणे ही इराणची महत्त्वाकांक्षा राहिली आहे. ग्रोसी यांनी इशारा देताना एकप्रकारे अमेरिकेला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले आहे. अणुबॉम्ब तयार करण्याच्या लक्ष्यापासून इराणला युद्धाच्या माध्यमातून दूर करता येणार नाही. लढाईत आतापर्यंत इराणच्या आण्विक प्रकल्पांची किती हानी झाली हे मोजता येणार नाही. अणुप्रकल्प आणि उपकरणे नष्ट झाली तरी ती पुन्हा प्राप्त केली जाऊ शकतात. ग्रोसी यांनी खरा प्रश्न उपस्थित केला तो इराणकडे असलेल्या जवळपास ४०० किलो युरेनियमचा. युद्ध संपले तरी हे युरेनियम इराणकडेच राहणार आहे. या युरेनियमची समृद्धता साठ टक्क्यांच्या आसपास आहे, जी अणुबॉम्ब तयार करण्याच्या पातळीजवळ आहे. अणुबॉम्ब तयार करण्याचे ज्ञान इराणी शास्त्रज्ञांनी मिळविले आहे. हे ज्ञान कसे हिसकावून घेणार, असा प्रश्न ग्रोसी यांनी उपस्थित केला आहे. त्यामुळे इराणच्या आण्विक क्षमतेवर युद्ध हा पर्याय होऊच शकत नाही. चर्चा आणि वाटाघाटी हाच एकमेव मार्ग असल्याचे ग्रोसी यांनी म्हटले आहे.

तेहरानला आण्विक तंत्रज्ञान आणि उपकरणांची मदत कुणी केली हे उघड आहे. चीन, पाकिस्तान आणि रशिया आजही ठामपणे इराणच्या पाठीमागे उभे आहेत. या देशांना इराणशी काही देणेघेणे नसले तरी अमेरिकेची जगात होत असलेली फजिती त्यांच्यासाठी महत्त्वाची आहे. स्वतःला जगाचा पोलिस समजणारा अमेरिका किती पाण्यात आहे हे जगाला दिसून आले आहे. अण्वस्त्रे धारण करण्याची इच्छा बाळगण्यामागे केवळ पाश्चिमात्य देशांची भीती एवढे कारण नाही. खरे कारण आहे ते सुन्नीपंथीय देशांचे. शियाबहुल इराणला सातत्याने सुन्नी बहुसंख्यक असलेल्या अरब देशांची भीती वाटत आली आहे. तेहरानच्या मनातून अजूनही करबला गेलेले नाही. आजच्या काळात करबला घडण्याची सुतराम शक्यता नसली तरी या भीतीमागे धार्मिक विचारधारेचा आधार आहे. ज्याप्रमाणे पाकिस्तान आणि भारतातील काही गद्दार कट्टरपंथीय एक ना एक दिवस 'गजवा-ए-हिंद' होईलच या आशेवर जीवन कंठत आहेत, तशीच विचारधारा करबला संदर्भात आहे. पण, अमेरिका आणि पाश्चिमात्य देशांना यामध्ये पडण्याचे कारण काय, तर मध्यपूर्वेत असलेले लष्करी तळ होय. या लष्करी तळांमुळेच आज मध्यपूर्वेतील देशांना इराणच्या हल्ल्यांचा सामना करावा लागत आहे. कतार, सौदी अरब, संयुक्त अरब अमिरात, बहरीन, कुवेत या देशांना इराणमुळे मोठे नुकसान सहन करावे लागत आहे. तेल आणि गॅसच्या बळावर एवढी वर्षे समृद्धीत लोळणाऱ्या या देशांना इराणच्या रूपाने मोठे संकट सीमेवर उभे असल्याची जाणीव झाली आहे. युद्धाचा निकाल काय लागेल, हे कुणीही ठामपणे सांगू शकणार नाही. हवाई हल्ल्यांनी जमिनीवरील नुकसान होत असले तरी कुणी शरणागती पत्करल्याशिवाय अथवा भूभागावर ताबा मिळविल्याशिवाय युद्धाचा निर्णय लागत नसतो. अमेरिका अथवा इस्रायल इराणमध्ये थेट सैन्य घुसविण्याचा धोका पत्करणार नाहीत एवढे निश्चित दिसते. जमिनीवरील युद्धात इराणी सैन्याला पराभूत करणे कितपत शक्य आहे हा प्रश्नच आहे. त्यामुळे हवाई हल्ले करून इराणला उद्ध्वस्त करणे हाच एकमेव उपाय उरला आहे. हा संघर्ष आता आण्विक तळांवर हल्ले करण्यापर्यंत येऊन पोहोचला आहे. शनिवारी इस्रायलने इराणच्या नतांझ या आण्विक तळाला लक्ष्य केले. याला प्रत्युत्तर म्हणून इराणनेही इस्रायलच्या डिमोना आणि अराद या शहरांवर आंतरखंडीय क्षेपणास्त्र डागले. डिमोना येथे आण्विक प्रकल्प आहे. 'आयर्न डोम' ही यंत्रणाही या क्षेपणास्त्रांना निकामी करू शकली नाही. अराद येथील हल्ल्यात शंभरपेक्षा जास्त नागरिक जखमी झालेत. क्षेपणास्त्रांमुळे नुकसान झाल्याची कबुली बेंजामिन नेत्यान्याहू यांनी दिली आहे. यावरून हे युद्ध आता घातक वळण घेत असल्याचे दिसते आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी होर्मूझ खाडी ४८ तासांत रिकामी करण्याचा इशारा इराणला दिला आहे. तसे न केल्यास वीज प्रकल्पांवर हल्ले करण्याची धमकी दिली आहे. त्यामुळे आगामी आठवडा जगाची कसोटी घेणारा ठरणार आहे. काहीही झाले तरी शत्रूंची जहाजे होर्मूझमधून जाणार नाहीत, असा ठाम पवित्रा इराणने घेतला. एवढेच नव्हे तर होर्मूझच्या आसपास अमेरिकेचे एफ-१५ हे लढाऊ विमान पाडल्याचा दावा करीत इराणने ट्रम्प यांना डिवचले आहे. नतांझ आण्विक प्रकल्पावर हल्ला करूनही इराण मागे हटलेला नाही. जग आण्विक युद्धाच्या दिशेने तर जात नाही ना, अशी भीती निर्माण झाली आहे. अमेरिकेचे अणुप्रकल्प माऱ्याच्या टप्प्यात नसले तरी इस्रायल-इराण एकमेकांच्या अणुप्रकल्पांवर हल्ले करीत आहेत. जागतिक शांततेसाठी हे धोकादायक असून संयुक्त राष्ट्र संघाने हस्तक्षेप करण्याची गरज निर्माण झाली आहे. अन्यथा दोन महायुद्धांचा अनुभव घेतलेल्या जगाला आणखी महासंहारक स्थितीला सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे.

## दिल्ली दिनांक

रवींद्र दाणी

# घायाळ खामेनी अधिक घातक

सत्ता आणि संताप! सत्तेची धुंदी आणि संतापाचा उद्रेक- या दोन मानसिक अवस्थांचे रसायन फार घातक असते. भारताने हे अनुभवले आहे. १९४७ च्या विभाजनानंतर भारतात झालेली सर्वाधिक भयावह दंगल होती- दिल्लीची. १९८४ मध्ये इंदिरा गांधींची हत्या झाली, राजीव गांधी पंतप्रधान झाले. नव्याने मिळालेली सत्ता आणि आपल्या आईच्या हत्येचा स्वाभाविक संताप या रसायनातून दिल्लीत तीन दिवस दंगल सुरू होती. दिल्लीचा सारा आसमंत मानवी मांसाच्या जळक्या वासाने कुंद झाला होता. चार हजारांवर लोक तीन दिवसांत ठार झाले होते. इराणचे नवे सर्वोच्च नेते मोताबा खामेनी यांचे आई-वडील, पत्नी, एक मुलगा असे चार जवळचे नागरिक पहिल्या दिवशीच्या हल्ल्यात ठार झाले. आता हेच खामेनी इराणचे नेते झाले आहेत. त्यांना अगोदरच कट्टरपंथी मानले जाते. आपल्या कुटुंबातील चार सदस्य गमावल्यानंतर त्यांच्याजवळ आणखी गमावण्यासारखे काही नाही. आपल्याला केव्हाही ठार केले जाऊ शकते याची पूर्ण कल्पना त्यांना आहे. सत्ता, संताप आणि कोणत्याही दिवशी येऊ शकणारा संभाव्य मृत्यू याचे प्रतिबिंब त्यांच्या बेदरकार निर्णयात दिसत आहे. आणि याने सारे मध्यपूर्व आगीच्या ज्वाळांमध्ये धुमसू लागले आहे.

**दोघेही बेदरकार :** इराणचे सर्वेसर्वा मोताबा खामेनी बेदरकारपणे वागत असताना, जगातील सर्वांत शक्तिशाली देशाचे नेतेही बेदरकार वागत आहेत. इराणचे युद्ध सुरू झाले ते त्याच्या आण्विक प्रकल्पावरून आणि आता ते स्थिरावले आहे- इराणच्या हार्मूझ खाडीवर. इराणने ही खाडी बंद केली आहे. ती पुन्हा जहाजांसाठी सुरू करण्यासाठी अमेरिका प्रयत्न करीत आहे. राष्ट्रपती ट्रम्प यांच्यासाठी तो जणू प्रतिष्ठेचा मुद्दा झाला आहे. इराण ही खाडी बंद करील असे आम्हाला वाटले नव्हते असे अमेरिकन प्रशासनाने सांगितले आहे. अमेरिकन अधिकाऱ्यांचे हे विधान बालिशच म्हणावे लागेल. इराणवर हल्ला झाल्यास तो जगाची आर्थिक नाकेबंदी करण्यासाठी ही खाडी बंद करील हे अमेरिकेने गृहीत धरावयास हवे होते. त्याचा विचारही अमेरिका व राष्ट्रपती ट्रम्प यांनी केला नव्हता. इराणच्या निर्णयानंतर आता ते जागे झाले आहेत.

**योजनाच नाही :** अमेरिका-इराण युद्धाबाबत माजी राष्ट्रपती बिल क्लिंटन नियमित भाष्य करीत आहेत. हार्मूझ खाडी प्रकरणावर त्यांनी म्हटले आहे, ''मी राष्ट्रपती असताना, इराणच्या विरोधात काही निर्णय घेण्याचा विचार मी निश्चित केला होता. मात्र, ते निर्णय घेण्यापूर्वी, माझ्या निर्णयावर इराणची प्रतिक्रिया काय असेल याचा अंदाज घेण्यास मी सीआयएला सांगितले होते आणि प्रत्येक वेळी सीआयएने मला, इराण हार्मूझची खाडी बंद करण्याचा निर्णय घेईल असे सांगितले होते.'' इराणचे युद्ध सुरू करण्यापूर्वी अमेरिकन प्रशासनाने याचा अंदाज घेतला नव्हता काय, असा भेदक प्रश्न क्लिंटन यांनी विचारला आहे. विशेष म्हणजे क्लिंटन यांनी एकदाही राष्ट्रपती ट्रम्प यांचे नाव घेतलेले नाही. अमेरिकेने हे युद्ध सुरू तर केले, पण कोणतीही व्यूहरचना न करता. आपल्या मित्रराष्ट्रांना विश्वासात न घेता आणि घटनात्मकदृष्ट्या आवश्यक असणाऱ्या अमेरिकन काँग्रेसची मंजुरी न घेता.

**जनसमर्थन :** अमेरिकेने इराणवर हल्ला केल्यानंतर तेथील जनता आपल्या सरकारच्या विरोधात रस्त्यावर येईल आणि आपण या देशात सत्ताबदल घडवून आणू असा अमेरिकेचा अंदाज होता. तसे काहीही झालेले नाही. इराणची जनता रस्त्यावर उतरत आहे. पण, आपल्या सरकारच्या विरोधात नाही तर अमेरिकेच्या विरोधात. अमेरिकेला नाही तर आपल्या सरकारला पाठिंबा देण्यासाठी.

**अधिक हिंसाचाराकडे? :** राष्ट्रपती ट्रम्प आता याला आवर घालण्याची तयारी करीत आहेत काय? त्यांच्या एका निर्णयावरून तो निष्कर्ष काढला जात आहे. यूएसएस ट्रिपोली ही अमेरिकेची युद्धनौका जपानच्या बंदरावर तैनात होती. तिला इराणकडे जाण्यास सांगण्यात आले आहे. या नौकेवर २५०० अमेरिकन सैन्य असून, समुद्र किनाऱ्यावर उतरण्याची व्यवस्था या जहाजावर आहे. म्हणजे आजवर केवळ हवाई हल्ले करणारी अमेरिका, आता इराणमध्ये आपले सैन्य उतरवून तेथे सत्ता काबीज करण्याचा प्रयत्न करणार काय, असा प्रश्न विचारला जाऊ लागला आहे. तसा प्रयत्न झाल्यास त्याला स्थानिक इराणी नागरिक जोरदार प्रतिकार करतील असे मानले जाते. कारण, एका घटनेने इराणी जनमत अमेरिकेच्या विरोधात गेले आहे.

**निर्णायक वळण :** इराण विरोधातील हे युद्ध अमेरिकेच्या विरोधात जाणारे निर्णायक वळण होते एका शाळेवर झालेला हल्ला व त्यात १७० विद्यार्थिनींचे ठार होणे. प्रथम तर अमेरिकेने या हल्ल्यासाठी इराणला जबाबदार ठरविले होते. पण, ज्या तोमाहॉक प्रक्षेपणास्त्राने हा हल्ला करण्यात आला, ते तोमाहॉक प्रक्षेपणास्त्र अमेरिकेत तयार होते. त्यामुळे इराणच्या या आरोपाचा अमेरिकेला फार प्रतिवाद करता आला नाही. आता समोर आलेल्या नव्या माहितीनुसार, ज्या शाळेवर हा हल्ला करण्यात आला, ती शाळा पूर्वी इराणी लष्कराचे एक केंद्र होती. तशी नोंद अमेरिकेजवळ होती. नंतर इराणने हे केंद्र बंद करून, लष्कराची ही इमारत शाळा सुरू करण्यासाठी दिली. मात्र हा नवा बदल अमेरिकन लष्कराजवळ नव्हता. त्यांनी त्या इमारतीला लष्करी केंद्र समजून त्यावर हल्ला चढविला आणि त्यात १७० विद्यार्थिनी ठार झाल्या. हा या युद्धातील एक निर्णायक टप्पा ठरला व इराणी जनमत अमेरिकेच्या विरोधात गेले.

**नवा भडका :** इराणने हार्मूझची खाडी बंद केल्यापासून जगात कच्च्या तेलाच्या किमती अपेक्षितपणे वाढल्या आहेत. आता ही खाडी खुली करण्यासाठी चीन, फ्रान्स, ब्रिटन यांनी आपापल्या युद्धनौका पाठवाव्यात असे ट्रम्प यांनी म्हटले आहे. इराणने ही खाडी बंद करण्याचा निर्णय घेतला, तोच मुळी चीनच्या सांगण्यावरून आणि ट्रम्प चीनने ही खाडी मोकळी करण्यासाठी आपल्या युद्धनौका पाठवाव्यात असे म्हणत आहेत. ही खाडी बंद झाल्याने चीनचे काहीही बिघडणारे नाही. त्याला तर जगात हाहाकार हवा आहे. जगात आर्थिक हाहाकार झाल्यास, आपल्या अर्थव्यवस्थेला उठाव मिळेल असे त्याचे आकलन आहे. इराण आता अमेरिकन बँकांना लक्ष्य करीत आहे, जे चीनला हवे आहे.

अमेरिकेने लष्करी ताकदीच्या बळावर ही खाडी खुली करण्याचा प्रयत्न केल्यास, इराण अधिक संतप्त होत, आखाती देशांत अमेरिकेच्या प्रतिष्ठानांवर तसेच अमेरिकेच्या मित्रराष्ट्रांच्या महत्त्वाच्या प्रतिष्ठानांवर हल्ले चढवीत आहे. याने हा संघर्ष अधिक भीषण होईल, अशी शक्यता आताच वर्तविली जात आहे.

**जागतिक परिणाम :** रशिया-युक्रेन यांच्यात सुरू असलेल्या युद्धाचा जागतिक बाजारपेठेवर परिणाम झाला, पण तो मर्यादित होता. या युद्धाची किंमत प्रामुख्याने रशिया व युक्रेन यांना मोजावी लागत आहे. पण, मध्यपूर्वेत सुरू असलेल्या या युद्धाचे मात्र तसे होणार नाही. युद्ध सुरू होण्यापूर्वी आंतरराष्ट्रीय बाजारात कच्चे तेल ७३ डॉलर प्रति बॅरल या दराने मिळत होते. आता ते ११० डॉलरपर्यंत पोहोचले आहे. याचा अर्थ युद्धाचा परिणाम साऱ्या जगावर होणार आहे. या स्थितीचा फायदा उठवीत रशियानेही आपल्या तेलाची किंमत वाढविली असल्याचे समजते. आता त्याने भारताला स्वस्त दरात तेल देण्यास नकार दिला आहे. भारताने अमेरिकेच्या आग्रहाखातर आपल्याकडून तेल घेणे बंद केले होते ही बाब रशियाला पटलेली नाही. खाडी युद्धात जुनी जागतिक समीकरणे कोलमडून पडणार आणि नवी समीकरणे आकार घेणार. युद्धानंतरचे नवे जग कसे असेल? नवी समीकरणे कशी असतील? जगाच्या बदलणाऱ्या चेहऱ्यामोहऱ्याची कल्पना सध्या मात्र कुणालाही करता येणार नाही.

## वेध

पुंडलिक आंबटकर

# समाजद्रोही साम्यवादाचे हजारो बळी

सहा दशकांपासून नक्षल्यांच्या हिंसक कारवायांमुळे भयभीत आदिवासी जीवन आता मोकळा श्वास घेऊ लागले आहे. ३१ मार्च २०२६ पर्यंत देशातून सशस्त्र नक्षलवाद पूर्णतः नष्ट करण्याचा संकल्प केंद्र सरकारचा आहे. आता यासाठी मोजकेच दिवस उरल्याने नक्षलवाद खरोखरच पूर्णतः समाप्त होईल का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. बहुतांश नक्षल्यांनी आत्मसमर्पण केले असून उर्वरित नक्षल्यांना निष्क्रिय करण्यात आले आहे. तरीही मिसिर बेसरा, पापाराव आणि असिम मंडलसारख्या नक्षलवाद्यांचे आव्हान कायम आहे. शासकीय माहितीनुसार, देशात फक्त १९६ नक्षलवादी उरले असून यातील केवळ २५ ते ३० टक्केच नक्षल्यांकडे शस्त्रे आहेत. उर्वरित नक्षली शस्त्रधारी नक्षल्यांच्या दबावाखाली जंगलात जीव वाचविण्यासाठी भटकत आहेत. पापाराव नावाचा उग्र नक्षली १०० साथीदारांसह छत्तीसगडमध्ये तर मिसिर बेसरा हा झारखंडमध्ये ७० नक्षल्यांसह सक्रिय आहे. तेलंगणामध्ये २० आणि महाराष्ट्राच्या जंगलात अवघे ६ नक्षलवादी उरले आहेत. यातील फक्त एक भामरागडचा असून उर्वरित पाच छत्तीसगडचे आहेत. ११ नक्षल्यांनी नुकतेच गडचिरोली पोलिसांपुढे आत्मसमर्पण केले.

नक्षली नेते आपल्या नावापुढे कॉम्रेड हा शब्द लावतात. डाव्या विचारसरणीच्या दृष्टीने कॉम्रेड म्हणजे साम्यवादी होय. हजारो आदिवासींच्या हत्या करून या लोकांना नेमका कोणता साम्यवाद अपेक्षित होता, हे एकदा नक्षल्यांच्या समर्थकांनी समजावून सांगितले पाहिले. या चळवळीने हजारो निष्पाप नागरिकांच्या हत्या घडवून आणल्या. कित्येकांचे गळे कापले तर कित्येकांना गोळ्या घातल्या. नक्षल्यांच्या हल्ल्यात हजारो जवानांनी प्राणाची आहुती दिली. नक्षल्यांचा तथाकथित महासचिव देवजी तसेच रूपेश, रामधेर, भूपती, बारसे देवा, प्रवक्ता अनंत आणि



मोहन कडतीसारख्या नक्षलवादी नेत्यांनी आपल्या हजारो साथीदारांसह शस्त्रे खाली टाकली. परंतु, देवजी आणि बारसे देवासारखे कट्टर माओवादी शरणागती पत्करली नसल्याचेच सांगत आहेत. भविष्यात निवडणुका लढविण्याचा संकल्पही देवजीने एका मुलाखतीत बोलून दाखविला.

एकूणच सशस्त्र माओवादी चळवळ नष्ट झाली तरी तिला नवे स्वरूप देण्याचा माओवाद्यांचा मानस लपून राहिलेला नाही. समाजात साम्यवाद रुजविण्यासाठी प्रेम, समर्पण आणि त्यागाची गरज असते. परंतु, माओवाद्यांनी शस्त्रांच्या धाकावर गोरगरिबांचे गळे कापले. ही चळवळ कुठल्या कारणांसाठी सुरू झाली, याची कारणमीमांसा शोधण्यापेक्षा या चळवळीमुळे देश आणि जनतेची किती हानी झाली, याचा विचार प्राधान्याने होणे गरजेचे आहे. २०१८ पर्यंत गणपती माओवाद्यांचा महासचिव होता. नंतर वय आणि प्रकृतीच्या कारणांमुळे गणपतीने रक्तपात घडविण्यासाठी या संघटनेची सूत्रे नंबाला केशवराव ऊर्फ बसवा राजू याच्या हाती सोपविली. कट्टर डाव्या विचारसरणीच्या बसवा राजूने चंद्राबाबू नायडूंसारख्या नेत्यावर प्राणघातक हल्ला केला होता. हे कटकारस्थान गणपतीच्याच संमतीने रचले गेले होते. सध्या गणपतीला नेपाळमध्ये अटक झाल्याच्या वावड्या उठत असल्या तरी अद्याप ही बाब स्पष्ट झालेली नाही. बसवा राजू याने अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केले होते. तो डाव्या विचारसरणीचा कट्टर समर्थक होता. एका प्रकरणात अटक भोगल्यानंतर तो भूमिगत झाला आणि त्याने घनदाट जंगलाचा मार्ग पत्करला. बसवा राजूने हिडमासारखे कितीतरी जहाल माओवादी निर्माण केले. अखेर बसवा राजूला सैनिकांनी कंठस्नान घातले.

माओवाद्यांनी कंत्राटदारांसह अन्य नागरिकांकडून खंडणीच्या रूपात मोठ्या प्रमाणात पैसा उभा केला. नोटबंदीच्या काळात भूपतीच्या चमूला २० कोटी रुपये फेकून द्यावे लागले होते. यावरून नक्षल्यांकडे किती पैसा होता, याचा कयास लावता येतो. तरीही जंगलात सक्रिय असणाऱ्या सामान्य नक्षलवाद्यांना आठवडी बाजारात मिळणाऱ्या ५० ते ६० रुपयांच्या चपला घालून जंगलात भटकावे लागत होते. रामधेरसारख्या केंद्रीय समिती सदस्याच्या पायात १०० ते १५० रुपयांचा बूट एका मुलाखतीत दिसून आला. करोडोंची वसुली करूनही हा पैसा नेमका कुठे जात होता? हा पैसा अर्बन नक्षल्यांकडे तर वळता होत नव्हता ना? अर्बन नक्षल्यांची मुले देश-विदेशात उच्च शिक्षण घेत असताना या लोकांनी केवळ आपल्या विचारसरणीसाठी गोरगरीब आदिवासी मुला-मुलींच्या हाती शस्त्रे सोपवून देशाच्या विरोधात युद्ध पुकारले होते. आदिवासी समाज नक्षल्यांच्या या रक्तपाताला कंटाळल्याने अखेर दुर्गम भागातील जनताच या चळवळीविरोधात उभी राहिली. परिणामी, सरकारला नक्षल्यांचा बीमोड करणे शक्य होऊ शकले. लवकरच नक्षलवाद नष्ट होऊन दुर्गम भागही विकासाच्या प्रवाहात यावा, अशीच अपेक्षा देशवासीयांची आहे.

९८८१७१६०२७

## कानोसा

अमोल पुसदकर

# रामायणाचा सद्य:स्थितीत संदेश

आज शेकडो वर्षांनंतर सुद्धा रामायणाची समाजमनावरची मोहिनी कायम आहे. जगातल्या जवळपास सर्वच भाषांमध्ये रामायणाचे भाषांतर झालेले आहे. रामलीलांच्या माध्यमातून सुद्धा रामकथेतील पात्रांना जिवंत करण्याचा प्रयत्न अनेक ठिकाणी केला जात असतो.

विश्वामित्रांच्या यज्ञाचा विध्वंस करणाऱ्या त्राटिका व सुबाहू या राक्षसांचा रामाने वध केलेला आहे. म्हणजे रामाचे सामर्थ्य त्यांनी योग्य वयातच प्रकट केलेले होते. आपणही आपल्या मुलांना केवळ सोयीसुविधा न पुरविता त्यांना त्यांच्या वयाला साजेशी आव्हानात्मक कामे देऊन त्यांना कर्तृत्ववान बनविण्यासाठी प्रयास केले पाहिजे. विविध प्रशिक्षण शिबिरांना त्यांना पाठवून त्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक कसदार बनविले पाहिजे. आजकालच्या तरुण पिढीला आपण 'जेन जी' असे म्हणतो. जगाच्या पाठीवर विविध देशांमध्ये या जेन जी ने विविध आंदोलने निर्माण केलेली आहेत. त्यासाठी ते सरकारी व सार्वजनिक संपत्तीचा विध्वंस करणारे आंदोलने सुद्धा करतात. परंतु तरुण वयामध्ये आपला पराक्रम दाखविणारे राम या 'जेन जी'करिता सुद्धा आदर्श आहेत. मोबाईलमध्ये हरवून बसलेल्या आपल्या तरुण पिढीने रामाकडे बघितले पाहिजे की त्यांच्याच वयामध्ये रामामध्ये किती समजदारी होती. कैकेयीच्या हट्टामुळे दशरथ रामाला १४ वर्ष वनवास मान्य करतो. राम त्यावेळेस दशरथाला कैदेत टाकून अयोध्येचे राज्य घेऊ शकला असता. परंतु रामाने पितृआज्ञेला प्राधान्य दिले व तो वनामध्ये जाण्यासाठी सिद्ध झाला. वनामध्ये जाताना राम सीतेला म्हणतो की, वनामध्ये जंगली प्राणी आहेत. नरभक्षक राक्षस आहेत. तुला तेथे भीती वाटेल. त्यामुळे तू वनामध्ये येऊ नको. मी व लक्ष्मण आम्ही दोघेच वनवासात जातो. त्यावेळेस सीता फार सुंदर उत्तर देते. सीता म्हणते, ज्याने शिवधनुष्य तोडले होते अशा पराक्रमी माणसाला माझ्या वडिलांनी आपली कन्या दिलेली आहे. तो पराक्रमी अयोध्येचा युवराज आपल्या पत्नीचे नरभक्षक राक्षसांपासून व प्राण्यांपासून रक्षण करू शकत नाही का? सीतेच्या या प्रश्नावर राम निरुत्तर होतात व सीतेला सुद्धा वनामध्ये चलण्याची अनुमती देतात. सीता म्हणते जेथे राघव तेथे सीता. वनामध्ये कंदमुळे फळे खाऊन आपल्याला राहावे लागले तरी चालेल, संकटांचा सामना करावा लागला तरी चालेल, परंतु माझा पती जिथे आहे तिथेच मी राहील. अशा पद्धतीचा निश्चय सीता बोलून दाखवते. यावरून आजच्या तरुणींनी सुद्धा खूप मोठा संदेश ग्रहण करण्याची आवश्यकता आहे. आजकाल सगळीकडे खाजगी नोकऱ्या तरुणांना कराव्या लागतात. कमी पगार ज्यांना आहे त्यांना मुली मिळत नाही व मिळाल्या तरी सुद्धा कमी पगारात त्यांचे भागत नाही. अनेक वेळा असे विवाह टिकत सुद्धा नाही. अशा वेळेस तरुणींना सीतेचे वचन जेथे राघव तेथे सीता हे खूपच मार्गदर्शक आहे. राम जेव्हा वनवासात जायला निघाले त्यावेळेला अयोध्येतील सर्व नागरिक त्यांच्या रथाच्या मागोमाग चालू लागले. रामाने त्यांना पुष्कळ समजावले की तुम्ही अयोध्याला परत जा. परंतु लोक रामाला म्हणाले की, तुम्ही जर वनवासात राहणार असाल तर आम्ही पण वनवासात राहू. तुम्ही जेथे राहाल तेथे अयोध्या निर्माण होईल. म्हणजे योग्य नेतृत्व आणि राज्यकर्ते जर असेल तर प्रजा त्यांना कशा पद्धतीने समर्थन करू शकते याचे हे उदाहरण आहे. आजच्या राजकारणी लोकांकरिता हे एक मार्गदर्शक उदाहरण आहे.

राम हा अयोध्येचा भावी राजा होता. पण एका क्षणात त्याला राज्य न मिळता वनवास मिळाला. राम, लक्ष्मण व सीता हे वनवासात राहिले. त्यांनी कंदमुळे फळे खाल्ली. तिथल्या सर्व अडीअडचणींचा व संकटांचा स्वीकार केला. यावरून आपण लक्षात घेतले पाहिजे की आज जी परिस्थिती आहे ती उद्या राहीलच असे नाही. आपल्या दैवाला दोष न देता माणसाने आलेल्या परिस्थितीचा स्वीकार करून त्यातून मार्ग काढला पाहिजे व आपले जीवन आनंदाने जगले पाहिजे. हे रामाच्या वनवासावरून आपल्या लक्षात येते. भरत ज्यावेळेस रामचंद्रांना वनवासातून पुन्हा परत नेण्यासाठी येतो त्यावेळेस राम वडिलांच्या आज्ञेसाठी मी अयोध्येस परत येऊ शकत नाही असे सांगतात. त्यावेळेस भरत म्हणतो की, चौदा वर्ष पूर्ण झाल्यावर पंधराव्या वर्षीचा पहिला सूर्यास्त होण्यापूर्वी जर रामा, तू अयोध्येत परत आला नाहीस तर मी अग्निकाष्ठ खाऊन आत्महत्या करील. राम आणि भरताचे प्रेम हे आजच्या काळातील भावा-भावांसाठी सुद्धा खूप आदर्श आहे. कारण एका फुटाच्या जागेकरिता किंवा शेतीच्या एखाद्या तुकड्याकरिता आज आपण भावा-भावांमध्ये अबोलपणा किंवा मारामाऱ्या बघतो. आजच्या युगातील भावांकरिता राम आणि भारताचे प्रेम हे आदर्श ठरू शकते.

राम-रावण युद्धामध्ये रावण हा पहिल्या दिवसापासूनच त्याच्या अस्त्रशस्त्रांनी युक्त अशा रथावर चढून युद्ध करीत होता तर राम हे जमिनीवर उभे राहून युद्ध करीत होते. रावणाकडे अत्यंत शक्तिशाली व मायावी राक्षस सैन्य होते तर रामाकडे केवळ दगड आणि झाडांचा शस्त्र म्हणून उपयोग करणारे वानर होते. तरीही रामांनी परिस्थितीचा बाऊ न करता आपले सर्वोच्च प्रयत्न व उत्तम अस्त्रशस्त्रांचा वापर करून रावणाला पराभूत केले. त्याचप्रमाणे आपण सुद्धा परिस्थितीचा बाऊ न करता उत्तम प्रयत्नांनी यश मिळविले पाहिजे हा संदेश आपण रामापासून घेतला पाहिजे.

राम-रावण युद्ध ८५ दिवस चालले. शेवटी ८६ व्या दिवशी जेव्हा आता रावण मरणार हे जवळपास निश्चित झाले होते, त्याचे सर्व पराक्रमी वीर व बंधू मारले गेले होते, त्यावेळेस शेवटच्या दिवशी इंद्राने आपला दिव्य रथ रामाला दिला. यावरून आपल्या असे लक्षात येते की देव सुद्धा तुमचे सर्वोच्च प्रयत्न बघूनच तुम्हाला मदत करतो. रावणाला मारण्याकरिता प्रभू रामचंद्रांनी त्याच्या एकेक शिरांना बाण मारून त्याला मारण्याचा प्रयत्न केला. परंतु नंतर बिभीषणाने त्यांना सांगितले की, रावणाचे प्राण हे त्याच्या नाभीमध्ये आहेत. त्यामुळे प्रभू रामचंद्रांनी त्यानंतर रावणाच्या बरोबर नाभीवर बाण मारून त्याचे प्राण हरण केले. यावरून आपण संदेश घेतला पाहिजे की एखाद्या समस्येचे मूळ कारण काय आहे समजून घेतले पाहिजे व त्याच्यावरच प्रहार केला पाहिजे व त्यानुसार आपण आपली समस्या सोडविली पाहिजे. रावणाच्या वधानंतर विभीषण रामाला लंकेमध्येच राहण्याचा आग्रह करतात. त्यावेळेस राम विभीषणाला लंकेचे राज्य देतात व त्याला म्हणतात, ही लंका सोन्याची जरी असली तरीही मला हिच्यापेक्षा माझी माता व माझी जन्मभूमी अयोध्या हीच अधिक प्रिय आहे. आज भारतातील अनेक तरुण विदेशामध्ये शिक्षण घ्यायला जातात व तिकडेच रमून जातात. तिकडलेच होऊन जातात. अशा तरुणांनी रामाचा हा संदेश लक्षात घेतला पाहिजे की अमेरिका कितीही वैभवसंपन्न असली तरीही सुद्धा जन्मभूमी भारत व आपली माता हेच श्रेष्ठ आहे आणि यांच्यासाठी कार्य केले पाहिजे.

रामायणातील प्रत्येक प्रसंग हे आपल्याला संदेश देणारे आहेत. जीवनामध्ये पथप्रदर्शक आहेत. म्हणून हजारो वर्षांनंतर सुद्धा रामायण आजही वाचले जाते. केवळ पुण्यप्राप्तीकरिता रामायण वाचू नये तर जीवनामध्ये त्याचे अनुसरण करण्यासाठी रामायणाचा उपयोग व्हावा असा प्रयास करणे गरजेचे आहे.


९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## श्रीरामनवमीचे विशेष महत्त्व

रामनवमी या सणाला हिंदू धर्मात अनन्यसाधारण महत्त्व आहे. या दिवशी जे भक्त मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम यांची पूर्ण भक्तिभावाने व नियमाने पूजा करतात त्यांच्या जीवनात सुख, समृद्धी आणि शांती येते. हिंदू धर्मात, दोन गुप्त नवरात्रींव्यतिरिक्त, चैत्र आणि शारदीय नवरात्र मोठ्या थाटामाटात साजरे केले जातात. या दोन्ही नवरात्रीत माँ दुर्गेची पूजा करण्याचा विधी आहे. पण चैत्र आणि शारदीय नवरात्रीच्या नवमी आणि दशमी या दोन्ही तिथीही भगवान रामाशी संबंधित आहेत. शारदीय नवरात्रीच्या दहाव्या दिवशी भगवान रामाने रावणाचा वध केला आणि भगवान रामाचा जन्म चैत्र महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या नवमी तिथीला झाला. त्या दिवशी रामनवमी साजरी केली जाते.

पंचांगानुसार भगवान रामाचा जन्म चैत्र नवरात्रीत नवमी तिथीला झाला होता. हिंदू धर्मात असे मानले जाते की चैत्र महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या नवव्या दिवशी भगवान विष्णूने श्री रामाच्या रूपात पृथ्वीवर सातवा अवतार घेतला. तेव्हापासून हा सण मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो. रामनवमीच्या



दिवशी मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीराम यांचा जन्मदिवस देशभरात उत्साहात साजरा केला जातो. अयोध्येत रामनवमीनिमित्त भव्य कार्यक्रम आणि जत्रेचे आयोजन केले जाते. रामनवमीच्या दिवशी श्रीरामाची पूजा विधिपूर्वक करणाऱ्या भक्तांना अपेक्षित फळ मिळते, अशी श्रद्धा आहे. यासोबतच त्यांच्या जीवनातील सर्व दु:खे नाहीशी होतात. म्हणून अनेक जण या दिवशी आपल्या महत्त्वाच्या कार्याला सुरुवात करतात.

**शंकर कुळकर्णी**/९७६४४६५५७०

## वाचक पत्रे

## पश्चिम बंगालमध्ये सत्ता परिवर्तन?

पश्चिम बंगालमध्ये मागील दहा वर्षांपासून ममता बॅनर्जी सरकारची अराजकता चालू आहे. ज्या बंगालमध्ये रामकृष्ण परमहंस, रवींद्रनाथ टागोर, स्वामी विवेकानंदांनी हिंदू धर्माला एकत्र करण्याची सुरुवात केली नव्हे हिंदू कट्टरतेचे बीजामृत रोवले त्याच बंगालमध्ये हिंदूंना निर्वासितासारखी राहण्याची वेळ आलेली आहे. नवरात्रात दुर्गा पूजेच्या मिरवणुकीत बंधने आणली जात आहेत तर मुस्लिम समाजाला त्यांचे सण कोणतेही बंधने न ठेवता खुलेआम साजरे करण्याची मुभा देण्यात आलेली आहे. यावरून १९९० च्या दशकातील जम्मू-काश्मीरची आठवण येते. पश्चिम बंगाल भारतापासून वेगळे करण्याचे षडयंत्र तर चालू नाही अशी शंका मनात उत्पन्न होते. परंतु केंद्रातील राष्ट्रवादी विचारांचे सरकार तसे होऊ देणार नाही याची खात्री वाटते. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी संवैधानिक कोणत्याही यंत्रणेला जुमानत नाही. निवडणूक आयोग असो किंवा केंद्रातील आरोग्य योजना असो प्रत्येक यंत्रणेवर आक्षेप घेऊन कार्यवाहीपासून रोखण्याचा कसोशीने प्रयत्न करीत आहे. नुकतेच महामहिम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या सभेचे स्थान बदलण्यापासून तर त्यांना विमानतळावर दिल्या जाणाऱ्या राजशिष्टाचाराला देखील उपस्थित न राहता आपल्या राष्ट्रविरोधी मानसिकतेचे दर्शन घडवले आहे. काही दिवसांत होऊ घातलेल्या प. बंगाल विधानसभेच्या निवडणुकी अगोदर निवडणूक आयोगाच्या विरोधात न्यायालयात जाऊन त्यांचे अधिकार मर्यादित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु न्यायालयाने न्यायाची बाजू लावून धरून निवडणूक आयोगाचे अधिकार अबाधित ठेवलेले आहेत. मुख्य निवडणूक आयुक्तांनी आपल्या अधिकाराचा वापर करून २०२१ च्या विधानसभा आणि २०२४ च्या निवडणुकी दरम्यान झालेला हिंसाचार, जाळपोळ, बलात्कार, खून व मतदान केंद्र काबीज करणाऱ्यांविरुद्ध तेथील पोलिस प्रशाशनाने व सरकारने कोणती कारवाई केली याचा खुलासा मागितला आहे. तसेच मतदान केंद्र व मतदान यंत्र ज्या ठिकाणी ठेवले जाणार आहे अशा ठिकाणी स्थानिक पोलिस प्रशासनाला न ठेवता त्याची जबाबदारी केंद्रीय सुरक्षा बलाकडे सोपविण्यात आलेली आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या या निर्णयाने माजी निवडणूक आयुक्त टी. एन. शेषन यांची आठवण येते. थोडक्यात, ज्या महासभेत द्रौपदीचा अपमान होतो तेथे महाभारत घडणारच व सत्ता परिवर्तन होणार असे वाटते.

**शशिकांत दंडे**/नागपूर

## दरवाढीचा गॅस ग्राहकांना फटका

अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्ष हा दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. यांच्यातील युद्धजन्य परिस्थितीचे गडद सावट आता आपल्या देशातील सर्वसामान्यांच्या ताटावर पडू लागले आहे. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत वाढ झाल्याने इंधन कंपन्यांनी घरगुती वापराच्या एलपीजी सिलेंडरच्या दरात ६० रुपयांची भरीव वाढ केली आहे. गेले काही महिने गॅसचे दर स्थिर होते, पण या दरवाढीने एका झटक्यात सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री लावली आहे. मध्यपूर्व आशियातील या युद्धामुळे द्रवरूपच्या गॅस आयातीत अडथळे येत असून पुरवठ्यावर परिणाम होत असल्याच्या पृष्ठभूमीवर शनिवार ७ मार्चपासून घरगुती गॅस सिलेंडरच्या दरात ६० रुपयांची वाढ करण्यात आली आहे. तर १९ किलोचा व्यावसायिक सिलेंडर आता ११५ रुपयांनी वाढणार आहे. हे नवे दर लागू झाल्याने देशभरातील सामान्य नागरिकांना मोठा फटका बसणार असून हॉटेलिंग, बाहेरचं खाण-पिण हेही महाग होऊ शकतं.

**ॲड. रुपाली हिरवे**/पुणे.९७६६४०५१२५

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## जिल्हा युवा पुरस्कार २०२५-२६ करिता अर्ज सादर करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ मार्च :** राज्याचे युवा धोरण २०१२ अंतर्गत शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्यावतीने शासन निर्णय १२ नोव्हेंबर, २०१३ अन्वये जिल्ह्यात कार्यरत असलेल्या युवक, युवतींना व नोंदणीकृत संस्थांनी केलेल्या समाजहिताच्या कार्याचा गौरव व्हावा आणि युवा विकासाचे कार्य करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळावे, यासाठी जिल्हास्तरावर जिल्हा युवा पुरस्कार दरवर्षी दिला जातो.

युवक, युवतीसाठी पुरस्काराचे स्वरुप गौरव पत्र, सन्मानचिन्ह, रोख पुरस्कार रुपये १० हजार व संस्थेसाठी गौरवपत्र, सन्मानचिन्ह, रोख पुरस्कार रुपये ५० हजार असे आहे. यासाठी जिल्ह्यातील युवक, युवती तसेच नोंदणीकृत संस्थांकडून जिल्हा युवा पुरस्कार २०२५-२६ वर्षाच्या युवा पुरस्कारासाठी अर्ज मागविण्यात येत असून अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत १० एप्रिल २०२६ अशी आहे. यासाठीचे अर्ज जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातून प्राप्त करुन घ्यावेत व अधिक माहितीसाठी जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालयात क्रीडाधिकारी बाबासाहेब इंगोले यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन लातूर येथील जिल्हा क्रिडा अधिकारी महादेव कसगावडे यांनी केले आहे.



## विविध वृत्त...

### भास्करराव माधवराव मिरजकर यांचे निधन



**लातूर :** श्री भास्करराव माधवराव मिरजकर (वय ८८) यांचे रविवारी दि.२२ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास सोलापूर येथे वृद्धापकाळाने निधन झाले. अंत्यविधी सोमवार दि.२३ मार्च २०२६ रोजी सकाळी ९ वाजता सोलापूर येथील पुना नाका, हिंदू स्मशानभूमी येथे करण्यात येणार आहे. त्यांच्या पश्चात तीन मुले,एक मुलगी,सुना नातवंडे असा परिवार आहे. दैनिक सामनाचे जिल्हा प्रतिनिधी अभय मिरजकर यांचे ते वडील होत.

### माणिकप्रभू विद्यालयात विद्यार्थ्यांचा सत्कार

### खोदलेले रस्ते दुरुस्त करावे

**लातूर :** नंदी स्टॉप भागातल्या राम नगर परिसरात एकदा नवीन पाईपलाईन अन् दुसऱ्यांदा ड्रेनेजच्या नावाखाली रस्ते खोदले; पण ते अजून दुरूस्त केलेले नाहीत. राम नगर परिसरातील नागरिकांना येण्या-जाण्यास मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

रस्ते पूर्वीसारखे करावेत, अशी राम नगर परिसरातील नागरिकांची मागणी आहे. समोरून एखादे वाहन आल्यास मोठी अडचण होत असून, वाहने पास होत नाहीत.

आणखी एकदा रस्ता खोदला जाणार असल्याची चर्चा नागरिकांत आहे. रस्ते खोदले तरी ते पुन्हा दुरूस्त करावेत. दुरूस्त न केल्याने विद्यार्थी, महिला व लहान बालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

### चिमणी दिन साजरा

**अहमदपूर :** वाढते शहरीकरण आणि निसर्गातील बदलांमुळे चिमण्यांची संख्या घटत चालली आहे. त्यांचे जतन आणि संवर्धन व्हावे, या उद्देशाने अहमदपूर येथील वनपरिक्षेत्र कार्यालयात शुक्रवारी (दि.२०) रोजी जागतिक चिमणी दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी उपजिल्हाधिकारी मंजुषा लटपटे, वन परिमंडळ अधिकारी गोविंद माळी, रामभाऊ केसाळे, मस्के, व्ही. डी. होनराव, यासह अहमदपूर वन विभागाचे सर्व कर्मचारी आणि निसर्गप्रेमी उपस्थित होते. यशस्वितेसाठी वनरक्षक व्ही. डी. होनराव यांनी परिश्रम घेतले.

### आरटीई प्रवेशाची रेंज तीन किमीच्या पलीकडेही

**लातूर :** आर्थिक दृष्ट्या वंचित, दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमातून मोफत शिक्षण मिळावे म्हणून सरकारने आरटीई प्रवेशा अंतर्गत दिलेली एक किलो मीटरची रेंज कमी करून ती तीन किलो मीटरपर्यंत वाढविण्यात आली. यामुळे पालकांना पाहिजे त्या इंग्रजी माध्यम शाळेत प्रवेश मिळण्यास मदत होणार आहे.

बऱ्याचदा पालक आरटीई अंतर्गत योग्य इंग्रजी माध्यमांची शाळा मिळत नसल्याने मोफत प्रवेश मिळत असताना नकार देतात. घरापासून एक किलो मीटरपर्यंत एकही योग्य इंग्रजी माध्यमाची शाळा नसल्याने पालकांची मोठी अडचण व्हायची. ही अडचण पाहून शिक्षण विभागाने तीन किलो मीटरपर्यंतच्या किंवा त्यापेक्षा काही अंतरावरील शाळांना पसंती देण्याची संधी पालकांना ठेवल्याने अर्ज करणाऱ्या पालकांची संख्या देखील वाढणार आहे. अर्ज भरण्यास तांत्रिक अडचणी येत असल्याने शिक्षण विभागाने आरटीई प्रवेशाचे अर्ज भरण्यास मुदतवाढ दिली. याचा फायदा पालकांना होत असून, योग्य शाळेत प्रवेश घेण्याची संधी सुद्धा मिळणार आहे. त्यामुळे पालकांतून समाधान व्यक्त केले जात असून, रिक्त जागा आणि अर्ज तिप्पट आल्याचे सध्याचे चित्र आहे.

### आजचा विद्यार्थी हा उद्याचा जबाबदार नागरिक : सपोनि बांगर

**औराद शहाजानी :** आजचा विद्यार्थी हा उद्याचा जबाबदार नागरिक असून विद्यार्थ्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करून ठरविलेल्या ध्येय सिद्धीसाठी सकारात्मक वाटचाल करावी, असे प्रतिपादन सपोनी हनुमंत बांगर यांनी केले.

येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र. प्राचार्य शंकर कल्याणे होते. व्यासपीठावर नेताजी जाधव, डॉ. विनोद चिंते, डॉ. भगवान कदम, प्रा. दुर्गादास सबनीस, पल्लवी लवटे (सचिव, विद्यार्थी विकास परिषद) यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना हनुमंत बांगर यांनी विद्यार्थ्यांना मोबाईलचा मर्यादित व सुयोग्य वापर करावा, आक्षेपार्ह पोस्ट व्हायरल करू नयेत, रिल्सच्या विळख्यातून बाहेर पडावे. आई-वडीलांच्या कष्टाची जाणीव ठेवत आपल्या आचरण व कृतीतून त्यांची बदनामी होणार नाही याकरिता दक्ष रहावे. आपली वेशभूषा, केशभूषा, राहणीमान इत्यादी सभ्य व शिस्तबद्ध असले पाहिजे. कोणाच्याही खोट्या अमिषाला बळी न पडता सदैव आपला विवेक जागृत ठेवून जीवनाची वाटचाल करावी असेही त्यांनी यावेळी सांगितले. तसेच महाविद्यालयीन जीवनातील आनंददायी व अविस्मरणीय अनुभव असलेल्या स्नेहसंमेलन या उपक्रमास शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन तथा आभार विजय पवार यांनी केले.

## निर्माता दिग्दर्शक विशाल गिरीचा डफी चित्रपट लवकरच पडद्यावर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ मार्च :** लातूरचे सुपुत्र आणि चित्रपट सृष्टीत अल्पावधीत स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करणाऱ्या विशाल गिरी यांचा डफी हा मराठी चित्रपट लवकरच पडद्यावर येणार आहे. या चित्रपटाचे चित्रीकरण नुकतेच बीड जिल्ह्यातील शिरूर कासार भागात पूर्ण झाले आहे. चित्रपट प्रेक्षकांच्या काळजाचा ठाव घेणार असल्याचा विश्र्वास दिग्दर्शक गिरी यांनी व्यक्त केला आहे. सध्या सोशल मिडियावर या चित्रपटाची चांगलीच चर्चा चालू आहे.





या चित्रपटात प्रमुख भूमिकेत सैराट फेम कलाकार तानाजी गलगुंडे झळकणार आहे. त्याचबरोबर भूषण मंजुळे, अर्चना सूर्यवंशी, चैताली चव्हाण, विष्णू गिरी व अर्चना मालू हे कलाकार देखील भारदस्त भूमिकेत पडद्यावर दिसणार आहेत.

या चित्रपटाची कथा ख्यातनाम कथाकार प्रा. भास्कर बडे यानी लिहिली आहे. अतिशय प्रभावी तसेच गावाकडची सूंदर अशी काळजाचा ठोका चुकवणारी गोष्ट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. डफी म्हणजे नेमके काय ? या प्रश्र्नाचे उत्तर रसिक प्रेक्षकांना लवकरच पाहायला मिळणार असल्याचा विश्र्वास विशाल गिरी यांनी व्यक्त केला आहे. दिवाळीपूर्वी हा चित्रपट

रिलीज करून प्रेक्षकांच्या भेटीला येईल आणि तो निश्र्चितच मराठी चित्रपट रसिकांचे मन जिंकून घेईल,असे गिरी यांनी बोलून दाखवले. संवाद आणि दिग्दर्शन विशाल गिरी यांनी केले आहे. त्यांना याकामी राहुल पाटील आणि अजय शिंदे यांनी सहाय्य केले आहे. वेशभूषा विभागाची जबाबदारी काजल भोसले व प्रणिता क्षीरसागर यांनी पार पाडली आहे. चित्रपटाचे चित्रीकरण पूर्ण करण्याकामी नगरसेवक दादासाहेब हरिदास व दादासाहेब बर्डे यांचेही छान सहकार्य मिळाल्याचे विशाल गिरी यांनी नमूद केर्ले.ल चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराजराजे भोसले यांचे तसेच दीपक नागरगोजे काका यांचेही मोलाचे सहकार्य मिळाल्याची भावना गिरी यांनी व्यक्त केली. चित्रपटाचे उत्कृष्ट छायांकन कॅमेरामॅन रामा यादव यांनी केले आहे. त्यांना दिनेश भुर्के, ओम माने यांनी सहकार्य केले आहे.

## लातूर तालुका महिला काँग्रेसच्या अध्यक्षपदी सौ.ज्योतीताई शिंदे यांची निवड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ मार्च :** काँग्रेस पक्षाच्या वतीने लातूर तालुका महिला काँग्रेसच्या अध्यक्षपदावर सौ.ज्योती शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. लातूर जिल्हा महिला काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षा शिलाताई पाटील यांनी सदरील निवड जाहीर केली आहे.



सदर नियुक्ती लातूर ग्रामीणचे माजी आमदार तथा लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांच्या हस्ते ज्योतीताई शिंदे यांना प्रदान करण्यात आले. या नियुक्तीमुळे तालुक्यातील महिला कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण होईल, तसेच पक्ष संघटनात्मकदृष्ट्या अधिक बळकट होण्यास मदत होणार आहे.

सौ. ज्योतीताई शिंदे या यापूर्वीही विविध सामाजिक व संघटनात्मक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत असून, त्यांच्या अनुभवाचा लाभ पक्षाला निश्चितच होईल, असा विश्वास पक्षाच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे. आगामी काळात महिला सक्षमीकरण, पक्षाची धोरणे व विचार सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविणे, तसेच स्थानिक पातळीवर संघटन वाढविणे या बाबींवर त्या विशेष लक्ष केंद्रित करणार आहेत.

काँग्रेस पक्षाने दिलेल्या जबाबदारीचे प्रामाणिकपणे पालन करून महिला कार्यकर्त्यांना एकत्रित आणणे, पक्षाचे संघटन मजबूत करणे व काँग्रेस पक्षाचे विचार घराघरात पोहोचविण्यासाठी सातत्याने कार्यरत राहणार असल्याची ग्वाही नवनियुक्त लातूर तालुका महिला काँग्रेस अध्यक्ष सौ. ज्योतीताई शिंदे यांनी दिली आहे.

## ॲड. चिमाजी धोंडिबा बाबर यांची म. रा. परिवहन कंत्राटी, जनरल कामगार सेनेच्या राज्य विधी सल्लागारपदी नियुक्ती



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ मार्च :** महाराष्ट्र राज्य परिवहन कंत्राटी, जनरल कामगार सेनेच्या महाराष्ट्र राज्य विधी सल्लागारपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती हिंदुऱ्हदय सम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आर्शीवादाने, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, आमदार ज्ञानराज चौघुले अध्यक्ष तथा शिवसेना उपनेते यांच्या आदेशानुसार ॲड. चिमाजी धोंडिबा बाबर लातूर यांची नियुक्ती करण्यात आल्याचे पत्र देण्यात आले आहे. हिंदुऱ्हदय बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंद दिघे यांची शिकवण सतत आठवण ठेवून काम करणार असल्याचे ॲड. चिमाजी बाबर यांनी आश्वासित केले आहे. नियुक्तीचे पत्र सन्मानपुर्वक २२मार्च रोजी देण्यात आले आहे. त्यांच्या नियुक्तीबद्दल मित्रपरिवार, नातेवाईक, सामाजिक कार्यकर्ते, शिवसैनिक असंख्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.



## राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी आर. आर. पाटलांच्या कन्येला संधी द्या

### ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ मार्च :** राज्याचे उपमुख्यमंत्री, गृहमंत्री आणि ग्रामविकास मंत्री यांसह विविध पदांवर काम करताना सर्वसामान्य जनतेचे हित, महिलांची सुरक्षा व त्यांच्या सक्षमीकरणासाठी काम करणारे दिवंगत लोकनेते आर. आर. पाटील अर्थात सर्वांचे लाडक्या आबांची कन्या स्मिता पाटील-थोरात यांना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी काम करण्याची संधी द्यावी, अशी मागणी ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांमधून होत आहे.

स्मिता पाटील यांनी राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष म्हणून यशस्वी काम केले आहे. आर. आर. पाटील यांच्या निधनानंतर राज्यभर तंबाखू विरोधी मोहीम राबवून नव्या पिढ्यांना व्यसनमुक्त करण्याचे मोठे कार्य सुरू केले. रूपाली पाटील चाकणकर यांच्या राजीनामामुळे रिक्त झालेल्या राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी स्मिता पाटील यांना संधी देऊन खऱ्या अर्थाने दिवंगत आबांना आदरांजली वाहण्याची संधी राष्ट्रवादी काँग्रेसला प्राप्त झाली आहे. राजकीय, सामाजिक क्षेत्रात योगदान असलेल्या स्मिता पाटील उच्च विद्याविभूषित असून समाजसेवेचा आबांचा राजकीय व सामाजिक चालवणाऱ्या स्मिता पाटील खऱ्या अर्थाने राज्यातील महिलांना न्याय देतील व सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी आबांनी पाहिलेले स्वप्न पूर्ण करतील, असा विश्र्वास ग्रामीण भागातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना वाटतोय.

## आंतरजिल्हा मोटार सायकलचोराला अटक, १.७० लाखांचा मुद्देमाल जप्त

### लातूर स्थानिक गुन्हे शाखेची मोठी धडाकेबाज कारवाई

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ मार्च :**

लातूर जिल्हा पोलीस दलाने मालमत्तेविषयक गुन्ह्यांविरुद्ध राबविलेल्या विशेष मोहिमेंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेकडून अत्यंत कौशल्यपूर्ण व नियोजनबद्ध कारवाई करत आंतरजिल्हा स्तरावर मोटार सायकल चोरी करणाऱ्या एका सराईत आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर कारवाईदरम्यान आरोपीकडून एकूण ०६ मोटार सायकली (अंदाजे किंमत १,७०,०००/- रुपये) जप्त करण्यात आल्या असून, लातूर तसेच पुणे शहरातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये दाखल गुन्ह्यांचा उलगडा करण्यात आला आहे.

ही उल्लेखनीय कामगिरी पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे तसेच मा. अप्पर पोलीस अधीक्षक, मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वाखालील विशेष पथकाने पार पाडली

लातूर शहरात मागील काही दिवसांपासून मोटार सायकल चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने त्यांचा छडा लावण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेकडून विशेष मोहीम राबविण्यात येत होती. त्याच अनुषंगाने दिनांक २२/०३/२०२६ रोजी पोलीस पथक तपास करत असताना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती प्राप्त झाली की, नवीन रेणापूर ते रेल्वे स्टेशन मार्गावरील लातूर बायपास रोडवर एक इसम चोरीची मोटार सायकल विक्री करण्याच्या उद्देशाने थांबलेला आहे. सदर माहितीची शहानिशा करून पथकाने तात्काळ नियोजनबद्ध सापळा रचून १६.३० वाजताच्या सुमारास नमूद ठिकाणी छापा टाकून संशयित इसमास ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्या इसमाने आपले नाव - महादेव शिवाजी गरड (वय २६ वर्षे, रा. अंबुलगा, ता. चाकूर, जि. लातूर) असे सांगितले. त्याच्याकडे असलेली होंडा कंपनीची काळ्या रंगाची युनिकॉर्न मोटार सायकल (MH-35-W-3408) ही चोरीची असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले. आरोपीस विश्वासात घेऊन अधिक चौकशी केली असता त्याने लातूर शहरातील विविध भागांमधून तसेच पुणे शहरातील सिंहगड रोड, धायरी परिसरातून मोटार सायकली चोरी केल्याची कबुली दिली. त्याच्या सांगण्यावरून पोलीस पथकाने अजिंक्य सिटी, लातूर परिसरात छापा टाकून आणखी ०५ मोटार सायकली जप्त केल्या. यामध्ये प्रामुख्याने होंडा कंपनीच्या युनिकॉर्न व शाईन या प्रकारातील मोटार सायकलींचा समावेश आहे. अशा प्रकारे आरोपीकडून एकूण ०६ मोटार सायकली हस्तगत करण्यात आल्या. जप्त मोटार सायकलींची पडताळणी केली असता त्या खालील गुन्ह्यांशी संबंधित असल्याचे निष्पन्न झाले -

१) पो.स्टे. शिवाजीनगर, लातूर - गु.र.नं. १०८/२०२६, २) पो.स्टे. शिवाजीनगर, लातूर - गु.र.नं. ११२/२०२६ ३)पो.स्टे. गांधी चौक, लातूर - गु.र.नं. १४०/२०२६, ४) पो.स्टे. गांधी चौक, लातूर - गु.र.नं१४७/२०२६ ५)पो.स्टे. एमआयडीसी, लातूर- गु.र.नं. ९८/२०२६ ६)पो.स्टे. सिंहगड, पुणे शहर - गु.र.नं. ५३७/२०२५ तसेच आरोपीने पुणे शहरातील धायरी व सिंहगड रोड परिसरातून आणखी ०५ मोटार सायकली चोरी करून विक्री केल्याची कबुली दिली असून त्या संदर्भात पुढील तपास सुरू आहे.



सदर कारवाई खालील अधिकारी व अंमलदार यांच्या पथकाने वरिष्ठांचे मार्गदर्शनात अत्यंत कौशल्य व तत्परतेने पार पाडली असून पोलीस निरीक्षक श्री. बावकर यांच्या नेतृत्वातील पथकामधील पोउपनि राजेश घाडगे, पोलीस अंमलदार युवराज गिरी, प्रदीप स्वामी, मोहन सुरवसे,राजेश कंचे, सिध्देश्वर मदने,जमीर शेख, राहुल कांबळे, शैलेश सुडे यांनी केली असून आरोपीस ताब्यात घेऊन त्याच्याकडील सर्व मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच पोलीस स्टेशन शिवाजीनगर, लातूर येथे पुढील कायदेशीर कारवाईसाठी हजर करण्यात आले आहे. लातूर जिल्हा पोलीस दलाकडून नागरिकांना आवाहन करण्यात येते की - आपल्या वाहनांची सुरक्षितता सुनिश्चित करावी, योग्य लॉकिंग प्रणालीचा वापर करावा. सार्वजनिक ठिकाणी पार्किंग करताना दक्षता बाळगावी,संशयास्पद हालचाली आढळल्यास त्वरित पोलीसांना कळवावे.



बीड : शहरातील बालेपीर भागात भ्याड हल्ल्यात जखमी झालेले कालिका नगर भागातील रहिवासी माजी सैनिक सानप नुकतेच रुग्णालयातून डिस्चार्ज घेऊन घरी आले असता. त्यांची निवासस्थानी जाऊन सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे यांनी सदिच्छा भेट घेऊन संबंधित हल्लेखोरांना तातडीने अटक करण्यात यावी अशा मागणीचे निवेदन जिल्हा प्रशासनाला दिले.

# माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांना 'चंपावतीरत्न' पुरस्कार प्रदान

## बीडच्या जनतेला केला सन्मान समर्पित

तभा वृत्तसेवा

**बीड दि.२३(प्रतिनिधी)** | माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांना नुकताच प्रतिष्ठित 'चंपावतीरत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या सोहळ्यात बोलताना त्यांनी आपल्या कार्याचे श्रेय जनतेला देत, जिल्ह्याच्या प्रलंबित प्रश्नांवर आणि विकासावर भाष्य केले.

रविवार दि.२२ रोजी हॉटेल नीलकमल येथे रोटरी क्लब ऑफ बीडच्या वतीनेमाजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांना 'चंपावतीरत्न' पुरस्कार रो.सुधीर लातुरे, मयंक गांधी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी रा.ओम मोतिपवळे, रो.हरीष मोटवाणी, ह.भ.प.विनय महाराज पाटांगणकर, सुभाषचंद्र सारडा, नितीनचंद्र कोटेचा, समीर काझी, अजित वरपे, दिलीप खिस्ती, सुनिल क्षीरसागर, महेश वाघमारे, ॲड.कालिदास थिगळे, सत्यनारायण लाहोटी, विलास बडगे, दिनकर कदम, गंगाधर घुमरे, प्रा.जगदिश काळे, अरूण डाके,नानासाहेब काकडे,अरुण बोगाने रो.विकास उमापुरकर यांची प्रमुख उपस्थिती होती.



पुरस्काराला उत्तर देताना माजी मंत्री क्षीरसागर म्हणाले की, वादापेक्षा विकासावर विश्वास ठेवणार्‍या जनतेने मला जी साथ दिली, त्यामुळेच हे शक्य झाले. हा पुरस्कार मी बीड जिल्ह्यातील तमाम जनतेला समर्पित करतो. ५० वर्षांपूर्वीचा जिल्हा आणि आजचा जिल्हा यातला फरक सर्वांच्या समोर आहे. आम्ही सर्वच काही केले असा आमचा दावा नाही, मात्र जे-जे शक्य होते ते करून दाखवले. असे सांगून त्यांनी पाणी प्रश्नावर विशेष भर दिला. ते म्हणाले, मराठवाड्याच्या हक्काचे २८ टीएमसी पाणी लवकरात लवकर मिळावे, हीच आमची मुख्य इच्छा आहे. बीड जिल्ह्यातील मजुरांच्या हाताचा कोयता कायमचा बंद होऊन आपली जमीन पाणीदार व्हावी, हेच आमचे स्वप्न आहे. पुरस्कारामुळे आपली जबाबदारी अधिक वाढल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. विकासासाठी जात, धर्म आणि पंथ बाजूला सारून सर्वांना सोबत घेऊन जिल्ह्याच्या प्रगतीसाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. जिल्ह्यात अजूनही अनेक कामे होणे बाकी आहेत आणि ती पूर्ण करण्यासाठी मी कटिबद्ध आहे. तुमच्या प्रेमाची जी शिदोरी माझ्याकडे आहे, त्या जोरावर मी या जबाबदार्‍या समर्थपणे पेलण्यास तयार आहे, असा विश्वास त्यांनी व्यक्त करून यावेळी त्यांनी नाव न घेता विरोधकांवरही टीका केली. काही लोक केवळ वरवरचे मुखवटे धारण करून भ्रम निर्माण करत आहेत, मात्र जनतेने चांगल्या-वाईटाची पारख केली पाहिजे, असेही आवाहन त्यांनी केले. याशिवाय रो.हरीष मोटवानी, रो.मोतिपवळे, रो.मयंक गांधी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी बाबुशेठ लोढा, सुधाकर मिसाळ, भास्कर जाधव, सखाराम मस्के, अशोक शेटे, प्रकाश कानगांवकर, अर्जुन बहिरवाळ, राणा चौव्हान, विजय सरवदे, सुर्यकांत महाजन, विशाल क्षीरसागर, प्रमोद करमाळकर, विष्णुदास बियाणी, रामेश्वर कासट, अमोल लहाने, डॉ.महेंद्र गौशाल, डॉ.अरूण भस्मे, किशोर पगारिया, लक्ष्मीकांत सोनी, सुरेंद्र कासट, मनमोहन कलंत्री, जवाहर कांकरिया, राहूल बोरा, रो.सुमित जयस्वाल, रो.सुरेश लड्डा, रो.वाय जनार्दनराव, रो.संतोष पवार, रो.मुकुंद कदम, रो.मेघराज पिंगळे, सुहास बेदरे, गणेश मुळे, संदिप खोड, ओमप्रकाश लोहिया, राम मोटवानी, सुरज लाहोटी, विवेक बडगे, प्रमोद धारवाडकर, कल्याण कुलकर्णी, सुनिल खंडागळे, अशोक राऊत यांच्यासह महिला, पुरूषांची उपस्थिती होती,

### माजी खा.स्व.काकूंना मिळाला होता चंपावतीरत्न पुरस्कार

जिल्ह्याच्या माजी खासदार स्व.केशरबाई क्षीरसागर उर्फ काकू यांना सन २००२-०३ मध्ये रोटरी क्लब ऑफ बीडच्या वतीने चंपावतीरत्न पुरस्कार मिळाला होता आणि माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांना पण सन २०२५-२६ मध्ये चंपावतीरत्न पुरस्कार मिळालेला आहे.

# केज विधानसभा मतदारसंघातील बूथस्तरीय अधिकाऱ्यांना मतदार मॅपिंग कामासाठी 10 दिवसांची वाढीव कार्यमुक्ती द्या

## लोकविकास महाआघाडीची मागणी



तभा वृत्तसेवा

**अंबाजोगाई** | केज विधानसभा मतदारसंघातील बूथस्तरीय अधिकाऱ्यांना (बीएलओ) मतदार मॅपिंग (वोटर मॅपिंग) कामासाठी १० दिवसांची वाढीव कार्यमुक्ती (रिलिव्हींग) द्यावी अशी मागणी सोमवारी लोकविकास महाआघाडीच्या वतीने जिल्हाधिकार्यांना अपर जिल्हाधिकारी यांच्या मार्फत दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे.

या संदर्भात आमच्या प्रतिनिधी बोलताना लोकविकास महाआघाडीचे नेते राजकिशोर (पापा) मोदी यांनी सांगितले की, लोकविकास महाआघाडीच्या वतीने सोमवार, दिनांक २३ मार्च रोजी जिल्हाधिकारी, बीड यांना अपर जिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांच्या मार्फत दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, केज विधानसभा मतदारसंघांतर्गत सध्या मतदार यादी अद्ययावत करणे आणि मतदार मॅपिंगचे अत्यंत महत्त्वाचे काम सुरू आहे. या कामासाठी सर्व संबंधित कर्मचाऱ्यांची 'बूथ स्तरीय अधिकारी' (बीएलओ) म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सदर कामाचे स्वरूप हे व्यापक असून, भौगोलिक परिस्थिती आणि तांत्रिक अडचणींमुळे तसेच या संदर्भात आम्हाला पुढील मुद्दे आपल्या निदर्शनास आणून द्यायचे आहेत जसे की, १) बीएलओंना ११ ते २० तारखे पर्यंत कार्यमुक्ती देण्यात आली होती. याकाळात अंबाजोगाई तालुक्यात फक्त ५८.१९ टक्के एवढेच मॅपिंगचे कार्य पूर्ण झाले आहे. अजूनही ४१.८१ टक्के मतदारांचे मॅपिंग पूर्ण झाले नाही., २) १० दिवसांच्या कार्यमुक्ती काळात काही शिक्षक बीएलओंना १० वी बोर्डचे सुपरविजन आल्याने त्यांना नियोजित मॅपिंगचे कार्य करता आलेले नाही., ३) १० दिवसांच्या कार्यमुक्ती मध्ये दोन दिवस गुढी पाडवा आणि रविवारची सुट्टी असल्याने बीएलओंना केवळ ८ दिवस कामाचे मिळाले आहेत., ४) यादरम्यान मुस्लिम समाजातील मतदारांचा पवित्र रमजान महिना सुरू असल्याने आणि ते उपासनेत असल्याने बीएलओ मॅपिंग कमी झाली आहे., ५) मॅपिंग संदर्भात सामान्य मतदारांमध्ये योग्य प्रमाणात जनजागृती झाली नसल्याने सर्वत्र गोंधळाचे वातावरण होते. २००५ च्या याद्या देखील सामान्य मतदारांसाठी अद्याप ही सहज उपलब्ध झालेल्या नाहीत. आणि ६) बहुतांश बीएलओ हे त्या बूथच्या बाहेरील रहिवासी असल्यामुळे त्यांना मतदारांपर्यंत पोहचणे कठीण झाले होते. त्यामुळे विशेषतः अंबाजोगाई शहरात मॅपिंगची टक्केवारी कमी झाली आहे. त्यामुळे दिलेल्या विहित वेळेत हे काम पूर्ण करण्यास अनेक अडचणी येत आहेत. करिता मतदारांची अचूक नोंदणी आणि मॅपिंगचे काम १०० टक्के पूर्ण करण्यासाठी अतिरिक्त वेळेची आवश्यकता आहे. त्यानुसार, अधिकृत कर्तव्यावर राहून हे राष्ट्रीय काम विनाव्यत्यय पूर्ण करता यावे, यासाठी 'बूथ स्तरीय अधिकारी' (बीएलओ) यांना त्यांच्या मूळ विभागातून (उदा. शिक्षण/महसूल इत्यादी विविध शासकीय कार्यालये) आणखी १० दिवसांची वाढीव कार्यमुक्ती (रिलिव्हींग) मिळावी, याबाबत आपल्या स्तरावर आपण मा.निवडणूक निर्णय अधिकारी, केज विधानसभा मतदारसंघ, केज यांना आदेशीत करावे, तसेच सदर कामाचे गांभीर्य लक्षात घेता आपण संबंधित विभागांना तसे आदेश निर्गमित करावेत अशी विनंती आमच्या सर्व सहकार्यांनी निवेदनाद्वारे केले आहे असे निवेदक राजकिशोर मोदी (नेते - लोक विकास महाआघाडी.) यांनी सांगितले आहे. सदरील निवेदनावर पृथ्वीराज साठे (माजी आमदार, केज विधानसभा, मतदार संघ.), सय्यद ताहेरभाई (गटनेता - लोक विकास महाआघाडी, नगरपरिषद, अंबाजोगाई.), हाजी इस्माईल गवळी (ज्येष्ठ नगरसेवक), सुनिल जगताप (महाराष्ट्र नवनिर्माण सेना), महेंद्र निकाळजे (रिपाइं आठवले गट), भिमराव सरवदे (बीड जिल्हा कार्याध्यक्ष, भिमशक्ती), राजेश वाहुळे (मराठवाडा युवा अध्यक्ष, लोकजनशक्ती पार्टी-रामविलास), अशोक पालके (संस्थापक अध्यक्ष, युवा आंदोलन), नगरसेवक महेश कदम, ॲड.विकास काकडे, मालू जोगदंड, आकाश कराड, राजपाल जावळे, नजीर उमरदराजखान पठाण, सौ.जयश्रीताई पृथ्वीराज साठे, बशीरा शफीक सय्यद, नाजनीन बेगम अकबरखाँ पठाण, सौ.श्रुतीताई अमोलराव लोमटे, सौ.संगिताताई दाजीसाहेब लोमटे, सौ.सोनीताई दत्तात्रय सरवदे यांच्या स्वाक्षर्या आहेत.

# गर्दीत विद्यार्थ्यांचे भवितव्य हरवू देऊ नका – माजी प्राचार्य विठ्ठल काळे यांचे प्रतिपादन

## अचिव्हर्स अकॅडमीतर्फे करिअर मार्गदर्शन व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा

तभा वृत्तसेवा

**बीड (प्रतिनिधी)** | आजच्या स्पर्धात्मक युगात मोठ्या शहरांमध्ये एकाच वर्गात १५०० पर्यंत विद्यार्थी बसवले जातात. अशा अफाट गर्दीत प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष देणे शक्य होत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांची खरी प्रगती होत आहे का, याचा पालकांनी गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. केवळ गर्दीचा भाग बनून विद्यार्थ्यांचे भवितव्य हरवू देऊ नका, असे परखड प्रतिपादन स्वा. सावरकर कनिष्ठ महाविद्यालय, बीडचे माजी प्राचार्य विठ्ठल काळे यांनी केले. अचिव्हर्स अकॅडमी, बीड यांच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, बक्षीस वितरण व करिअर मार्गदर्शन या कार्यक्रमात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य मा. प्रदीप गाडे (माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, जवळा-म्हाळस), मा. भारत मगर (मुख्याध्यापक, भीमसिंह विद्यालय, मातोरी) आणि मा. भीमराव मिसाळ (शालेय समितीचे अध्यक्ष, खोकरमोहा), मा.के. डी. राऊत, अचिव्हर्स अकॅडमीचे संचालक प्रा.अर्जुन राठोड, नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य डी.डी.राऊत उपस्थित होते.

पुढे बोलताना विठ्ठल काळे यांनी विद्यार्थ्यांच्या करिअरला योग्य दिशा देण्यासाठी प्रा. प्रदीप रोडे व त्यांच्या टीमने उचललेले पाऊल धाडसी असल्याचे नमूद केले. केवळ ५० ते १०० विद्यार्थ्यांच्या मर्यादित बॅचेस आणि तज्ज्ञ प्राध्यापकांचा थेट संवाद यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत निश्चितच वाढ होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# ग्राहक पंचायत महाराष्ट्र मराठवाडा विभाग व जिल्हा कार्यकारणीची बैठक संपन्न

तभा वृत्तसेवा

**गेवराई ( प्रतिनिधी)** | बीड येथे विभाग सहसंघटक सौ.शैलजा ताई सेलमोहकर यांच्या निवासस्थानी मराठवाडा विभागाची बैठक उत्साहात संपन्न झाली. त्यामध्ये विभागातील विविध विषयावर चर्चा करण्यात आली. यावेळी राज्य कार्यकारणीचे अध्यक्ष डॉ. विजयजी लाड, सह संघटक सौ. मेधाताई कुलकर्णी, राज्य

कार्यकारणी सदस्य श्री हेमंत जी मराठे, विभागाध्यक्ष सतीश जी माने, संघटक प्रा. हेमंत वडणे, सचिव सचिन कवडे, शरद सेलमोहकर आदी उपस्थित होते.

त्यानंतर बीड जिल्हा कार्यकारणी पदाधिकारी यांच्या समवेत बैठक उत्साहात घेण्यात आली. त्यामध्ये जिल्ह्यातील प्रश्नाबद्दल चर्चा करण्यात आली. तसेच ग्राहक पंचायत महाराष्ट्र या संघटनेत तरुणाने सहभाग होणे अत्यंत आवश्यक आहे यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे अत्यंत आवश्यक आहे याबाबत चर्चा करण्यात आली. बीड जिल्ह्यात ग्राहक पंचायत चे कार्य मोठ्या प्रमाणात वाढ करणे राज्य कार्यकारणी करून सूचना करण्यात आल्या त्याबाबत सर्वांनी प्रयत्न करण्याची ठरले. या बैठकीत बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र जिल्हा अध्यक्ष प्रा. रावसाहेब गर्जे, उपाध्यक्ष अनिल बोर्डे, सहसंघटक गणेश टकले, ॲड नरेंद्र कुलकर्णी, ॲड अरविंद काळे, विष्णू देशमुख आदी उपस्थित होते.

# अंबाजोगाईत जुगार अड्ड्यावर पोलिसांची कारवाई; चौघांवर गुन्हा दाखल, सुमारे 2.94 लाखांचा मुद्देमाल जप्त

तभा वृत्तसेवा

**अंबाजोगाई** | शहरातील क्रांतीनगर परिसरात सुरू असलेल्या तिर्रट जुगार अड्ड्यावर अंबाजोगाई शहर पोलिसांनी छापा टाकत चौघांना रंगेहात पकडले. या कारवाईत सुमारे २ लाख ९४ हजार ६५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून संबंधितांविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक २१ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ४.३० वाजण्याच्या सुमारास दत्ता काटे यांच्या पत्र्याच्या शेडमध्ये काहीजण बेकायदेशीररीत्या तिर्रट जुगार खेळत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी छापा टाकून आरोपींना ताब्यात घेतले.

या प्रकरणी विजय शामराव रेडे (वय ४३, रा. माऊली नगर), ठकेश नारायण शेळके (वय ३५, रा. कावळेचीवाडी ता. परळी), नरसिंग दशरथ खाडप (वय ४०, रा. साईनाथनगर) आणि बाबासाहेब शशिकांत सोनकांबळे (वय ४५, रा. भिमनगर) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



कारवाईदरम्यान आरोपींकडून रोख रक्कम, पत्त्यांचे संच, तसेच विविध कंपन्यांचे मोबाईल फोन जप्त करण्यात आले. याशिवाय जुगाराच्या डावावर लावलेल्या चार मोटारसायकलींचाही समावेश असून एकूण मुद्देमालाची किंमत सुमारे २,९४,६५० रुपये इतकी आहे.

ही कारवाई फिर्यादी पोलीस कर्मचारी तेजेश वाहुळे यांच्या तक्रारीवरून करण्यात आली असून गुन्हा क्रमांक १०७/२०२६, कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम अंतर्गत नोंद करण्यात आला आहे.

सदर प्रकरणाचा पुढील तपास पोलीस कर्मचारी गायकवाड करीत असून, प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक जोगदंड यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करण्यात आली.

# संदीप क्षीरसागर यांच्या प्रयत्नांनी मुस्लिम समाजाला मिळाली भेट

तभा. वृत्तसेवा

**बीड (प्रतिनिधी)** | रमजान ईदच्या पर्वावर मुस्लिम समाजाला आ.संदीप क्षीरसागर यांच्या प्रयत्नांमुळे मोठी भेट मिळाली आहे. बीड शहरात लवकरच अल्पसंख्याक मुलींसाठी स्वतंत्र, सुसज्ज वसतीगृह उभारले जाणार आहे. या वस्तीगृहाच्या कामासाठी आ शासनस्तरावरून मंजुरी अगोदरच मिळालेली आहे. परंतु जागा उपलब्धततेच्या प्रश्नामुळे काम सुरू होण्यास अडचण येत होती. परंतु आ.संदीप क्षीरसागरांच्या पाठपुराव्यामुळे ती अडचणही दूर झाली आहे. शहरातील किल्ला मैदान येथे असलेल्या डाक बंगल्याची जागा आता वसतीगृहासाठी उपलब्ध झाली असून लवकरच प्रक्रिया पूर्ण होऊन कामाला प्रत्यक्ष सुरुवात होणार आहे. याबद्दल आ.संदीप क्षीरसागर यांनी दिवंगत नेते अजितदादा पवार यांच्या स्मृतींना उजाळा देत राज्याच्या उपमुख्यमंत्री, अल्पसंख्याक मंत्री तसेच बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार यांचे आभार मानले आहेत.

**अल्पसंख्याक मुलींसाठी लवकरच सुसज्ज वसतिगृह उभारणार, जागेचा प्रश्न मार्गी लागला, दिवंगत अजितदादांच्या स्मृतींना उजाळा देत मानले सुनेत्राताईंचे आभार.**

अल्पसंख्यांक समाजातील उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी बीड शहरात एक सुसज्ज वसतीगृह असावे, जेणेकरून बीड मतदासंघातील आणि जिल्ह्यातील विद्यार्थीनिंना याचा फायदा होईल. यासाठी आ.संदीप क्षीरसागर यांनी सातत्यपूर्ण पाठपुरावा केला होता. त्यातून बीड शहरात अल्पसंख्याक मुलींसाठी वसतीगृह बांधकामास शासनाकडून निधीसह मंजूरी मिळाली होती. परंतु यासाठी योग्य जागा उपलब्ध असण्याची गरज होती.

याबाबतही आ.क्षीरसागर यांनी पाठपुरावा केला. परिणामी बीड शहरातील किल्ला मैदान परिसरातील नगर परिषदेच्या बंद आणि निकामी असलेल्या किल्ला मैदानाची जागा ही वसतीगृहास देण्यात आली आहे.

# सुदामदेव महाराज यांच्या पुण्यतिथी व श्रीराम जन्मोत्सवाच्या भव्य अखंड हरिनाम सप्ताहास सुरुवात

तभा वृत्तसेवा

**नेकनुर, दि २० (प्रतिनिधी)** | श्रीक्षेत्र नेकनूर येथील संत बंकट स्वामी महाराज यांचे पट्टशिष्य वै.संत सुदामदेव महाराज यांची पुण्यतिथी व श्रीराम जन्मोत्सवाच्या भव्य अखंड हरिनाम सप्ताहास गुरुवारी थाटात सुरुवात झाली. महंत श्री ह भ प लक्ष्मण महाराज मेंगडे यांच्या शुभ हस्ते पालखी पूजन व समाधी पूजन करून सप्ताह प्रारंभ झाला. यावेळी महंत हरिहर भारती महाराज, श्री ह भ प वसंत महाराज शिंदे, श्री ह भ प नाना महाराज कदम, श्री ह भ प रंजीत महाराज शिंदे श्री ह भ प कृष्णा महाराज यादव जाधव,श्री ह भ प दिनेशानंद महाराज शास्त्री, संस्थानचे विश्वस्त यांची उपस्थिती होती.



बीड तालुक्यातील श्रीक्षेत्र नेकनूर येथे संत सुदामदेव महाराज यांच्या २४ व्या पुण्यतिथी उत्सवास मोठ्या थाटात प्रारंभ झाला या अखंड हरिनाम सप्ताहात महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कीर्तनकारांची सात दिवस कीर्तन होणार आहे तसेच महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध भागवताचार्य दिनेशांनंद शास्त्री महाराज यांचे सुश्राव्य भागवत कथा सुरू आहे. या कीर्तन भजन आणि भागवत कथेचा सर्व भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन बंकटस्वामी संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

काल्याचे कीर्तन व रामजन्माचे किर्तन श्री ह भ प महंत गु लक्ष्मण महाराज मेंगडे मठाधिपती बंकट स्वामी मठ निनगुर,पंढरपूर ,आळंदी त्यांचे होणार आहे तरी सर्व भाविक भक्तांनी या आध्यात्मिक पर्वणीचां लाभ घ्यावा.

# रानडुक्करांचा कळप शेतात घुसला की पीक संपलेच; शेतकऱ्यांची संरक्षणाची मागणी

**बीड / प्रतिनिधी** | शिरूर तालुक्यात सध्या जंगली रानडुक्करांचा त्रास मोठ्या प्रमाणात वाढला असून शेतकर्‍यांच्या पिकांचे मोठे नुकसान होत आहे. रानडुक्करांचा कळप एखाद्या शेतात घुसला की एकाच रात्रीत किमान एक एकर पीक उध्वस्त करून टाकतो, अशी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे शेतकरी वर्ग हवालदिल झाला असून शासनाने तातडीने प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे. पिकांचे संरक्षण करण्यासाठी शेतकरी विविध उपाय करत असले तरी त्याचा फारसा उपयोग होत नसल्याचे दिसून येत आहे. काही शेतकरी शेताभोवती तार लावून त्यात करंट सोडण्याचा प्रयत्न करतात, मात्र त्यामुळे अपघात होण्याचा धोका निर्माण होतो. जाळी लावली तरी रानडुक्कर ती तोडून आत शिरतात. परिणामी शेतकर्‍यांच्या मेहनतीने उभे केलेले पीक एका रात्रीत नष्ट होत आहे. एकीकडे निसर्गाच्या लहरीपणाचा फटका तर दुसरीकडे जंगली प्राण्यांचा वाढता त्रास अशा दुहेरी संकटात शेतकरी सापडला आहे. काही शेतकरी स्वतः रात्री शेतात राहून पिकांची राखण करतात, मात्र त्यावेळी जंगली प्राण्यांकडून हल्ला होण्याची भीतीही सतावत आहे. सध्या राज्यात अधिवेशन सुरू असल्याने लोकप्रतिनिधींनी हा प्रश्न शासनाच्या पातळीवर ठामपणे मांडावा, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# जलजीवन मिशन योजनेतून पाणीपुरवठा करा, जयपूर ग्रामस्थांचे आंदोलन

## जलजीवन मिशनअंतर्गत कामे तत्काळ पूर्ण करण्याची ग्रामस्थांची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ मार्च**
जलजीवन मिशन अंतर्गत कवठा व ९ गावे पाणीपुरवठा योजनेतून जयपूर गावाला १०० टक्के पाणीपुरवठा चालू करावा तसेच प्रत्येक घराला नळजोडणीसाठी निधी उपलब्ध करून द्यावा तसेच घरकुलांचे थकीत हप्ते तत्काळ लाभार्थ्यांना द्यावेत या मागणीसाठी काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वात जयपूर ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर घागर मोर्चा काढीत आंदोलन सुरू केले आहे.

मागील तीन ते चार वर्षापासून जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनेचे काम सुरू आहे परंतु हे काम अद्यापही पूर्ण न झाल्यामुळे जयपूर येथील ग्रामस्थांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. महिलांना एक हांडा पाण्यासाठी भटकंती करावी लागत असून अनेकांना पाणी विकत घेण्याची वेळ आली आहे. जयपूर गावातील टाकीमधून पाणी टेस्टींग साठी सोडले असता गावात केवळ १०० ते १५० घरांना पाणी मिळते इतर गाव पाण्यापासून वंचीत राहत आहे. अनेक ठिकाणी पाईपलाईनचे काम अपूर्ण राहीले आहे. जलजीवन मिशन अंतर्गत कवठा व ९ गावे पाणीपुरवठा योजनेच्या कामाची पाहणी करण्यासाठी संबंधित कर्मचारी आले असता वरवर पाहणी करून जातात. विचारणा केली असता उडवाउडवीची उत्तरे देत आहेत.

सध्या उन्हाची तीव्रता वाढत असल्यामुळे या भागात पाणीटंचाई भेडसावत आहे. महिलांसह लहान मुलांना हंडाभर पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. तत्काळ या योजनेचे काम पूर्ण करून गावातील रहीवाशांना नळाद्वारे घरोघरी पाणीपुरवठा करण्यात यावा या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर महिलांनी घागर मोर्चा काढीत आंदोलन केले.

तसेच जयपूर येथील पंतप्रधान आवास योजना, रमाई घरकुल योजनेअंतर्गत घरकुल मंजूर झाले आहेत परंतु अनेक लाभार्थ्यांचे थकीत हप्ते न मिळाल्याने घरकुलाचे काम रखडले आहेत. तत्काळ घरकुल लाभार्थ्यांना थकीत हप्ते देण्याची मागणी करण्यात आली आहे. निवेदनावर काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुरेशअप्पा सराफ, डॉ सतीश पाचपूते, प्रशांत नागरे, बबन डुकरे, एकनाथ जगताप, विशाल इंगोले, तालुकाध्यक्ष संदीप पायघन यांच्यासह जयपूर येथील ग्रामस्थ महिला, पुरूष यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रात दरोडा टाकणारी टोळी जेरबंद



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ मार्च**
तालुक्यातील जवळा पळशी रस्त्यावर एका काळ्या रंगाच्या स्कॉर्पिओ गाडीनेसंदीप तनपुरे यांच्या दुचाकीचा पाठलाग करीत त्यांना गाडीत बसवून कत्त्याने व पाईपने मारहाण करून त्यांच्याकडील ४२ हजार रोख, मोबाईल व दुचाकीची चाबी धेऊन दरोडेखोर फरार झाले. याप्रकरणी ग्रामीण पोलिस ठाण्यात तनपुरे यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आला होता. स्थानिक गुन्हे शाखेने गोपनीय माहीती आणि तांत्रिक विश्लेषण करून आरोपींना पुणे परिसरातून जेरबंद केले असून ही टोळी मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रात दरोडे टाकत असल्याचे निष्पन्न झाले असून आरोपींकडून १६ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असल्याची माहीती पोलिस अधीक्षक डॉ निलाभ रोहन यांनी पत्रकार परिषदेत दिली.

दि १३ मार्च रोजी संदीप तनपुरे हे हिंगोली ते नांदुरा देवी त्यांच्या गावी दुचाकीवर निघाले असता रात्री दहाच्या सुमारास जवळा पळशी रस्त्यावर फौजी धाब्याच्या समोर काळ्या रंगाच्या स्कार्पिओ गाडी क्र एमएच १२ वाय एन ३३०० मधून दुचाकीचा पाठलाग करीत गाडी आडवी लावून तनपुरे यांना गाडीत टाकून त्यांना मारहाण करीत त्यांच्याकडील रोख रक्कम, मोबाईल व दुचाकीच्या चाव्या घेवून स्कॉर्पिओमधून दरोडेखोर पसार झाले होते. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेत पोलिस अधीक्षक निलाभ रोहन यांनी या प्रकरणाचा तपास गुन्हे शाखेचे पोनि मोहन भोसले आणि ग्रामीणचे पोनि श्यामकुमार डोंगरे यांच्याकडे सोपविला. याप्रकरणी सपोनि शिवसांब घेवारे यांचे पथक नेमले. पथकाने जवळपास २०० सीसीटीव्ही फुटेज बारकाईने तपासले. गोपनीय माहीती आणि तांत्रिक विश्लेषण करीत या प्रकरणातील प्रमुख आरोपी सौरभ विलास शिंदे रा फुलगाव जि पुणे याने त्याच्या टोळी मार्फत सदरचा दरोडा टाकला असल्याचे कळल्यानंतर पथकाने सहा गुन्हेगारांना जेरबंद केले आहे. त्यामध्ये सौरभ विलास शिंदे, शुभम प्रकाश तापकीर, भीमा कोरेगाव, गजानन संजय मैंदकर, रा पेरनेगाव, अभिजीत बंडू गदळे रा वाघोली, एक विधीसंघर्ष बालक, टीप देणारा गजानन गोविंदा गोरे रा सानखास वाशिम यांचा समावेश आहे. पोलिसांनी आरोपींकडून २६ हजार रूपये रोख, गुन्ह्यात वापरलेली स्कॉर्पिओ, मोबाईल असा १६ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदरील आरोपी हद्दपार असून सराईत गुन्हेगार आहेत. पुणे व परिसरातील मालाविरूध्दचे १६ गुन्हे त्यांच्यावर दाखल आहेत.

# व्यावसायिक गॅस सिलेंडर उपलब्ध करून देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ मार्च**
आखाती देशांतील युद्ध परिस्थितीमुळे एल.पी.जी. गॅस सिलिंडरचा पुरवठा सुरळीत राहावा यासाठी केंद्र व राज्य शासनाने काही निर्बंध लागू केले होते. तथापि, सद्यस्थितीत व्यावसायिक गॅस सिलिंडरचा पुरवठा अत्यंत कमी प्रमाणात होत आहे.

यामुळे हॉटेल, खानावळी, मिठाई दुकाने व इतर व्यावसायिक आस्थापनांचे कामकाज मोठ्या प्रमाणात प्रभावित होत असून, व्यवसायिकांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. म्हणून या बाबीकडे तातडीने लक्ष घालून व्यावसायिक गॅस सिलिंडरचा पुरवठा वाढविण्या बाबत संबंधित विभागास आवश्यक सूचना द्याव्यात, अशी मागणी हिंगोली जिल्हा व्यापारी महासंघच्या वतीने जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या कडे निवेदनाद्वारे करण्यात आली असून सकारात्मक कार्यवाही कराल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.



निवेदनावर व्यापारी महासंघाचे राज्य उपाध्यक्ष अनिल नैनवाणी, जिल्हाध्यक्ष नंदकिशोर तोष्णीवाल, माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण, जिल्हा उपाध्यक्ष राजेश बगडीया, तालुका अध्यक्ष संजय देवडा, शहराध्यक्ष सुमित चौधरी आदींची उपस्थिती होती.

यावेळी जिल्हाधिकारी गुप्ता यांनी सकारात्मक कार्यवाही करण्याचे आश्वासन व्यापारी महासंघाच्या शिष्टमंडळाला दिले.



**हिंगोली– जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांचा नुकताच उल्लेखनीय कार्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सत्कार केला. यानिमित्त सोमवारी पत्रकारांच्यावतीने जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी जिल्ह्यातील पत्रकारांची उपस्थिती होती. छाया– सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### विद्युत कंत्राटी कामगारांचे साखळी उपोषण



हिंगोली– बाह्यस्त्रोत कंत्राटी कामगार नियुक्तीतील अनियमितता, मंजूर पदसंख्येतील तफावत व वेतन प्रलंबीत बाबी संदर्भात महाराष्ट्र राज्य स्वतंत्र विद्युत कंत्राटी कामगार संघटनेच्यावतीने येथील वीज मंडळ कार्यालयासमोर साखळी उपोषण करण्यात आले. यावेळी संघटनेच्या विविध मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे. निवेदनावर जिल्हाध्यक्ष माणिक पंडीत, दिलीप पाचपूते, प्रदीप निनुले, नीरज राऊत, सुशिल बनकर, अमोल अंभोरे, वैभव मगर, गजानन शिंदे, शाम शेळके, ग्यानोजी शिरडे, अनिकेत इंगोले, कैलास खोकले, मोहन धुमाळ, चंपतराव पाचपूते, कपील पुंडगे, बालाजी शिंदे यांच्यासह पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### भोसी येथे प्रिमीयम क्रिकेटचे सामने



हिंगोली– गुढीपाडव्याचे औचित्य साधून औंढा तालुक्यातील भोसी येथे सोमवारी (ता.२३) मार्च रोजी भव्य क्रिकेट सामन्याचे आयोजन करण्यात आले. क्रिकेट खेळण्यासाठी हिंगोली जिल्ह्यासह औंढा तालुका व ग्रामीण भागातील क्रिकेट खेळाडू टीमसह मोठ्या प्रमाणात आले होते. प्रथमतः क्रिकेट सामन्याचे उद्घाटन विकास जाधव, बबन गारुळे, किसन जुमडे, अविनाश राठोड यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते झाले. क्रिकेट सामन्याचे प्रथम पारितोषिक २१ हजार रुपये विकास जाधव, द्वितीय बक्षीस ११ हजार रुपये बबन गारुळे, तृतीय बक्षीस ७ हजार रुपये किसन जुमडे, चौथे बक्षीस ५ हजार १०० रुपये अविनाश राठोड यांच्या वतीने बक्षीस ठेवण्यात आले. सर्व मॅचेस टेनिस बॉल ने खेळण्यात येत आहेत. क्रिकेटच्या सामने बघण्यासाठी पंचक्रोशीतील क्रिकेट खेळाडू व प्रेक्षक मोठ्या संख्येने येत आहेत. यावेळी योगीराज राठोड, आर्यन जैस्वाल, ज्ञानेश्वर चव्हाण, राजकुमार जयस्वाल, विशाल चव्हाण, ऋतिक जैस्वाल, कार्तिक चिकाळकर, एकनाथ चिभडे, मनोज चिकाळकर, पवन दुधाळकर, लखन चिभडे, शिवाजी हनवते, आदेश जयस्वाल, राहुल जयस्वाल, राजू चिभडे,शैलेश चिकाळकर, भगवान तनपुरे, संजय जाधव यांच्यासह पंचक्रोशीतील क्रिकेटप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नित्यानंदाचा मार्ग भक्तीमध्येच– प पू रमेश भाई ओझा





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ मार्च**
संसारात सर्वत्र दुःख असताना आपण त्यालाच सुख समजतो, हीच माणसाची मोठी चूक आहे, असे परखड विचार मांडत प.पू. भाईश्री रमेशभाई ओझा यांनी श्रीमद भागवत कथेतून जीवनाचे गूढ उलगडले.

येथील रामलीला मैदानावर रविवारी चौथ्या दिवशी कथेला सुरुवात होण्यापूर्वी मुख यजमान नंदकिशोर शर्मा तर दैनिक यजमान म्हणून रमेश चंद्र सावरमल बगडिया, पदमाबाई शिंदे, नवनीत राठोर यांच्या वतीने ग्रंथाची पूजा अर्चना करण्यात आली. त्यानंतर भजन गात कथेला सुरुवात झाली.

भाईश्री पुढे म्हणाले की, संसारात दिसणारे सुख हे अनित्य आहे. परिवारात अशांतता, कलह आणि तणाव निर्माण होणे हीच संसाराची खरी ओळख आहे. तरीही माणूस या दुःखमय अवस्थेलाच सुख समजून त्यात अडकून राहतो. त्यानंतर भाईश्री यांनी दोह्याच्या माध्यमातून 'नित्यानंद' या शाश्वत आनंदाचा अनुभव स्पष्ट केला.

जो आनंद सिंधू सुखराशी या ओवीतून त्यांनी सांगितले की, खरा आनंद हा बाह्य वस्तूंमध्ये नसून अंतर्मनात आणि सदुरूंच्या मार्गदर्शनात आहे. सदुरूच माणसाला योग्य दिशा दाखवतात, असे त्यांनी अधोरेखित केले.

कर्ममार्ग आणि भक्तीमार्ग यातील फरक स्पष्ट करताना ते म्हणाले की, कर्ममार्गावर चालणाऱ्या व्यक्तीला सुख हवे असते, तर भक्तीमार्गातील व्यक्तीला 'आनंद' हवा असतो. स्वर्गातील सुख उच्च असले तरी तेही अनित्यच आहे, मात्र भक्तीतून मिळणारा आनंद नित्य आणि शाश्वत असतो.

जीवनातील विषमता मांडताना त्यांनी प्रश्न उपस्थित केला की, एखादा माणूस झोपडीत जन्म घेतो तर दुसरा श्रीमंत घराण्यात का? याचे उत्तर देताना त्यांनी कर्मसिद्धांत स्पष्ट करत प्रत्येकाच्या जीवनातील परिस्थिती ही त्याच्या कर्मांवर आधारित असल्याचे सांगितले.

भागवत कथा हीच माणसाला योग्य मार्ग दाखवणारी आहे, असे सांगत त्यांनी प्रथम स्कंधातील धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चार पुरुषार्थांचे सविस्तर विवेचन केले.

यावेळी मौनी बाबांच्या कथेद्वारे खोट्या साधूंचा पर्दाफाश करत त्यांनी सांगितले की, काही लोक केवळ वेशभूषा आणि दिखावा करून लोकांना फसवतात व पैशावर डल्ला मारतात. त्यामुळे खऱ्या आणि खोट्या साधूंमध्ये फरक ओळखणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. भागवत कथेतून दिलेल्या या जीवनमूल्यांनी उपस्थित भाविकांना आत्मचिंतनाचा नवा दृष्टिकोन दिला. यावेळी हजारो भविकांनी कथेचा लाभ घेतला. रात्री कृष्ण जन्म सोहळा पार पडला.

# महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तूंच्या ब्रँडीगसाठी अनोखा उपक्रम




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ मार्च**
हिंगोलीचे पिवळे सोने या नावाने जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या पुढाकारातून हाती घेण्यात आलेल्या उपक्रमात महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तूंची केंद्रासह राज्यातील लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांना भेट दिली जाणार आहे. त्यातून या वस्तूंचे ब्रँडींग करून या वस्तूंना वेगळी ओळख निर्माण करून देण्याचे प्रयत्न प्रशासनाने सुरू केले आहेत.

हिंगोली जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर हळदीचे उत्पादन धेतले जाते. राज्यातील एकूण उत्पादनाच्या सुमारे ४० टक्के पेक्षा जास्त उत्पादन हिंगोली जिल्ह्यात होते. या हळदीवर प्रक्रीया करून विविध वस्तू तयार केल्या जातात. विशेष म्हणजे महिला बचत गटांनी देखील हळदीपासून विविध खाद्य पदार्थासह साबण, तेल व इतर वस्तू तयार केल्या आहेत. बचत गटांनी तयार केलेल्या या वस्तूंची देशपातळीवर ओळख निर्माण व्हावी या उद्देशाने जिल्हाधिकारी राहूल गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे यांच्या पुढाकारातून हिंगोलीचे पिवळे सोने हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत ग्रामीण भागातील महिला बचतगटांनी हळदीपासून विविध मुल्यवर्धित उत्पादने तयार केली असून त्यांचे आकर्षक गिफ्ट बॉक्स तयार करण्यात आले आहेत. हे बॉक्स केंद्र व राज्यस्तरावरील लोकप्रतिनिधी आणि उच्चपदस्थ अधिकाऱ्यांसह मान्यवरांना भेट दिले जाणार आहेत. यामुळे हिंगोलीच्या हळदीची गुणवत्ता आणि वैशिष्टे व्यापक स्तरावर पोहोचण्यास मदत होणार आहे. परिणामी ग्रामीण महिलांना रोजगारनिर्मितीची संधी मिळणार असून त्यातून आर्थिक दृष्टया सक्षम केले जाणार आहे.

# कथावाचक श्री रमेश भाई ओझा यांची अंध विद्यालयाला सदीच्छा भेट



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २३ मार्च**
शहरातील मातोश्री गंगादेवी देवडा निवासी अंध विद्यालयाला भागवत कथावाचक श्री रमेशभाई ओझा यांनी भेट दिली. शाळेच्या कला दालनातील मुलांनी बनवलेल्या विविध वस्तूंची पाहणी करून त्यांच्या कलेचे मनःपूर्वक कौतुक केले. या प्रसंगी मुख्याध्यापक आशिष पिंगळकर यांनी शाळेची माहिती सविस्तर दिली. शाळा मंडळ अध्यक्ष सुनील देवडा यांच्या मनोगतानंतर भाईश्रींनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. दृष्टीबाधित मुलांचे मनोबल वाढविण्यासाठी त्यांनी पाच ज्ञानेंद्रिये हे पंचमहाभूतांचे प्रतिनिधित्व करतात असे सांगितले. एक ज्ञानेंद्रियाची कमतरता असली तरी इतर चार मजबूत आहेत ही आठवण ठेवा. संगीताद्वारे ज्ञानप्राप्ती करा, असे प्रेरणादायी उद्गार त्यांनी काढले.

महिलांनी स्वतःला 'हाउसवाइफ' न समजता 'होममेकर' म्हणून ओळखावे, असा संदेश देत कार्यकर्त्यांचे उदाहरण देताना कथा आयोजन प्रमुख वकील मनीष साकळे यांच्या नियोजनाचे विशेष कौतुक केले.

या वेळी मनीष साकळे यांनी मुलांसाठी ड्रेस, ब्रेल किट व चादरीची भेट आणली होती. कथावाचक रमेशभाई यांच्या हस्ते मुलांना सन्मानपूर्वक वितरित करण्यात आले. कार्यक्रमाला शहरातील अनेक मान्यवर उपस्थित होते. गांधी सेवा ट्रस्टचे सचिव सुनिलभाऊ देवडा, कोषाध्यक्ष प्रकाश सोनी, सचिन गुंडेवार, आशिष काबरा आदींची उपस्थिती होती.

# तहसील कार्यालयासमोरूनच रेतीची ओव्हरलोड वाहतूक

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. २३ मार्च-**

तालुक्यात अवैध रेती वाहतुकीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असून, प्रशासनाच्या भूमिकेवर आता उघडपणे प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. क्षमतेपेक्षा जास्त रेती भरून भरधाव वेगाने धावणारी वाहने थेट तहसील कार्यालय आणि उपविभागीय कार्यालयासमोरूनच जात असतानाही कारवाईचा अभाव प्रकर्षाने जाणवत आहे. त्यामुळे रेती माफिया आणि प्रशासनाची मिलीभगत तर नाही ना? अशी शंका अधिकच गडद होत चालली आहे.

स्थानिक नागरिकांच्या मते, ही वाहतूक केवळ रात्रीच नव्हे तर दिवसाढवळ्याही सुरू असते. रेतीने ओव्हरलोड भरलेली वाहने नियमांना धाब्यावर बसवून भरधाव वेगाने धावत असल्याने रस्त्यांवर भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. यापूर्वी अनेकदा रेती वाहतूक करणाऱ्या वाहनांचे अपघात घडले आहेत, यात काहींना जीव ही गमवावे लागले. अशा ओव्हरलोड आणि वेगवान रेती वाहतुकीमुळे कोणत्याही क्षणी मोठा अपघात होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. यामुळे दुचाकीस्वार जखमी होण्याच्या घटना, पादचाऱ्यांच्या जीवाला धोका आणि वाहन उलटण्याच्या घटना होण्याची शक्यता आहे. अशा गंभीर बाबींकडे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये भीती आणि संताप दोन्ही वाढत आहेत.

**'डोळ्यांसमोर घडणारा' प्रकार नियमभंग की दुसरे काही ?**

विशेष म्हणजे, ही वाळू वाहतूक देगलूर मार्गे महाराष्ट्र व कर्नाटक राज्यात विक्री केली जाते. देगलूर येथील तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, आरटीओ आणि देगलूर व मरखेल पोलीस ठाण्याचे पोलीस प्रशासनांची भूमिका रेती माफियांसोबत मवाळ दिसून येते. डोळ्यादेखत अवैध वाहतूक होत असताना कारवाई का होत नाही. 'दाल मे कुछ काला है क्या ?' अशी शंका येत आहे. अवैध रेती वाहतूक करणारी ही वाहने संबंधितांना दिसत नाहीत का?, की मुद्दाम दुर्लक्ष केले जात आहे? असा थेट सवाल नागरिकांकडुन उपस्थित होत आहे.

**तपासणी, नाकेबंदी, दंडात्मक कारवाई आणि वाहन जप्तीची कारवाई का नाही?**

अवैध वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी तपासणी, नाकेबंदी, दंडात्मक कारवाई आणि वाहन जप्ती अपेक्षित असते. मात्र, प्रत्यक्षात एकही ठोस कारवाई दिसून येत नसल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. काही नागरिकांच्या मते, ही वाहतूक संघटित पद्धतीने सुरू असून त्यामागे मोठे आर्थिक हितसंबंध गुंतलेले असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**पर्यावरण आणि महसुलावर दुहेरी आघात**

अनियंत्रित रेती उपशामुळे नदीपात्राची रचना बिघडत असून, भूजल पातळीवरही विपरीत परिणाम होत आहे. दुसरीकडे, शासनाची रॉयल्टी टाळून होत असलेल्या या वाहतुकीमुळे महसुलाचेही मोठे नुकसान होत असल्याची चर्चा आहे. यापूर्वी काही सामाजिक कार्यकर्त्यांनी एक पावती दाखवून अनेक फेऱ्या रेती वाहतूक होत असल्याची तक्रार उपविभागीय अधिकारी, देगलूर यांना दिली होती. तसेच यापूर्वी अनेकांनी अवैध रेती वाहतूक संदर्भात प्रशासनास निवेदने देऊन निदर्शनास आणून दिले होते.

**जीव मुठीत घेऊन विद्यार्थी व नागरिकांचा प्रवास**

अवैध रेती माफियांची दिवसेंदिवस अतिरेक वाढत असल्याचे चित्र दिसून येत आहे. विशेषतः वेगवान वाहतूकीमुळे नागरिक दररोज जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो. देगलूर शहरातून रेती वाहतूक करणारे हायवा, ट्रॅक्टर ० इतर वाहने सर्रास वेगाने धावतात, पण प्रशासन कारवाई करत नाही, मग आम्ही कोणाकडे दाद मागायची? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. विशेषतः महामार्गालगत व जवळपास विविध शाळा आहेत. त्यात कन्या हायस्कूल, मानव्य विकास शाळा, देगलूर कॉलेज, श्री छत्रपती शिवाजी महाराज इंग्रजी शाळा, संस्कृती डिजिटल इंग्लिश मीडियम स्कूल या महामार्गालगत आहेत. तर जिल्हा परिषद मुलांची शाळा, विविध क्लासेस व शाळेला जाण्याचा मार्ग असल्याने अशा अवैध वाहतूकीमुळे विद्यार्थी म आपला जीव मुठीत घेऊन प्रवास करीत आहेत. यासंदर्भात काही सामाजिक कार्यकर्त्यांनी व पालकांनी भिती व्यक्त केली आहे.

**प्रशासनाची कसोटीची वेळ**

या सर्व पार्श्वभूमीवर, संबंधित प्रशासनाने तातडीने संयुक्त मोहीम राबवून ओव्हरलोड वाहने जप्त करणे, दंडात्मक कारवाई करणे आणि अवैध रेती वाहतुकीला आळा घालणे अत्यावश्यक झाले आहे. या रस्त्याने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना व विद्यार्थ्यांना सुखकर प्रवासासाठी भुमिका घेतली जाईल का? अवैध रेती वाहतूकीवर कारवाई होईल का? की, 'रेती माफिया आणि प्रशासनाची मिलीभगत तर नाही ना?' या प्रश्नाचे उत्तर रेती माफियाविरुध्द प्रशासनाची कोणती कारवाई होणार यावरुनच जनते/२३, १४:४३ डेपझ्रालश्रश उळवले:

## सिडकोत गॅसचा तुटवडा करून जास्तीच्या किमतीने विक्री



**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. २३ मार्च-**

सिडको हडको येथील गॅस सिलेंडरचे वितरण करणारे बिडवई बंधू गॅसचा तुटवडा दाखवून गरजू ग्राहकांना अधिकच्या भावाने( २०००छ) रुपयानी सरास विक्री करत आहेत .याकडे पुरवठा अधिकारी यानी यांची चौकशी करून यांचे वितरणाचे काम बंद करण्यात यावे अशी नागरिकांची मागणी होत आहे.

सिडको हाडकोत गॅस वितरण करणारे बिडवई बंधू गेले काही वर्षापासून गॅस वितरणाचे काम करत असतात. सध्या बाजारात गॅसचा तुटवडा होत असल्याचे लक्षात घेऊन सदरील बिडवई बंधू हे गॅस ग्राहकांना मनमानी किमतीने म्हणजे ९५० रुपयाचा गॅस सिलेंडर १७०० ते २००० हजार रुपयात विकत असल्याचे हाकीकत आहे. याकडे पुरवठा अधिकारी नांदेडचे तहसीलदार यांचे दुर्लक्ष असल्याचे स्पष्ट दिसून येते. जिल्हाधिकारी व पुरवठा अधिकारी एकीकडे गॅसचा तुटवडा नाही जनतेने भयभीत होऊन काळजी करण्याचे कारण नाही. अशा सूचना माध्यमाद्वारे देता आहेत. तर दुसरीकडे गॅसचा तुटवडा करून ग्राहकांना २००० हजार रुपयांनी गॅस ग्राहकांना विक्री करतात व ग्राहकांची लूट होत आहे याकडे लक्ष कोणी द्यायचे हा एक प्रश्न जनतेला पडला आहे. बिडवई बंधूंनी ग्राहकांचे पासबुक स्वतः कडे ठेवून घेतात त्यांच्या नंबर वर नंबर लावून त्यांचे आलेले गॅस सिलेंडर २००० हजाराच्या भावांनी गरजू ग्राहकांना देण्याचा सपाटा सुरू केला आहे. तेव्हा याची चौकशी करून त्यांची तपासणी करून तूर्त त्यांचे वितरणाचे काम बंद करावे अशी नागरिकांतून मागणी होत आहे. प्रमाणिकपणे काम करणाऱ्या सिलेंडर वितरकांचे गॅस पुरवठा बंद करून त्यांचे काम बंद करण्यात आले. आहे आणि काळ्या बाजारात गॅस वितरण करणाऱ्या वितरकांना वितरणाची संधी देण्यात आली आहे .याचेही चौकशी करावी अशी मागणी होत आहे.

## नायगांव येथील राजुरा मारुती मंदिर येथे अखंड हरिनाम सप्ताह

**नायगांव** -तालुक्यातील शेळगाव रोडवरील राजुरा मारोती मंदिर येथे २६ मार्च ते २ एप्रिल २०२६ या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताह, या सप्ताहात भागवत कथा व ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या अखंड हरिनाम सप्ताहामुळे येथील परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होत आहे.

नायगांवातील छत्री शेळगाव रोड लगतच्या राजूरा मारुती मंदिरात या परिसरातील मारुतीच्या भाविक भक्तांनी गेल्या वर्षापासूनची अखंड हरिनाम सप्ताहाची परंपरा या वर्षातील अखंड हरिनाम सप्ताहाची सुरुवात दिनांक २६ मार्च रोज गुरुवार पासून ह.भ.प. वासुदेव महाराज कोलंबीकर यांच्या कीर्तनाने होणार आहे. त्यानंतर शुक्रवार, २७ मार्च रोजी ह.भ.प. गंगाधर महाराज एकलारेकर, शनिवार, २८ मार्च रोजी ह.भ.प. विष्णु महाराज तांदळीकर, तर रविवार, २९ मार्च रोजी ह.भ.प. विकास महाराज धसवाडीकर यांची कीर्तन सेवा होणार आहे.

सप्ताहाचे प्रमुख आकर्षण असलेल्या भागवत कथेसाठी ह.भ.प. श्री योगेश महाराज अग्रवाल वसमतकर हे कथाकार म्हणून लाभणार आहेत. त्यांची भागवत कथा दररोज दुपारी २ ते ५ या वेळेत आयोजित करण्यात आली असून, दररोज रात्री ८ ते ११ या वेळेत कीर्तनाचा कार्यक्रम होणार आहे.

सप्ताहाच्या उत्तरार्धात सोमवार, ३० मार्च रोजी ह.भ.प. त्र्यंबक अप्पा स्वामी नांदगावकर, मंगळवार, ३१ मार्च रोजी ह.भ.प. चंदू महाराज लाठीकर, बुधवार, १ एप्रिल रोजी ह.भ.प. योगेश महाराज अग्रवाल, तर गुरुवार, २ एप्रिल रोजी ह.भ.प. मधुसूदन महाराज कापशीकर यांची कीर्तन सेवा होणार आहे. गुरुवार, २ एप्रिल रोजी श्री हनुमान जन्मोत्सवानिमित्त सकाळी ६ वाजता विशेष धार्मिक कार्यक्रम, सकाळी १० ते १२ या वेळेत काल्याचे कीर्तन आणि त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.या सप्ताहाचे आयोजन राजुरा मारोती मंदिर भक्त व समस्त गावकरी मंडळी, नायगांव (ता.) यांच्या वतीने करण्यात आले असून, भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या भक्तिमय सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक व राजुरा मारुती भक्त मंडळीच्या वतीने करण्यात आले आहे.

## रुपेश पाडमुख यांना आदर्श संपादक पुरस्कार जाहीर

**नांदेड** -मागील पंचवीस वर्षांपेक्षा अधिक काळापासून वृत्तपत्र क्षेत्रासह विविध सामाजिक कार्यात अग्रेसर राहणारे दै. समीक्षाचे संपादक रुपेश पाडमुख यांना पुणे येथील स्वप्नल फाऊंडेशनचा राज्यस्तरीय आदर्श संपादक पुरस्कार जाहीर झाला असून दि. २३ मार्च २०२६ रोजी मान्यवरांच्या उपस्थितीत ज्ञानज्योति सावित्रीबाई फुले स्मारक सांस्कृतिक केंद्र, पुणे महानगरपालिका, गंज पेठ, पुणे येथे पुरस्कार प्रदान सोहळा संपन्न होणार आहे. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष तथा दै. समीक्षाचे मुख्य संपादक रुपेश पाडमुख मागील पंचवीस वर्षांपेक्षा अधीक काळापासून वृत्तपत्र क्षेत्रात कार्यरत आहेत. मागील वीस वर्षांपासून वृत्तपत्र क्षेत्रातील प्रत्येक घटकांना पुरस्कार देऊन त्यांना प्रोत्साहित करण्याचे काम अविरतपणे सुरु आहे. जागतिक महिला दिनानिमित्त विविध क्षेत्रातील उपेक्षित महिलांचा सन्मान करुन त्यांच्या कार्याचे कौतुक करण्याचे काम त्यांच्या हातून होत आहे. वैद्यकीय, शैक्षणिक, क्रीडा व इतर प्रत्येक क्षेत्रातील वंचितांना पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याचा सन्मान सातत्याने करत आहेत. एवढेच नव्हे तर शहिद झालेल्या जवानांच्या परिवारासह देशांर्तगत सेवा देणाऱ्या पोलीस दलातील कर्तव्यदक्ष अधिकारी-कर्मचाऱ्यांचा दरवर्षी गौरव करुन कृतज्ञता व्यक्त करण्याचे सामाजिक दायीत्व निभावत असतात. त्यांच्या कार्याची दखल घेऊन स्वप्नल फाऊंडेशन पुणेच्या अध्यक्षा शोभाताई बल्लाळ, रवी सावंत व त्यांच्या टीमने पाडमुख यांना आदर्श संपादक हा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर केला आहे. सदरील पुरस्काराबद्दल विविध मान्यवरांकडून अभिंनदन होत आहे.

## आदमपूरात शिवनाम सप्ताहात मुस्लिम बांधवांकडून महाप्रसाद वाटप



**तभा वृतसेवा**
**आदमपूर, दि. २३ मार्च-**

बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर येथे हिंदू-मुस्लिम धर्मात एकतेच दर्शन घडले आहे. मुस्लिम धर्माच्या पवित्र 'रमजान ईद' अर्थात 'ईद-ऊल-फित्र' सणाच्या दिवशी व गावात सुरू असलेल्या १८ व्या सर्वधर्मीय अखंड शिवनाम व शिवमहापुरान कथा सप्ताहात येथील दिवंगत पैलवान पिरसाब मदार यांच्या स्मरणार्थ महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे सेवानिवृत्त कर्मचारी फक्रूशा पिरसाब मदार,कार्यालयीन बँक सहाय्यक महमदरफी फक्रूशा मदार,कवी,गीतकार, दै.सोलापूर तरुण भारत पत्रकार जाफर फक्रूशा आदमपूरकर या मुस्लिम बांधवांनी धार्मिक एकोपा जपत सप्ताहाच्या तिसऱ्या दिवशी २१ मार्च रोजी सायंकाळी महाप्रसाद वाटप करून हिंदू-मुस्लिम धर्म एकतेचे दर्शन घडवून आणले आहे.

आदमपूर ग्राम येथे मराठी नववर्ष गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर शिवनाम सप्ताह व शिवकथा हा धार्मिक कार्यक्रम गावकऱ्यांच्या वतीने आयोजित करण्यात आला आहे. या सात दिवस चालणाऱ्या सप्ताह्यातदररोज गावातील सद्भभक्त दानशूर व्यक्तींकडून महाप्रसादाचे वाटप केले जाते.त्याच अनुषंगाने येथील सर्वधर्मसमभावी मुस्लिम बांधव महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे जेष्ठ व्यक्तिमत्त्व सेवानिवृत्त कर्मचारी फक्रूशा मदार व बँक सहाय्यक महमदरफी मदार, जाफर आदमपूरकर यांनी दुपारी २ ते ५ दरम्यान शिवकथा कार्यक्रम संपल्यानंतर सर्व भाविक व गावकऱ्यांसाठी महाप्रसाद वाटप केले आहे. त्यांनी केलेल्या या महाप्रसादाच्या वाटपामुळे आदमपूर,थडीसावळी,गळेगांव परिसरासह संपूर्ण तालुक्यातून हिंदू-मुस्लिम एकतेचे दर्शन घडले असल्याचे बोलके चित्रगावपरिसरात पाहण्यास मिळाले.हा गावातील धार्मिक एकोपा कायम राहील हीच निखळ चर्चा जनमानसात लोकप्रिय झाली.

## कवळे गुरुजींनी निवडणूकीत दिलेला शब्द पाळला; पोचम्मा मंदीराजवळ स्वखर्चाने मारला बोअर

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि. २३ मार्च-**

उमरी नगर परिषद निवडणूकीत प्रभाग क्रमांक ३ मधिल मतदारांना प्रचाराचे वेळेस व्हि. पी. के. उद्योग समुहाचे चेअरमन मारोतराव कवळे गुरुजींनी श्री. पोचम्मा मंदीरा जवळ स्वखर्चातुन बोअर मारुन देऊन त्यावर विद्युत मोटार बसवून देण्याचा शब्द दिला होता.

निवडणूकीत त्या प्रभागात भाजपा उमेदवारांना यश मिळाले नसले तरी मारोतराव कवळे गुरुजींनी शब्द पाळत बोअर मारुन देऊन त्यावर मोटार बसवुन दिली. त्याचे पुजन दिनांक २१ मार्च रोजी त्यांचे शुभहस्ते करण्यात येऊन तो बोअर त्याभागातील जनतेसाठी खुला करुन देण्यात आला. ह्याप्रसंगी माजी



नगराध्यक्ष विजयकुमार उत्तरवार, माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी, किशोर पबितवार, वसंतराव जाधव, संदिप बादलवाड, उत्तम आयेवार, मनोज लाडके, नागेश सबनेडवार, अनिता अनंतवार, माया दवने यांचे हस्ते व त्या प्रभागातील असंख्य नागरिक उपस्थित होते. सदर बोअरमुळे त्या भागातील पाणी टंचाई दूर झाली असून ऐन उन्हाळ्यात पाण्याची सोय झाल्यामुळे त्याभागातील जनतेने कौतुक करीत आहेत .

## जिल्हा बँकेच्या भोकर शाखेच्या नवीन इमारतीचा लवकरच लोकार्पण सोहळा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २३ मार्च-**

नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या भोकर शाखेसाठी बँकेने नवीन इमारतीचे भुमिपुजन महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले होते. बँकेच्या भोकर शाखेसाठी नविन इमारत ही अद्यावत फर्निचरसह सुसज्य अशी उभारण्यात आलेली आहे. सदर इमारतीचा लोकार्पण सोहळा हा महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली तसेच महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत माहे एप्रिल २०२६ च्या पहिल्या आठवण्यात पार पाडणार आहे.

केंद्र शासनाचे तसेच महाराष्ट्र शासनाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सध्या सुरु असल्यामुळे सदरचा लोकार्पण सोहळा हा एप्रिल महिन्याच्या पहिल्या आवठडयात निश्चित करण्यात आलेला आहे. सदर कार्यकमाचा दिनांक निश्चित झाल्यानंतर यथावकाश सर्व संबंधितांना कळविण्यात येईल. तरी सदर कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन बँकेचे अध्यक्ष भास्करराव पाटील खतगांवकर यांनी केले आहे.

## वन दिनानिमित्त वृक्ष लागवड

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २३ मार्च-**

जागतिक वन दिनानिमित्त वनपरिक्षेत्र कार्यालय प्रादेशिक हदगाव अंतर्गत वनपरिमंडळ मनाठा येथील मौजे सायाळवाडी येथे २१ मार्च जागतिक वन दिनानिमित्त वृक्ष लागवड करून तसेच वन वणवाबद्दल जनजागृती करून मोठ्या उत्सवात साजरा करण्यात आला. यावेळी उपवनसंरक्षक मनीषा पाटील, सहाय्यक वनसंरक्षक (तेंदु व कॅम्पा) भारत खेलबांडे, तसेच किशन खंदारे आदी उपस्थित होते.

## पंडित दीनदयाल उपाध्याय महा अभियानांतर्गत दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिर उत्साहात

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २३ मार्च-**

भारतीय जनता पार्टी किनवट उत्तर व किनवट शहर मंडळाच्या वतीने पंडित दीनदयाल उपाध्याय महा अभियान २०२६ अंतर्गत आयोजित दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिर उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. सुभाष नगर येथील व्ही.आर. गार्डन येथे दि. २१ व २२ मार्च २०२६ रोजी झालेल्या या शिबिराचे उद्घाटन किनवटमाहूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार भीमरावजी केराम यांच्या हस्ते करण्यात आले.

शिबिराच्या पहिल्या दिवशी विविध विषयांवर मार्गदर्शनपर सत्रांचे आयोजन करण्यात आले. पहिले सत्र आमदार भीमराव केराम व अध्यक्ष शिवराज राघू मामा यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. दुसऱ्या सत्रात जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख यांनी कार्यकर्त्यांना संघटनात्मक बांधणी व पक्षविस्ताराबाबत मार्गदर्शन केले. या सत्राच्या अध्यक्षस्थानी व्यंकटराव नेमान्निवार होते. तिसऱ्या सत्रात नागोराव भांगे पाटील यांनी प्रभावी संवादकौशल्य व जनसंपर्क यावर मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी बिभीषण पाळोदे सर होते.

प्रशिक्षणार्थ्यांसाठी भोजन व निवासी व्यवस्था करण्यात आली होती. सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रमांनी शिबिरात रंगत भरली. दुसऱ्या दिवसाची सुरुवात सकाळी योगासन सत्राने झाली. अखिल खान सर व मनसब योग केंद्राच्या प्रशिक्षकांनी उपस्थितांना विविध योगासने व प्राणायामाचे प्रशिक्षण दिले. चौथे सत्र रामराव भालेराव यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. अध्यक्षस्थानी यशवंतराव पाटील कराळे होते. पाचव्या सत्रात राघू मामा यांनी कार्यकर्त्यांना संघटन विस्तार व बूथ सक्षमीकरणाबाबत मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी सौ. पुनम दीक्षित होत्या. सहाव्या सत्रात जीवन अग्रवाल यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली. अध्यक्षस्थानी दिनकर चाडावार होते. सातवे व समारोप सत्र संजय कोडगे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. या सत्राच्या अध्यक्षस्थानी आमदार भीमराव केराम होते.प्रत्येक सत्रात मान्यवरांनी प्रशिक्षणार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. शिबिरात विविध विषयांवरील माहितीपर प्रदर्शनीही आयोजित करण्यात आली होती. कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र गीत व वंदे भारत गीताने झाली, तर समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन मंडळ अध्यक्ष उमाकांत पाटील कराळे व किनवट शहर मंडळाध्यक्ष स्वागत आयनेनीवार यांनी केले. सूत्रसंचालन विश्वास कोल्हारीकर सर यांनी केले.

**आमदार भीमरावजी केराम यांचे प्रतिपादन**

यावेळी बोलताना आमदार भीमरावजी केराम म्हणाले की, किनवटमाहूर मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यकर्त्यांचे संघटन, विचारांची स्पष्टता आणि प्रभावी जनसंपर्क अत्यंत महत्त्वाचे आहेत. पंडित दीनदयाल उपाध्याय महा अभियानांतर्गत आयोजित प्रशिक्षण शिबिर हे कार्यकर्त्यांच्या वैचारिक व संघटनात्मक बळकटीसाठी महत्त्वाचे व्यासपीठ ठरले आहे.

अशा शिबिरांमधून कार्यकर्त्यांना पक्षाची भूमिका, शासनाच्या योजना आणि समाजसेवेची दिशा यांचे सखोल मार्गदर्शन मिळते. मतदारसंघ विकासाच्या नव्या टप्प्याकडे वाटचाल करत असून, शासनाच्या योजना तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशिक्षित व समर्पित कार्यकर्ते हीच खरी ताकद असल्याचे त्यांनी नमूद केले.

## अण्णाभाऊंच्या जन्मभूमीच्या मातीला स्पर्श सावित्रीमाईंच्या शब्दांनी डोळे पाणावले - बालाजी यलगंदरे

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. २३ मार्च-**

साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जन्मभूमी असलेल्या वाटेगाव जि. सांगली येथे भेट देणे, म्हणजे केवळ एक दौरा नव्हे, तर संघर्ष, स्वाभिमान आणि प्रेरणेच्या जिवंत इतिहासाला स्पर्श करण्याचा अनुभव ठरला. या पवित्र भूमीत घेतलेली लोकशाहीर साहित्यसम्राट अण्णा भाऊ साठे यांच्या सून सावित्रीमाई मधुकर साठे यांची सदिच्छा भेट उपस्थितांच्या मनाला अक्षरशः भिडून गेली.

साधेपणातही मोठेपणा जपणाऱ्या सावित्रीमाईंनी सांगितलेल्या आठवणींनी वातावरण भारावून गेले. त्यांच्या प्रत्येक शब्दातून अण्णाभाऊंच्या संघर्षमय आयुष्याची आणि मूल्यांची जाणीव होत होती. चार मुलींचे संसार उभे केल्यानंतर आज त्या स्वतःच्या कष्टावर उभ्या आहेतहेच त्यांच्या आत्मसन्मानाचे जिवंत उदाहरण ठरते. वयोमानामुळे कष्ट करणे अवघड झाले असतानाही त्या कोणावर अवलंबून न राहता स्वतःच्या छोट्याशा दुकानातून उदरनिर्वाह करत आहेत. समाजातील काही परिवर्तनवादी लोकांनी त्यांना उभे राहण्यासाठी दिलेला हात हा माणुसकीचा खरा चेहरा अधोरेखित करणारा आहे.

त्यांच्या आयुष्यातील कठीण प्रसंग सांगताना त्यांनी जुन्या घराची अवस्था मांडली - पावसाळ्यात गळणारे छप्पर, उन्हाळ्यात अंगावर पडणारा कडक सूर्यपण अशा संकटातही त्यांनी हार मानली नाही. याच काळात रोहित पवार यांनी त्यांची परिस्थिती पाहून केवळ आश्वासन न देता, सुमारे २२ लाख रुपये खर्च करून त्यांना नवे घर उभे करून दिले. कोणतीही प्रसिद्धी, अपेक्षा किंवा राजकारण न करता केलेल्या या मदतीबद्दल सावित्रीमाईंनी व्यक्त केलेली कृतज्ञता मन हेलावून टाकणारी होती. संवादातील सर्वात हृदयस्पर्शी क्षण तेव्हा आला, जेव्हा अण्णाभाऊ साठे महामंडळाच्या कर्जाबाबत चर्चा झाली. अत्यंत ठाम आणि स्वाभिमानी शब्दांत सावित्रीमाई म्हणाल्या अण्णाभाऊंनी आयुष्यभर कष्ट करून समाजाला अमूल्य साहित्य दिलं त्यांच्या नावाने आम्ही कर्ज काढून फिरलो, तर त्या नावाचा अपमान होईल. आमच्यामुळे अण्णाभाऊंचं नाव कधीही खराब होता कामा नये!

या एका वाक्यात त्यांच्या विचारांची उंची आणि अण्णाभाऊंप्रती असलेली निष्ठा स्पष्ट झाली. यावेळी त्यांनी आनंदाची बातमीही दिली की, अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकासाठी ४५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून भव्य स्मारक उभारले जात आहे. येत्या १ ऑगस्ट २०२६ रोजी या स्मारकाचे उद्घाटन होणार असल्याची माहिती त्यांनी दिली. व जाताजाता अण्णा भाऊ साठे यांनी लिहिलेले काही कादंबरी फकिरा, आवडी, गजाआड, यासारख्या कादंबरी भेट देल्या, या प्रेरणादायी भेटीत बिलोली तालुक्यातील सगरोळीचे धोंडीबा गायकवाड आणि रुद्रापूरचे कमलाकर जमदडे उपस्थित होते.

**जाहिर प्रगटन**

नोंदीचा प्रकारःखरेदी

माहिती मिळाल्याचा दि.१३/०३/२६फेरफाराचा दि.१६/०३/२६लिहून देणारः इराम सबा शेख आजीमोदीन-झोया मेहविश शेख आजीमोदीन-रुमान शेख आजीमोदीन-शमीम बेगम शेख आजीमोदीन-शेख मोहम्मद सादिक शेख आजीमोदीन रा.भोकर(खाता क्र.७९९)यांचे गट/सर्व्हे क्र.१३३लागवडीयोग्य क्षेत्र ०.८२३६ हे.आर.चौ.मी.पैकी लागवडीयोग्य क्षेत्र ०.०१११शेख आजीमोदीन हाजी शेख नबीसाब यांनी हयात असताना दस्त क्रमांक ६९१दि.२५/०४/१९९५ रोजी भूमन्ना सायबू बंदगलवाड यांना हा प्लॉट विक्रि केला असून आज रोजी कै.शेख आजीमोदीन हाजी शेख नबीसाब यांच्या वारसाच्या नावे सामाईक क्षेत्र आहे करिता नोंद घेण्यात आली मंजूरीस्तव सादर लिहून घेणारःभूमन्ना सायबू बंदगलवाड(खाता क्र.११७७५)गट/सर्व्हे क्रमांक१३३लागवडीयोग्य क्षेत्र ०.०१११हे. आर.चौ.मी.आणि पोटखराब क्षेत्र ०.००००हे.आर.चौ.मी.यांना दूय्यम निबंधक भोकर जिल्हा नांदेड यांचेकडील खरेदी दस्त क्रमांक ६९१दि.२५/०४/१९९५ प्रमाणे रक्कम रुपये ५०००घेवून खरेदी दिली.सबब खरेदी घेणाऱ्याचे नाव गाव नमूना नं७/१२वर दाखल केले. ज्या अर्थी उक्त फेरफारात तूमचा हितसंबध आहे असे अधिकार अभिलेखावरुन /फेरफाराच्या नोंदवहीवरुन मानण्यास संयूक्तिक कारण आहे.उक्त फेरफाराच्या नोंदी संबधी तूम्हास सूचना मिळाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत उक्त नोंदी संबधी तूमची हरकत कोणतीही असल्यास ती तोंडी अथवा लेखी पाठविण्यास फर्मावित आहे ग्राम महसूल अधिकारी यांचेकडे पंधरा दिवसाच्या मूदतीत कोणतीही हरकत त्यांचेकडे न मिळाल्यास उक्त नोंदीस तूमची संमती आहे,असे गृहित धरले जाईल.

**ग्राम महसूल अधिकारी**
**तलाठी साझा भोकर.**